खडे तात्त्विक बोल.

भाग २ रा.

लेखक

महादेव हरि मोडक, बी. ए.

मुद्रक व प्रकाशक
अच्युत चिंतामण भट.
पुणें 'यशवंत' प्रेस.

किंमत ६ आणे.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

खडे तात्त्विक बोल.

भाग २ रा.

हरि स्मरणविस्मरण तरि तुझें काय जिणें रे असून ॥ धृ० ॥
शरीर फिरवी तुजला मिरवी । देव असे रे रुसून ।
जवळी असून तुझे हृदयीं बसून । भगवंत नये रे दिसून ।
म्हणे सोहिरा गुरुनाथ हा । माझ्या हृदयीं घुसून ।
जनांसि उद्धरावयाकारणें । वचन सांगतो ठसून ॥

सोहिरोबा.

"It is the treating of the Commonplace with the feeling of the *sublime* that gives to *art* its true power."

T. S. MILLET.

लेखक,
महादेव हरि मोडक, बी. ए.
'नाट्यमकरंद, शीलनाथ, अष्टोत्तरी सुख आणि शांति' या पुस्तकांचें कर्ते.

मुद्रक व प्रकाशक,
अच्युत चिंतामण भट.
पुणें, 'यशवंत' प्रेस.
सन १९१३.
किंमत ६ आणे.

यांतील विषय.

दुरुस्ती.

बोल.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१५	९	म्हणूनच—बद्दल—म्हणूनच;	
५९	१	भंगि०—मच्छीमाराचे.... अताराचें	
६६	४	योगानें यापुढें स्थिरतेस	
११८	४	असतें	येथ लागतें
१५०	८	गोमातेची ,, गोभक्तांची	
१६४	टीप	On	an
१७१	६	सर्वांचा यापुढें स्वरूप	
१७२	१	बाम्बे गॅझिट—एका दैनिकांत—	
१७६	१	नाहीं.	नाहीं,

खडे तात्त्विक बोल.

भाग ३.

लवकर म्हणजे तीन एक महिन्यांत तयार होईलशी आशा वाटते.

प्रस्तावना.

'बोलांचा' हा दुसरा भाग, यापूर्वींच प्रसिद्ध झाला असता. परंतु ह्या भागासाठीं म्हणून टांचलेले बोल ज्या रोजनिशींत होते ती मी नगरास जात असतां योगायोगानें गाडी पालटण्याचे गर्दींत दौंड स्टेशनावर हरवली. हरवल्यावर, तेच 'बोल' पुनरपि सुचणें, किंवा त्यांचे बदली दुसरे बोल सुचणें, यांपैकीं एकही गोष्ट माझे सत्तेची नसल्यानें निरुपाय झाला. झालेल्या हानीबद्दल क्षणभर चमत्कार वाटून आपल्या तोंडून अधिक बोल बोलविणें परमात्म्यास इष्ट नसेल म्हणूनच हा प्रकार घडून आला असावा असें एकदां वाटलें; आणि 'भगवदिच्छा' म्हणून गप राहिलों. पुनः एकदां असेंही वाटलें कीं, आपले गाफीलपणामुळें जो प्रकार घडला त्याचा दोष ईश्वराकडे देणें हाही अन्यायच होईल, म्हणून असेंही न करितां स्वस्थ बसावें व पुढें काय होईल तें पहावें आणि गत किंवा आगामि यांतील कशाचीच चिंता करूं नये.

अशा प्रकारची मनःस्थिति असतां माझी प्रकृति फारच बिघडली, व आरोग्य-रक्षणासाठीं कोठें तरी हवाशीर स्थळीं रहाणें जरूर आलें. कर्म-धर्म-संयोगानें बोरघांट खंडाळें येथें हवा पालटण्यासाठीं जाऊन राहिलों. अल्पकाळांत तेथें प्रकृति सुधारूं लागली व सह्यगिरीच्या निसर्गरमणीय व प्रच्छाय-शीतल अशा वनराजींत हिंडण्याची चटक लागली. मग नित्य सकाळसंध्याकाळ एकटा स्वछंद गिरि-पृष्ठावरून हिंडत असतां स्फूर्ति हळु हळु येऊं लागली व मनाला एक प्रकारें विश्वास आला कीं, संगृहीत बोल जरी हरवले तरी 'ते बोलविता' खास हरवला नाहीं, व पुनरपि आपणाकडून बोल बोलवील असा रंग दिसतो. कदाचित् हा प्रकृती-निमित्त सह्यराजीचा आश्रय करण्याचा प्रसंगही हेतुपूर्वकच त्यानें होऊन आणविला असावा.

याप्रमाणें विश्वस्त चित्तानें कांहीं दिवस शैलतटांवरून स्वच्छंद विहार चालला असतां, थेंबें थेंबें या न्यायानें बोलांचा पुनरपि बराच संग्रह झाला व वाचकांस दिलेलें वचन पूर्ण करण्याची संधी आली. मात्र 'जे बोल' हरवले त्यांतून एकाददुसरा पुनः सुचला असेल; पण बरेचसे हरवले ते हरवलेच. असा प्रकार झाल्यानें मागील जाहिरातींत जे विषय दुसऱ्या भागांत येतील म्हणून प्रसिद्ध केलें होतें, तेच व तितकेच केवळ यांत आले नाहींत, याबद्दल वाचकांनीं क्षमाच केली पाहिजे.

कोणताहि ग्रंथ म्हटला म्हणजे त्यांत विषयसंगति व अनुक्रम असणें इष्ट आहे. परंतु ही गोष्ट माझे ध्यानीं असूनही कांहीं उपयोग होत नाहीं. याबद्दल खेद वाटतो, पण उपाय चालत नाहीं. कारण हे बोल म्हणजे यदृच्छेनें उठणारे (विचार) तरंग असल्यानें त्यांजवर हुकूम चालत नाहीं. अमुक एक विषयापुढें अमुकच विषय घेणें किंवा एकाच विषयांशीं संबद्ध असे सर्व बोल एका क्रमानेंच बोलणें हें माझे अधीन नसल्यानें वाचकांचा हेतु पुरा करितां येत नाहीं, याबद्दल मी लाचार आहें. मी जाणून आहें कीं, हा ग्रंथ म्हणजे चटण्या, कोशिंबिरी, भाज्या, पक्वानें, इत्यादि पदार्थ यथावर्ग व पद्धतशीर मांडलेलें असें ताट नसून हा एक गोपाळकाल्याचा वाडगा आहे. यामुळें चवी पहात बसणाऱ्यांस जरी तो पटला नाहीं, तरी ज्यांना खडखडून भूक लागली असेल अशांना तरी तो गोड वाटेल अशी आशा आहे.

या बोलांचा पहिला भाग प्रसिद्ध करितांना एक मोठा प्रमाद झाला. तो प्रमाद म्हणजे प्रसिद्ध भाविक विद्वान् रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचे आभार न मानणें हा होय. त्याची दुरूस्ती त्यांची माफी मागून या स्थळीं मी करीत आहें. आभार मानण्याचें कारण हें कीं, हे बोल बोलविण्याचें श्रेय जरी एका **बोलवित्या**-वांचून कोणाकडेच नाहीं! तरी ते बोल मी स्वानंदार्थ म्हणून कृपणाचे धनाप्रमाणें स्वतःचे दप्तरीं ठेविलेले असतां, ते सर्व लोकांपुढें मांडण्याविषयीं प्रेमपूर्वक मजवर

जबरदस्ती करण्याचें श्रेय आमचे सन्मित्रांकडे आहे. हें मी मागील चुकीच्या दुरस्तीसह येथें प्रसिद्ध करितों. स्वतः दान करणारापेक्षांही 'दान व दापन' करणारा अधिक वंद्य होय. याचप्रमाणें स्वतः जनतेला भक्तिमार्गाचे धडे देऊन इतरांकडूनही देवविणारे **पां**गारकर त्यांच्या ह्या दांडगाईबद्दल मला फार प्रिय वाटतात.

असो. या प्रस्तुतचे देहांत आल्यावर माझी वाणी सर्वां आधी जिनें पल्लवित केली ती माझी प्रेममयी जन्मदाती **माउली** व जिनें त्याच वाणीची दिशा परमार्थाकडे वळविली ती **सद्गुरुमाउली** यांचे पायीं अनन्यभावानें मस्तक ठेवून व असेच बोल वेळोवेळीं या मुखांतून त्यांनीं बोलवावे अशी सप्रेम प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

वक्ता.

"काय म्या पामरें बोलावीं उत्तरें ।
पारि त्या विश्वंभरें बोलविलें ॥"

—तुकाराम.

॥ श्रीसद्गुरुभ्योनमः ॥

थोडे तात्त्विक बोल.

भाग २ रा.

मूकं करोति वाचालं । पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वंदे । परमानंद-माधवम् ॥

* * * *

जयांचें केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचें अधिकरण ।
तेचि वंदूं चरण । श्रीगुरूचे ॥ १ ॥
जयांचेनि आठवें । शब्दसृष्टि आंगवे ।
सारस्वत आघवें । जिव्हेंसि ये ॥ २ ॥
वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारुष म्हणे ।
रस होती वोळंगणें । अक्षरांसि ॥ ३ ॥
भावाचें अवतरण । अवतरवी निजखूण ।
हाता चढे संपूर्ण । तत्त्वबोध ॥ ४ ॥
श्रीसद्गुरूचे पाय । जैं हृदय गवसूनि ठाय ।
तैं एवढें भाग्य होय । उन्मेषासि ॥ ५ ॥

ज्ञानदेवी.

१. तुतींचे किंवा एरंडाचे पानांत रेशीम आहे; परंतु त्याचा परिचय दाखविण्यास रेशमी किडा लागतो. काव्य हें तृणपुष्पापासून तों प्रचंड सूर्यमालेपर्यंत आनखाग्र भरलें आहे, परंतु त्याची ओळख कवींचे दृष्टीसच पटते. अखंड विश्व ज्ञानपूर्ण आहे, परंतु हें ज्ञातेच जाणतात. याच न्यायानें परमात्मा चराचर भाव व्यापून उरला आहे, तथापि त्याची प्रतीति फक्त भाविकाचे हृदयासच येते, हें उघडच आहे.

*　　　　*　　　　*

२. सागराला सरित्पति किंवा सरस्वान् म्हणतात, तथापि सागर म्हणजे केवळ निखिल सरितांचे पाण्याची बेरिज एवढेंच नसून तिजहून अधिक आहे; त्याचप्रमाणें परमात्मा म्हणजे केवळ अखिल जीवात्म्यांची किंवा विश्वाभूतांची गोळा बेरीज एवढाच नसून त्याही पलीकडे आहे आणि म्हणूनच 'अत्यतिष्ठद्दशांगुलं' असें श्रुति आपणास सांगते.

*　　　　*　　　　*

३. अपूर्णाची किंवा व्यंगाची स्तुति करणें मोठें अवघड. एकादी काळी स्त्री किंवा काणा मनुष्य आहे, अशांना चंद्रकला किंवा कमलनेत्र म्हणून स्तवावें, तरी आपणास मुद्दाम हिणवतात असें वाटून राग येतो. बरें, अमावास्या किंवा विरूपाक्ष म्हणावें तरी आपलें व्यंग बाहेर आणिलें म्हणून तीं खिजतात. सारांश,

'उष्णो दहति चांगारः शीतः कृष्णायतेकरः' अशी दुहेरी पंचाईत आहे. आणि म्हणूनच शहाण्यांनीं सांगितलें आहे कीं, 'स्तुती करावी परमेश्वराची। करूं नये व्यर्थ कधीं नराची। कारण, मनुष्य किती झाला तरी अपूर्णच असणार व अपूर्णाची स्तुति म्हणजे वरचेसारखा प्रकार होणार.

४. परमेश्वराची गोष्ट तशी नाहीं. तो पूर्ण आहे, अव्यंग आहे. (पूर्णः पूरयिता पुण्यः ॥ वेदो वेदविदव्यंगो ॥–विष्णुसहस्रनाम). आणि म्हणूनच त्याला कांहीं म्हटलें तरी चालतें. "तुका म्हणे जें जें बोला। तें तें साजे या विठ्ठला। त्याला "चोरजार-शिखामणी" म्हटलें तरी कबूल. "पवित्राणां पवित्रं यो मंगलानांच मंगलं" म्हटलें, तरी शोभतेंच आहे. शंकराला कफल्लक म्हटलें तरी ठीकच आहे, जवळ इस्टेट तीन दमड्यांचीही नाहीं. बरें ईश्वर (ऐश्वर्यवान्) म्हटलें तरी शोभतेंच आहे. मांजर कशींही उडी झोंको तें पायांवर सांवरावयाचें, तोंडघशीं पडावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें ईश्वराची स्तुति वेडीवांकडी करा कीं उजू करा; व्यर्थ जावयाची नाहीं. म्हणूनच म्हटलें आहे कीं, स्तुतीस कीं, ईश्वर पात्र होतो। तसा तिला मानव काय होतो ॥

५. फुटके पात्रांत तुम्ही मोठें अमृत ओतिलें, तरी फळ काय? एवढा उंची पदार्थ मातींत सांडून मात्र जाणार, आणि तुमचे श्रम व्यर्थ होणार; त्यापेक्षां तें अभंग पात्रांत ओतल्यास स्थिर तरी

राहील. याचप्रमाणें मनुष्य म्हणजे घडघडीत फुटकें पात्र; त्यावर अगदीं अमृततुल्य स्तुतीचा वर्षाव केला, तरी फायदा काय?—सर्व मातींत जाणार. त्यापेक्षां जो **अभंग** परमात्मा त्याचे ठिकाणीं स्तुति अर्पिली असतां शाश्वत संग्रहीं तरी राहील; याकरितां आमचे सत्कवींनीं ईशस्तवनांतच वाणी वेंचली. नश्वरवस्तूंचें स्तोत्र करीत बसले नाहींत. परंतु कांहीं आधुनिक म्हणतात त्यांनीं ' डॅफोडिल्स '-वर कविता लिहिली नाहीं, त्या अर्थीं ते कविच नव्हत !

६. वडिलांची म्हण आहे कीं, मुलगी करणें ती गरीबाची करावी व देणें ती श्रीमंताला द्यावी. याही न्यायाप्रमाणें पहातां आम्हां गरीब भक्तांना, आपली स्तुतिरूप कन्या सकलैश्वर्यसंपन्न लक्ष्मी-पतीला अर्पण कशी करावी म्हणून संकोच वाटण्याचें कारण नाहीं व त्यालाही तिचा स्वीकार करण्यांत कमीपणा नाहीं. आणि म्हणूनच तुकाराम धटाईनें म्हणतात—' वेडें वांकुडें गाईन, दास तुझा म्हणवीन ' किंवा मयूरपंत म्हणतात—" हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदा जो पिशी । असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ॥

* * *

७. परमात्म्याला उपमा देणें म्हणजे त्याचा अप-मान करणें आहे. कारण उपमेंत उपमान हें उपमेयापेक्षां वरिष्ठ असणें इष्ट असतें. परंतु परमात्माहून वरिष्ठ कांहींच नसल्यानें सर्वदा नीचो-

पमेचाच आश्रय करावा लागतो. आम्ही आपलेकडून 'कोटि-सूर्य-समप्रभ' जरी म्हटलें, तरी काय? उरफाटाच न्याय. पण सोन्याची तुलना करण्याला सोन्याचीं वजनें कुठे असतात? गुंजा, गोटे इत्यादि तुच्छ जिनसाच असतात, असें म्हणून आपलें समाधान करून घेणें भाग आहे. शिवाय सोनें व गुंजा जरी एका तोलांत घातलीं तरी सोन्याची किंमत सोन्याला व गुंजेची किंमत गुंजेला. याचप्रमाणें आमचे शब्दांचें दौर्बल्य परमात्माचे प्रभुत्वाची हानि करूं शकत नाहीं.

*   *   *

८. TILLOTSON म्हणतो:-"If God were not a necessary being of himself, he might almost seem to be made for the use and benefit of men" म्ह० ईश्वराचे अस्तित्वाची स्वतःसिद्ध जरूरी नसली तरी, शहाण्यांनीं मनुष्यांच्या हितासाठीं जरूर म्हणून तो निर्मिला तरी असला पाहिजे. असो. साहेबांचा इतका कबूलजबाब झाला तरी थोडा नाहीं; तोतया कां होईना, हितकर्ता आहे हें जर सर्ववादिसंमत आहे, तर त्याला मान देण्यांत चूक नाहीं हें खास. बीजगणितांत एखादी गैरसोईची संख्या आली असतां पदरची संख्या घेऊन तिचा उजू उलगडा करून घ्यावा लागतो; त्यावांचून गत्यंतर नाहीं, हें निश्चित. एवंच ईश्वराचें अगत्य सर्वांस भासत आहे.

९. व्हाल्टेअर (Voltaire) म्हणे कीं, If there were no God it would be necessary to invent him.' म्हणजे ईश्वर म्हणून कोणी जर सहजसिद्ध नसेल तर तो मुद्दाम निर्माण तरी करणें भाग येईल. उघडच आहे, जेथें लोकसत्ताक किंवा प्रजा-सत्ताक राज्य असतें, तेथें पिढीजाद चालत आलेला असा राजा किंवा नियंता म्हणून कोणी नसतो. पण ही स्थिति कोणालाच इष्ट वाटत नसल्यानें, असले स्वातंत्र्यप्रियलोकही व्यवहार-तंत्राच्या सुरळितपणा-साठीं आपण होऊन एक अधिपति निर्माण करितात. अर्थात् नियमन व नियंता प्राणिमात्राला इष्ट नसले तरी जरूरच आहेत. आतां कोणी म्हणतील कीं प्रजासत्ताकांतील अधिपति लोकमताचा असल्यानें इष्ट वाटतो. ठीक आहे. आमचा देवबापा जर "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्." अशा प्रकारचा गोड, न्यायपूर्ण व सर्वांच्या सवलतीचा जाहिरनामा देऊन लोकतंत्राचा पत्कर घेत आहे, तर मग त्याला आम्ही नाखुष कां असावें? अर्थात्च, अशा ईश्वराचा अव्हेर मूर्ख करतील.

* * *

१०. Roux—रो म्हणतो कीं "God often visits us but most of the time we are not at home." म्हणजे ईश्वर आम्हांस पुष्कळदां भेटण्यास येतो; पण बहुधा आम्हीच त्याला घरांत आढळत नाहीं. खरी गोष्ट. परमेश्वर आपले सान्निध्याची

प्रत्येक मनुष्यास कितीदां तरी साक्षी देतो; पण मनुष्य आपल्याच धुंदींत असल्यामुळें त्याला त्याची दादही नसते.

११. तोच Roux म्हणे कीं, "Philosophers call God 'The great unknown'. The great mis-known would be more correct." म्ह० तत्त्ववेत्ते ईश्वराला अज्ञात महानुभाव असें म्हणतात; पण त्याहीपेक्षां त्याला अ-यथा-ज्ञात महात्मा असें म्हणणें हें अधिक खरें होईल. सारांश, मनुष्याला ईश्वराचें ज्ञान अगम्य नाहीं. परंतु, मनुष्य आपल्या मस्तीनें त्याचें सत्यज्ञान करून न घेतां त्याबद्दल वाटेल तें बोलत सुटतो.

*　　　　*　　　　*

१२. शब्दांपासून अर्थबोध कसा होतो, हें एक गूढच आहे. कारण, एक न्यायशास्त्री म्हणतो कीं, 'घोडा' हा शब्द वक्ता उच्चारितो व श्रोता त्यावरून 'एक जातीचा चतुष्पाद' समजतो. पण हें होतें कसें? कारण या समर्याद सृष्टींत अनुक्रमाशिवाय वर्णोच्चार शक्य नाहीं. अर्थात् प्रथम 'घो' उच्चारून पुरा करावा तेव्हां 'डा' उच्चारावा. पण 'घो' हा ध्वनि उच्चारतांच आका-शांत मिळून नाहींसा झाला; त्याची आणि पुढल्या 'डा' ची गांठ कशी पडावी? बरें ही गांठ न पडेल तर अनर्थ होणार. 'घो' म्हणजे 'नवरा,' 'डा' म्ह० 'डाक्तर.' असा पृथक् बोध घेतल्यास अविवक्षितार्थ-प्रत्यय येऊं पाहील. तेव्हां या गत

व आगामी किंवा भूत व भविष्य यांना वर्तमानांत एकत्र गांठणारा किंवा यांचें एका पाटीं लग्न लावणारा कोणी तरी आचार्य असलाच पाहिजे. आणि हा जो कोणी तोच साक्षी, तोच विश्वरूप, तोच दिकालाद्यनवच्छिन्न, तोच 'हृदयस्थो जनार्दनः'.

* * *

१३. आजकालच्या खगोलशास्त्रज्ञांनीं सूर्यादि प्रचंड गोलांचींही मापें, प्रकृति, वजनें शोधून काढिलीं आहेत. पण हें एखाद्या निरक्षराला सांगितलें असतां तो मिथ्या मानील व म्हणेल कीं, सूर्यादिग्रह कोठें व हा शास्त्री कोठें! शिवाय, असले प्रचंड गोलांचें माप, वजन काढिलें म्हणतां, तर ते कोणत्या पारड्यांत घातले? पण सुशिक्षित लोकांना हें कोडें पडत नाहीं. ते जाणतात कीं, या दूरस्थ गोलांची प्रकृति ओळखण्याला जागचें हालावें लागत नाहीं. दुर्बीण काम करिते; व गोल कितीही जगड्व्याळ झाले तरी **बुद्धीचे पारड्यांत** ते सहज मावूं शकतात. याचप्रमाणें परमात्मा जरी त्या दूरस्थ गोलांपेक्षांही स्थूळ दृष्टीचे टप्याबाहेर वाटला तरी बुद्धिरूप दुर्बिणीनें तो नजीक दिसूं शकतो व तो अनंत अपार असला तरी हृदयरूप पारड्यांत मावूं शकतो; व याच साधनांनीं अक्कलवंतांनीं त्याचा आजपर्यंत शोध केला.

१४. मिसर देशांतील अत्युच्च पिरामिडाची उंची मापण्यास एखाद्या अडाण्यास सांगितलें असतां, "मी त्याचे शिखराला

कसा चढूं व इतका लांब दोर कोठून आणूं' असें म्हणत तो बुचकळ्यांत पडेल; परंतु जर कोणा युक्तिवानाला किंवा शास्त्रज्ञाला हें काम सांगितलें तर तो तत्काळ त्या इमारतीची भूमिगत छाया मापील व तिचें दुसऱ्या एकाद्या पदार्थाचे छायेशीं प्रमाण घेऊन त्या इमारतीची बिनचूक उंची वर न चढतां सांगेल. याचप्रमाणें जे शहाणे आहेत ते प्रत्यक्ष परमात्माची उंची खोली मापतां आली नाहीं तरी इतर वस्तूंचे प्रमाणतारतम्यानें ती ओळखूं शकतात.

* * * *

१५. जगतांत कधीं कधीं भला माणूस विपत्तींत असतो व दुष्ट मनुष्य चैन भोगतो. अशा वेळीं आपल्याला वाटतें कीं, "हा काय देवाघरीं न्याय ? जो इतका भिऊन निष्पापपणें चालतो त्याला अन्न नाहीं; आणि जो लोकांचीं उभीं घरें जाळतो तो पलंगावर लोळतो आहे ! देवा, कसेरे तूं डोळे झांकले आहेस ?"—पण खरी गोष्ट अशी आहे कीं, त्या दुष्टाची जी दिवसा मशाल जळत आहे, ती देवानें डोळे झांकले आहेत म्हणून नव्हे, किंवा देव अन्यायी आहे म्हणून नव्हे. तर देव नितांत न्यायप्रिय व सदैव जागृत आहे, म्हणूनच असें पुराणांतील गोष्टींवरून ध्यानांत येतें.

१६. पुराणांत पहावें तों वेळोवेळीं दैत्यांनीं अत्युग्रतपस्यापूर्वक देवताराधन करून शिव-विष्णवादिदेव प्रसन्न करून त्यांजपासून बिकट वर मागून घ्यावे, आणि त्या वरांचे बळानें मत्त होऊन

देवांचेच बोकांडीं बसावें. हा प्रकार वाचून असें वाटतें कीं; पुनः पुनः ठेंचा लागत असतांना व आपलींच वरप्रदानें आपणांस बाधक होतात हें अनेकदां पहात असतांना, देव या दैत्यांना पुनरपि वर देतच, असे हे मतिमंद कसे? एकदां ठेच लागल्या-वर त्यांनीं शहाणें होऊं नये काय? पण, याचें उत्तर असें आहे कीं, देव मतिमंद नव्हत; तर अत्यंत सत्यप्रिय आहेत. सिव्हिल-सर्विस पास होईल त्याला जज्जाची किंवा कलेक्टरची जागा द्याव-याची असा एकदां कायदा केला, मग त्यांत जात, धर्म पाहणें नाहीं. त्याचप्रमाणें आपली आराधना करील त्यास वर द्यावयाचा हा कायदा ठरला. मग त्या आराधकाचें सुष्टदुष्टपण पहायचें-नाहीं, हाच मुद्दा.

१७. शंकरांनीं भस्मासुराला वर दिला. त्यानें तो त्यांचेच मागें लागला. तेव्हां शंकर बिचारे तोंडास फेंस येई तों पळत सुटले; हें काय? त्या मर्कटाला बलिष्ठ करण्याचें ज्याचे अंगीं सामर्थ्य होतें, त्याचेच अंगीं त्याला निश्चेष्ट करण्याचें नव्हतें काय? पण तसें नाहीं. 'विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयंछेत्तुमसांप्रतम्.' एकदां वाणीनें दिलें तें दिलें. हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, हाच मासला. आतां कोणी म्हणतील कीं, एक वेळ देवांचा हा कायदा ठीक झाला, परंतु ते दुष्ट जर जगताला त्रास देऊं लागले तर त्यांचें नियमन नको काय करायला? अलबत पाहिजे; व तें देवांनीं वेळोवेळीं केलेंही.

पण, न्याय ढळूं न देतां. हिरण्यकशिपूला इतके आटोकाट वर दिले होते; तथापि त्याला लिहून दिलेल्या कलमबंदीला तिळभर ढका न लावतां, तशा कोंडींतून वाट फोडून गडी मारिला. पण दिलेल्या वचनाला बाध आणिला नाहीं. याला म्हणतात न्याय-प्रियता व यालाच म्हणतात खरा कारकुनी पेंच. अन्यायानें लुबाडणें किंवा विश्वास-घात करणें ही कारकुनी नव्हे.

* * * *

१८. माता, पिता, सद्गुरु यांजविषयीं आपण आपले मनांत जितकी जितकी उच्च भावना धरूं तितकें तितकें आपलें हित किंवा कार्य अधिक होईल, असें शास्त्र सांगतें. यासाठीं तीं आपल्यासारखींच नाका-डोळ्यांचीं माणसें आहेत, ही भावना न ठेवतां तीं केवळ देवस्वरूप आहेत, उच्चतम आहेत, अशीच भावना ठेवावी; म्हणजे तीं वस्तुतः कशीं असलीं तरी आपल्याला केवळ **भावनाबळानें** अत्यंत फलद्रूप होतात. हें ऐकून कांहीं लोकांना असें वाटतें कीं, अंगीं वास्तविक महत्त्व नसतां नुसतें उंचावर चढविल्यानें काय अधिक होणार ? पण गतिशास्त्राचा एक नियम आहे कीं, कोणताही पदार्थ जों जों अधिक उंच अंतरावर चढवावा तों तों अंतराचे वर्गाचे प्रमाणानें त्याचा वेग वाढतो. अर्थात् पदार्थ तोच पण केवळ उच्चस्थानामुळें त्याचें सामर्थ्य वाढतें, हें शास्त्रसिद्ध आहे. हाच न्याय भावनेचा आहे.

१९. कोणी म्हणतील कीं, कोणत्या तरी एका शास्त्राचीं प्रमेयें दुसऱ्या कोणत्या तरी शास्त्राला लावून दाखविल्यानें काम भागत नाहीं, अनुभव पाहिजे. तर महाभारतांत एकलव्य निषादाची गोष्ट सुप्रसिद्ध आहे. गुरुद्रोणांनीं कौरवपांडवांना प्रत्यक्ष मेहनत घेऊन धनुर्नैपुण्य दिलें. परंतु, हा एकलव्य निषाद समक्ष एक वेळही तालीम न घेतां केवळ गुरुद्रोणाची मृण्मय मूर्ति करून व तिचे ठिकाणीं हे प्रत्यक्ष द्रोणाचार्यच आहेत अशी उच्चतम **भावना** राखून स्वबुद्धीनेंच धनुर्विद्येचा अभ्यास करूं लागला, व अखेर त्या विद्येंत इतका निष्णात झाला कीं, पुढें कांहीं प्रसंगानें त्याचें तें कौशल्य द्रोणगुरूंच्या दृष्टीस पडतांच तेही विस्मित झाले, व तुझा गुरु कोण म्हणून त्यांनीं त्याला विचारलें, तेव्हां त्यानें खरा प्रकार सांगितला. या गोष्टीचा अनुभव आजही येऊं शकेल असें आम्ही खात्रीनें सांगतों. म्हणून माता, पिता, गुरु यांजविषयीं आपण जितकी जितकी भावना उच्चतर धरूं तितकें तितकें आपलें कल्याण अधिक होईल.

२०. आजकाल पैशापासरी शिक्षणाच्या शाळा झाल्या व रुपयाला पांच गुरु मिळूं लागले. यामुळें विद्यार्थिवर्गाचे ठिकाणीं गुरुवर्गाविषयीं आदरबुद्धी फार खालावली, बहुतेक शून्याजवळ आली अशी सर्वत्र ओरड आहे, व ती खरी आहे. परंतु, विद्यार्थिजनांनीं हें तत्त्व सदा ध्यानांत ठेवावें कीं, गुरूला जो मान

द्यावयाचा तो त्याचे योग्यतेसाठीं देण्यापेक्षां आपले कल्याणासाठीं द्यावयाचा आहे. आणि हा मान आपण ज्या प्रमाणानें देऊं त्या प्रमाणानें आपलें कल्याण खास होईल. हाच कायदा माता, पिता, वडील व पारमार्थिक गुरूंबद्दलही समजावा. आणि वरील एकलव्याचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवावें. आजकाल युरोप-अमेरिकेंत "Faith cure" म्हणजे केवळ भावनाबळानें व्याधिहरण होतें, हा सिद्धांत जोरानें पुढें येत आहे. हा तरी वरील प्रमेयाचाच पुरावा आहे.

२१. सामान्याची दृष्टि नेहमीं स्थूलावर (बाह्यांगावर) असते, तदंतर्गत सूक्ष्मतत्त्वांवर नसते; व यामुळें त्याचे हातून फार प्रमाद होतात. हल्लींचे विद्यार्थी एकादे वर्गशिक्षकाला मान देत असलेच तर ते त्याच्या विद्वत्तादिगुणां-करितां व त्या मानानेंच देतात. परंतु आमचे मतें, गुरूला मान देण्याचें बीज निराळेंच आहे. हा मान त्याचे विद्वत्तेला देण्यापेक्षां त्याचे जिव्हाळ्याला द्यावयाचा असतो. तो जिव्हाळा म्हणजे "माझा शिष्य मजहूनही अधिक धन्य व्हावा, मी बी. ए. असलों तर हा एम्, ए, एल्, एल् डी, व्हावा" इत्याकारक जी गुरूची कळकळ तोच. आणि ही कळकळ ज्याचे हृदयांत वसत नसेल तो गुरुपदवीला पात्रच नाहीं. पण असा विरळाच भेटेल. आणि हें जर खरें, तर अशा प्रेमळाला जे मान देत नसतील ते कृतघ्न किंवा गुरुद्रोही म्हटले पाहिजेत. म्हणून

विद्यार्थ्यांनीं गुरूच्या इतर गुणांकडे न पाहतां ह्या त्याच्या जिव्हाळ्याकडे सतत लक्ष ठेवून वागावें.

*　　　*　　　*

२२. एकलव्याच्या ह्या वरील ऐतिहासिक पुराव्यावरून पाषाणादिकांच्या मूर्तींचे ठिकाणीं परमात्मभावना ठेवून सगुणोपासना करणारांना इष्टप्राप्ति होईल कीं नाहीं, याविषयीं कोणाही विचारी मनुष्याला संदेह उरण्याचें कारण नाहीं. अनुभवी साधुसंतांचे तर या कामीं शेरे निभ्रांतच आहेत. तुकाराम म्हणतात, "**भाव धरी तरी। तारील पाषाण ॥**" "**भावे हि विद्यते देवस्तस्माद्भावोहि कारणं,**" हेंही वचन याच सिद्धांताला पुष्टि देत आहे.

२३. भावाचे ठिकाणीं इतकें अतर्क्य सामर्थ्य आलें कुठून? असा कोणी प्रश्न केल्यास त्याचें उत्तर–'तें त्याचे ठिकाणीं उत्पत्ति-सिद्धच दिसून येतें, तें त्याला कोणी उसनें दिलें नाहीं.' कारण वैय्याकरणांना हें ठाऊक आहे कीं "भाव" हा शब्द 'भू–सत्तायां–ह्म० होणें, असणें-' या धातूचें प्रयोजकरूप होऊन बनला आहे. 'भव' हें मूळरूप व 'भाव' हें प्रयोजक. आतां व्याकरणाचे दृष्टीनें पहातां 'प्रयोजक' हें मूळरूपापेक्षां नेहमीं बलवत्तर असतें. उ०–चाकर काम करितो (मूळरूप); धनी चाकराकडून काम करवितो (प्रयोजक).–अर्थात् करणारापेक्षां करविणाराचे अंगांत सत्ता अधिकः नोकरापेक्षां धन्याची सत्ता वर-

चढ, हें कोणालाही कळणारें आहे. याच न्यायानें 'भावाचें' सामर्थ्य, 'भवा'पेक्षांही अधिक असणार, हें उघड आहे. आणि म्हणूनच 'तस्माद्भावोही **कारणं**' या श्लोकांत, भावाला कारण ऊर्फ कारक म्हणजे **प्रयोजक** म्हटलें आहे, हें हिशोबीच आहे.

२४. वर 'भावाला' 'कारण' म्हटलें आहे व तें कसें हें व्युत्पत्ति-बळानें सिद्ध करून दाखविलें आहेच. कोशांत 'कारणा-लाच' 'बीज' असाही अपर पर्याय आहे. आणि बीजाचें सामर्थ्य सर्वांस गोचर आहेच. वट, पिप्पलादि वृक्षांचें बीज किती किती सूक्ष्म असतें, परंतु त्याचा प्रभाव फारच प्रचंड असतो. कारण, तेवढेंसें बीज पंचतत्त्वांचे अंश आपल्यांत ओढून घेऊन व 'आत्म-सात्' करून केवढा तरी विस्तीर्ण तरु उभारतें. याचप्रमाणें **भावाची** सूक्ष्मताही अशाच अचाट सामर्थ्यानें परिपूर्ण असते. बीज जसें बसले जागीं पंचमहाभूतांना आपल्यांत आकर्षून घेऊन वृद्धिंगत होतें, तसाच भाविक भक्त आपल्या भावाचे बळानें बसल्या-ठिकाणीं त्या [१]महद्भूतालाही आपल्यांत खेंचून घेऊन पुष्ट होतो.

२५. तुकारामानें सांगितलें कीं '**भाव धरी तरी तारील पाषाण**। आणि हें आपलें बोलणें स्वांगीं सिद्धही करून दाखविलें. कारण 'तो सतनु मुक्त झाला'—हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. आणि

---

१ एको विष्णुर्महद्भूतम् ।

तो कोणाचे बळावर?—तर, पंढरीनाथाचे पाषाण—(वाळुकामय) मूर्तीचे बळावर. आतां, हें तारकसामर्थ्य जर त्या पाषाणमूर्तीचें असतें, तर आजही त्या मूर्तीपुढें प्रहरानुप्रहर नाचणारे आहेत. तथापि तुकारामाप्रमाणें 'टाळ आणि कंथा' राहो, पण नुसती लंगोटी देखील बरोबर नेतांना यांतील कोणी आढळत नाहींत. याचें कारण काय? तर तुकाराम ज्या मूर्तीपुढें नाचत होता तीच मूर्ति जरी त्यांपुढें उभी आहे, तरी तुकारामाचे भावाचें जें दार्ढ्य होतें तें त्यांच्यांत नाहीं. याशिवाय दुसरें उत्तरच नाहीं.

२६. तुकारामाचें हें उदाहरण कोणाला अविश्वसनीय वाटेल. तर व्यवहारांतही याचा अनुभव आहे कीं नाहीं हें पाहूं. एकादा मनुष्य पाय निसरल्यामुळें एकाद्या विहरींत किंवा डबक्यांत पडतो, आणि कांठाला एकादी कपारी किंवा दगड किंवा झाडाची मुळकुंडी हातीं आली असतां तीवर भार देऊन वर येतो. या ठिकाणीं आपले सर्व शरीराचा भार आपले मनगटावर उभारण्याचें सामर्थ्य जर त्याचे अंगीं नसेल तर कपारी हातीं लागूनही तो वर येऊं शकणार नाहीं. फलतः, पाषाण हा निमित्त आहे. खरी तारकशक्ति पतिताचें आत्मसामर्थ्यच होय, हाच न्याय आध्यात्मिक उद्धारास लागू आहे. म्हणूनच भगवंतांनीं 'उद्धरेदात्मनात्मानं' असें जीवांस सांगितलें.

२७. एखाद्या तालमीचे आखाड्यांत जावें तों लांकडाचे किंवा

दगडाचे हत्तींवर जोर देऊन जेठी तालीम करीत असतात व हाच क्रम दृढ चालू ठेवल्यानें पाषाणाप्रमाणेंच दृढदेही बनतात. पण हें दार्ढ्य त्या पाषाणाचें कीं यांच्या निश्चयाचें, हें जे विवेकी आहेत त्यांना सहज उलगडणारें आहे. हत्तींचे दगडांतील शक्तिवर्धकत्व हें निमित्तमात्र आहे. खरोखर तो जेठी आपल्या अंगचे शक्तीनें आपली शक्ति वाढवीत असतो यांत वाद नाहीं. निदान ही गोष्ट त्यांतील प्रधान हेतु आहे, हें स्पष्ट आहे.

२८. सुप्रसिद्ध मल्ल सँडो यांनीं शरीर कमावणीचीं कांहीं उपकरणें (apparatus) निर्माण केलीं व यांचें योगानें माझ्याप्रमाणेंच कोणीही जेठी बनूं शकेल असें जाहीर केलें. त्यावरून शेंकडोंनीं पैसे खर्चून तीं महागाईचीं उपकरणें खरेदी केलीं. परंतु खरेदी करणारांपैकीं प्रति सँडो कितीसे झाले? कोठें बोभाटा तर कानीं आलेला नाहीं. याचें कारण काय? सँडोचें म्हणणें लटपटीचें?—किंवा साधनें लटकीं?—दोन्ही नव्हत. अनुयायांचा किंवा उपासकांचा निश्चय किंवा भाव लटका हेंच तथ्य.

२९. हेंच तत्त्व लक्षांत घेऊन वसिष्ठ महर्षींनीं प्रभु रामचंद्राला सांगितलें कीं, "उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्र पालनं। ज्ञप्तेस्तु कारणं विद्धि शिष्यप्रज्ञैव केवलं। म्ह० गुरुशिष्य ही सोय केवळ व्यवस्थेकरितां करून ठेविली आहे. खरें, पाहतां शिष्याची प्रज्ञा हीच त्याचे ज्ञानाला किंवा उद्धाराला कारण आहे. हें

शाळांतील आजकालचे विद्यार्थ्यांनीं ध्यानांत वागवून, गुरूंचा आदर करावा.

* * *

३०. रेव्हरंड ईव्हन्स या गृहस्थानें मानसिक चिकित्सा (Mental Medicine) शास्त्रावर एक ग्रंथ लिहिला असून त्यांत तो स्वानुभवानें प्रतिज्ञेवर असें सांगतो कीं " मी झऱ्याचें ताजें पाणी एका पेल्यांत भरून तो पेला माझे डावे हातावर घेऊन आणि अमुक वस्तूचे गुण या पाण्यांत उतरावे, अशी मनाची दृढ भावना करून उजव्या हाताचे बोटांनीं त्यावर भारण्या टाकितों व पांच मिनिटांचे आंत मला असा अनुभव येतो कीं, मी जर हें पाणी गुलाबपाणी व्हावें अशी भावना धरली असली, तर त्या पाण्याला गुलाबाचा वास येऊं लागतो. व अफूच्या अर्काची भावना केली असली तर तेंच पाणी अफूसारखा कडू वास देतें व अफूच्या अर्काची कामगिरी रोग्यावर करितें." यावरून भावनेचे अंगीं नसत्याचें असतें करण्याचें सामर्थ्य कसें आहे, हें लक्ष्यांत ध्यावें व तदनुसार वागावें.

३१. कांहीं विशिष्ट कालीं मनाच्या विशिष्ट अवस्थेंत भावनेचें हें सामर्थ्य फारच ताबडतोब व अचूक रीतीनें अनुभवास येतें. स्त्रियांचा गर्भधारणेचा क्षण हा या अवस्थांपैकींच आहे. या क्षणीं स्त्रीच्या वृत्तीवर जो भाव उभा असेल तोच अपत्याचे

ठायीं उमटतो; किंबहुना अपत्यरूपानें उमटतो, अशाविषयीं जननशास्त्रावरील अनेक ग्रंथांत बळकट पुरावे आहेत. शिवाय कित्येक चतुरस्त्रिया स्वानुभवानेंही हें जाणतात असें कळतें. हें गूढ व उपयुक्त प्रमेय स्त्रीपुरुषांस ठसावें म्हणून व्यास महर्षींनीं धृतराष्ट्र, पंडु व विदुर यांचे जन्मवृत्ताचे रूपानें सर्वांस महशूर केलें आहे. (बाकी याचा फायदा किती दांपत्यें घेत असतील न कळे). ही गोष्ट मानवी स्त्रियांसच लागू नसून अजाश्विनींपर्यंत व्यापून आहे. हें अनुभवून तरी भावनेचें सामर्थ्य मनुष्यांनीं शिकावें.

३२. याचप्रमाणें भावाचा शीघ्र परिणाम घडून आणणारी दुसरी अवस्था म्हणजे अंतकाल. देह-प्राणांचा (आत्म्याचा) वियोग होण्याचा जो क्षण त्या क्षणीं जो भाव वृत्तीचे ठिकाणीं रुजू असेल तो पुढील जन्मांत उमटतो. मृगबाळाचें वेड लागून मरण पावणारा जडभरत हा ह्या सिद्धांताचें सुप्रसिद्ध उदाहरण आहे. भगवंतांनीं हा कायदा प्राणिमात्राच्या हितासाठीं भगवद्गीतेंत स्पष्ट करून दाखविला आहे. भगवान् म्हणतातः— "यं यं वापिस्मरन् भावं त्यजत्यंते कलेवरं । तं तमेवैतिकौंतेय सदा मद्भावभावितः" । "अंते मतिः सा गतिः" ह्या वाक्यानें तरी हेंच तत्त्व जाहीर केलें आहे.

३३. वरील दोन बोलांत दिलेल्या रहस्यांचीं एकवाक्यता जो कोणी करून पाहील त्याला कळून येईल कीं, परमेश्वरानें

केवढी मोठी गुरुकिल्ली मनुष्याचे हातीं दिली आहे. या देहांत अमुक प्रकारें येणें व या देहांतून अमुक प्रकारें जाणें ह्या दोन्ही गोष्टी एक प्रकारें मनुष्याच्या स्वाधीन केल्या आहेत. आणि एवढें दिल्यावर आणखी काय द्यावयास पाहिजे ? परंतु पिकल्या झाडाखालीं उपाशीं मरणाऱ्या मूढांना कल्पवृक्ष भेटूनही उपयोग काय ?

३४. समर्थ रामदास वगैरे कांहीं अलौकिक पुरुषांचें जीवनवृत्त वाचिलें असतां असें आढळून येतें कीं, त्यांच्या पूर्वजांनीं किंवा मातापित्यांनीं सूर्याची, गणपतीची किंवा अन्य कोणा देवतेची दीर्घकाल दृढ उपासना केली व तीमुळें पुढें असली दिव्य संतति झाली. आतां या कामीं देवतादिकांची कृपा ही धार्मिक कल्पना जरी एक वेळ बाजूस ठेविली, तरी वरील भावतत्त्वाप्रमाणेंही ही गोष्ट शक्य ठरते. कारण मनुष्य जेव्हां कांहीं विशिष्ट उद्देशानें एकादी उपासना करितो, तेव्हां त्याचे वृत्तींत त्या उद्देशाला पोषक असाच **भाव** प्रायः अखंड उभा असतो, आणि मागील बोलांत दाखविल्याप्रमाणें त्या भावाचेच सामर्थ्यानें इष्टार्थसिद्धि होते.

३५. एतावतः 'भाव' हा एक चिंतामणि आहे हें सिद्ध झालें. आणि ह्याची प्रसन्नता करून घेतली असतां आम्हांस वाटेल तें प्राप्त होईल हें खास. असें असून आमची अशी दशा कां ?

तर मोरोपंत म्हणतात 'वरहि वरायास पाहिजे समज.' दाता जरी वाटेल तें देऊं शकला तरी मागणाराला अक्कल पाहिजे, नाहीं तर व्यर्थ. एका भिक्षुकानें देवता प्रसन्न करून घेऊन तिजपाशीं त्रिभुवनैकसुंदरी अशी स्त्री मागितली. पण ती स्त्री राजानें हिरावून नेली; तेव्हां तीच अस्वल होवो म्हणून मागितलें; तेव्हां राजानें ती भिक्षुकाकडे परत केली असतां भिक्षुकाला प्रेमानें कुरवाळूं लागली, पण तें अस्वली प्रेम बिचाऱ्याला सोसेना. तेव्हां ती पूर्व रूप होऊं दे' म्हणून मागितलें. एवंच सर्व फुकट झालें. तसाच प्रकार आम्हांपैकीं बहुतेकांचा होत असतो.

३६. जननशास्त्रावरील एका इंग्रजी ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, एका कल्पक गृहस्थानें एक खोली सर्वत्र (खालीं, वर, बाजूंस) जांभळे कपड्यानें मढवून मग तींत एक सशाचें जोडपें ठेविलें. पुढें त्या खोलींत असतां ती मादी गर्भवती झाली. मग प्रसूति होई तों तें जोडपें त्या गृहस्थानें तेथेंच ठेविलें होतें. चमत्कार असा झाला कीं, त्या पिलांचा वर्ण जांभळा निपजला. सर्वभर दृष्टींत निळा रंग भरला असतां संततीचा वर्ण निळा बनतो इतकें जर भावनेचें सामर्थ्य मूढ पशूंचे ठायीं प्रत्ययास येतें तर " मन रामीं रंगलें " अशी ज्या सभाग्यांची खरोखर स्थिति होईल, ते रामरूप होणें अशक्य कां व्हावें? बिनखर्ची असून बहुमोल अशीं हीं तत्त्वें परमात्मानें

माणसास ज्ञात केली असतांही त्यांचा उपयोग करण्याची आम्हांस वासना होत नाहीं. याला देवानें काय करावें ?

* * * *

३७. कल्याणस्वामी-सारखा तयार शिष्य आणि त्याचे सद्गुरु यांत तफावत म्हणजे टांकसाळींत छाप मारण्यासाठीं घांसून, कानसून, वजनमाप करून तयार ठेवलेली रुप्याची चकती, व सार्वभौमाचा मुखवटा उमटवून 'रुपया' या संज्ञेला पावलेलें सिद्ध चलनी नाणें, यांतील अंतराइतकीच असते; आणि अशा शिष्यांसंबंधें " आपणासारिखे करीति तात्काळ । नाहीं काळवेळ मग त्यासीं । " ही म्हण खरी समजावी.

३८. जगाची चाल अशी आहे कीं, समर्थाचे गुणाची जो तो प्रशंसा करितो; पण तोच गुण गरिबांत असला तरी कोणी त्याकडे लक्षही देत नाहीं. नूरजहान किंवा महाराणी अलेक्झांड्रा यांचे रूपांची तारीफ सर्वतोमुखी आहे. त्यांच्यासारख्या रूपवती गरिबांतही असतील, पण त्यांचें कोणाचे कानीं पुरें नांवही येत नाहीं. याचप्रमाणें, " आपणासारिखे करीति तात्काळ," हें वचन सद्गुरूसंबंधानें सर्वत्र ऐकूं येतें. परंतु मला वाटतें हें सृष्टींतील प्रत्येक वस्तूचे ठिकाणीं वसतें आहे. मधीचा एक थेंब किंवा नुसता वास आपलें तोंड गोड करितो. चिंचेचा वास तें आंबट करितो, पुष्पाचा स्पर्श वृत्तीस प्रसन्नता व मार्दव आणितो. (कारण तें चुरडून

टाकण्याचें धैर्य आपले अंगीं रहात नाहीं.) हें त्या वस्तूंनीं **'आपणासारिखें' करणेंच** नव्हे काय?

३९. कोणी म्हणतील हें "आपणासारखें करणें" आम्हांस मान्य नाहीं. पुष्प तुम्हांला प्रसन्नता देतें परंतु पुष्पत्व देत नाहीं.– ठीक आहे. आपण कोणत्याही बगीच्यांत जावें तों तेथील भिन्न वृक्षांकडे पहातां प्रत्येकावर आपआपल्या प्रकारचीं पुष्पें, फळें आलेलीं असतात. बरें दुसऱ्या दृष्टीनें पहावें तों ते सर्वही भिन्न-वृक्ष त्याच विहिरीच्या किंवा पाटाच्या पाण्यानें व त्याच जमिनीचे मृदंशानें पोसलेले असतात; तेथील तेज, वायु, आकाश हीं पोषक तत्त्वेंही सर्वांची तींच असतात. असें असतां त्याच तत्त्वांना किंवा द्रव्यांना गुलाब गुलाबपणास पोंचवितो; आंबा आंबेपणास, संत्रा संत्रेपणास पोंचवितो; हें 'आपणासारखें करणेंच' नव्हे काय? जीव सृष्टींतही तेंच. दारचा कुत्रा व धनी हे जरी अगदीं तेंच अन्नपाणी खात असले आणि "अन्नाद्रेतः रेतसः पुरुषः" हा कायदा जरी उभयतांस साधारण असला, तरी "पुरुष" या शब्दास कुत्र्याच्या बीजपेशींत अर्थ पाहतां "कुत्रा" असाच आहे. व धन्याच्या, "मानवः" असा आढळतो. खनिजांत-देखील हाच नियम दिसतो. हें तर आत्मसात्करण खरें ना?

४०. अलीकडे क्रोमोपॅथी किंवा "सूर्यकिरणचिकित्सा" म्हणून एक शास्त्र बनतें आहे. या शास्त्रांत तांबडा, जांभळा,

पिंवळा, नारिंगी, हिरवा अशा भिन्न रंगाचे कांचेचे बाटल्यांत स्वच्छ झऱ्याचें पाणी भरून ऐन दुपारचे सूर्यकिरणांत तास दोन तास ठेवावें म्हणजे त्या त्या रंगाचे धर्माप्रमाणें आंतील पाण्यांत भिन्न धर्म उभे राहतात. तांबड्या रंगानें उत्तेजक धर्म, जांभळ्यानें शामक, नारिंगीनें सारक, इत्यादि. आतां त्याच सप्तरंगी सूर्यकिरणांत सर्व बाटल्या तापत असतात, असें असतां प्रत्येक बाटलींत सूर्यकिरणगत सातही रंगांचे गुण न उतरतां त्या त्या बाटलीचे रंगाचाच काय तो गुण उतरतो. म्हणजे तो रंग इतर सर्व रंगांना आत्मसात् करितो असेंच म्हटलें पाहिजे. एतावत: हें आत्मसात्करणसामर्थ्य केवळ सद्गुरूपाशींच नसून अनेक स्थावरजंगम वस्तूंत भरून आहे, असें दिसतें.

* * * *

४१. आस्थावरजंगम जर हें आत्मसात्करणसामर्थ्य वसतें आहे, तर मग " आपणासारखे करीति तात्काळ " म्हणून तुकाराम, शंकराचार्यांसारख्या सर्वज्ञांनीं सद्गुरूचाच एवढा ढोल कां पिटला, त्यांचेंच एवढें महत्त्व कां गाइलें, असा प्रश्न येतो. याचें उत्तर असें आहे कीं, सद्गुरूचें हें आत्मसात्करणासामर्थ्य जरी असाधारण नाहीं, तरी त्या आत्मसात्करणानें प्राप्त होणारी जी वस्तु तीमात्र अनन्यसाधारण किंबहुना ' एकमेवाद्वितीयं ' असल्या प्रकारची आहे. आणि म्हणून कार्यकारणांतील ऐक्याचे दृष्टीनें

प्राप्यवस्तूचे महत्त्वाचें श्रेय प्राप्त करून देणारास दिलें; एवढेंच. आणि असा व्यवहार अनेक ठिकाणीं आढळतो. असो. ही अनन्य-साधारण वस्तु म्हणजे "ज्ञान" आणि सद्गुरु हा या वस्तूचा दाता म्हणून त्याचे इतके पावाडे. ते ठीकच आहेत. आचार्य म्हणतातः--" दृष्टांतो नैव दृष्ट स्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः। येथें "ज्ञानदातुः" हें पद हेतु-गर्भ आहे. यावरूनही वरील सिद्धांतास बळकटी येते.

४२. कित्येक अडाणी लोकांना वाटतें कीं, ज्ञानाचें एवढें महत्त्व तें काय? ज्ञान काय चावावयाचें आहे? त्यापेक्षां उपभोग्य किंवा निर्वाहक वस्तूंचें महत्त्व अधिक. परंतु त्यांना हें समजत नाहीं कीं, त्यां वस्तूंचें महत्त्व ज्ञानामुळें. तुमचेजवळ अमोल हिरे आहेत. पण त्यांचें ज्ञान जर नाहीं तर ते असून फुकट. आणि म्हणूनच, हिरेवाल्या श्रीमंताला ज्याजवळ हिरे नाहींत, परंतु त्यांचे मूल्याचें ज्ञानमात्र आहे, अशा निर्धन परीक्षकाचे दारीं उभें रहावें लागतें. हिंदुस्थानांत वस्तुसृष्टीचें दारिद्र्य नाहीं. ज्ञानाचें दारिद्र्य आहे; आणि म्हणूनच तज्ज्ञांचे दारीं आम्हाला किंकर व्हावें लागत आहे. एतावतः ज्ञानाहून श्रेष्ठतर अशी वस्तु निखिल ब्रह्मांडांत नाहींच नाहीं. व त्यासारखें पवित्रही अन्य कांहीं नाहीं. असली ही अनन्य-साधारण वस्तु सद्गुरुपाशींच मिळते म्हणून धनाबद्दल जसा धन-वंताला मान देतात, तसाच या ज्ञानाबद्दल ज्ञानवंत सद्गुरूला मान देणें हें ओघानेंच येतें.

४३. धनासाठीं धनवंताला मान देणें हा जरी सामान्य व्यवहार आहे तरी त्यांतही थोडा पोटभेद आहे. उदंड धनवान् असून एक मितपंच किंवा कदर्यु ऊर्फ कंजुष आहे व दुसरा मुक्त-हस्त, दयाळू आणि उदार आहे, तर दुसऱ्याला जो सार्वत्रिक मान मिळतो तो पहिल्याला मिळत नाहीं, हें आपण पहातों. सद्गुरूंना तरी जो मान दिला जातो तो केवळ ज्ञानधनास्तव नसून तें धन अशेष जीवांचे कल्याणार्थ त्यांस देण्याचे कामीं जें अलौकिक औदार्य व दयालुत्व सद्गुरु प्रकट करितात, त्याबद्दल आहे. ते 'सायास करून शिकवितात' आणि यासाठींच 'त्यांचे उपकाराबद्दल उतराई कसें व्हावें हें समजत नाहीं,' म्हणून तुकारामासारखे सत्पुरुष ओरडतात.

४४. कालिदासानें पुत्रप्राप्तिसमयीं दिलीपाचे अलौकिक औदार्याचें वर्णन केलें. तथापि अशाही राजाबद्दल 'अदेयमासीत्त्रयमेवभूपतेः शशिप्रभंछत्रमुभेच चामरे । म्ह. शुभ्र राजछत्र व चामरें या तीन वस्तु त्यानें दिल्या नाहींत (देतां येतना). पण सद्गुरूचे औदार्यांत एवढी देखील शिलकी नाहीं. सद्गुरु सच्छिष्याला आपलें निःशेष सर्वस्व अर्पण करितात. आणि या अद्वितीय औदार्यामुळेंच तुकारामासारख्यांना 'काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवियेला ।' असें कबूल करण्याची पाळी आली. पहा बरें, जगद्गुरु कृष्णानें अर्जुनालाही प्रति-

'कृष्ण' करून सोडिलें (अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः । बीभत्सुर्विजयः कृष्णः । सव्यसाची धनंजयः ।), तेव्हां त्याला बरें वाटलें.

४५. सख्खा एकुलता एक पोटचा पुत्र असतो, कायद्यानें पहातां अखेर बापाचे दौलतीचा तोच मालक असतो, तरीही लोकांत असे कांहीं तिमाजी आढळतात कीं, आपला शेवटला श्वास थांबे तों त्याला जवळील तत्वमसीचा ते ठाव देत नाहींत, किंवा त्याचे स्वाधीन किल्ल्या करीत नाहींत. आणि शेजाऱ्यानें विनोदानें म्हटलें कीं 'नाईक, आतां तुम्हांला कशाला त्रास, द्या किल्ल्या बाळ्यापाशीं; तो झाला आहे कर्ता' तर म्हणतात–'हं! आहे; त्याचेंच आहे. पश्चात् तोच मालक.' पण उघडे डोळ्यांनीं कांहीं त्याचे हातीं किल्ल्या देत नाहींत. परंतु सद्गुरु बाप शिष्याला आग्रह करकरून आपले विद्यमानी 'तत्वमसी' च्या किल्ल्या त्याचे हातीं देतात. त्या अर्थीं त्यांचा गौरव किती गावा?

४६. कोणी म्हणेल सद्गुरु काय बाहेरचें किंवा पदरचें आणून देतात? आमचेंच रूप आम्हांस दाखवितात. कबूल. आपले मालकीचीच वस्तु खरी; पण ती आपले प्रमादानें हरवली असतां ती आणून देणारास आपण आपखुषीनें पारितोषिक देण्यास तयार होतों व त्यानें आपणांस जणूं ती नवीनच दिली अशा प्रकारें त्याचे आभारी होतों. याचप्रमाणें आमचे प्रमादामुळें

आम्हांला नाहींसें झालेलें आत्मस्वरूप ज्याचे उदारपणामुळें आपणास पुनरुपलब्ध होतें त्या सद्गुरूबद्दल अनंत उपकार वाटावे, हें मानुषी कृतज्ञतेस शोभेसेंच नव्हे काय ?

४७. पंचतंत्रांत कोल्हीचे पोरांत वाढलेल्या सिंहाला दुसऱ्या प्रौढ वनराजानें आत्मरूपाची ओळख पटवून दिली. पदरचें कांहीं दिलें नाहीं. तथापि तेवढ्यानें कोल्ह्याचा सिंह केल्याचेंच श्रेय त्यानें जोडलें. याचप्रमाणें सद्गुरु 'तत्त्वमस्यादि' बोधानें आमचे रूपाचीच आम्हांस ओळख पटवितात. तथापि तेवढयानें आम्हांला लाभ मात्र अतोनात होतो. अर्थात् अशाचे उपकार अनंत मानिलेच पाहिजेत.

* * * *

४८. मनुष्याला इष्ट वस्तु प्रत्यक्ष न देतां केवळ तिच्या प्राप्तीची वाट दाखविली तरी देखील ती दिल्याइतके आभार होतात. समजा, एखाद्या परस्थ भिक्षुकाला दुसऱ्या भिक्षुकानें सांगितलें कीं, येथें सरकारवाड्यांत विद्वान् ब्राह्मणाला पंचवीस रुपयांचें नित्य दान मिळतें आणि त्यासाठीं फलाण्या अधिकाऱ्याला भेटलें म्हणजे झालें. तर या ठिकाणीं त्या परस्थाला रुपये दिल्याप्रमाणें आभार वाटतात. मग श्रुतीनें आमच्या हातीं प्रत्यक्ष वस्तु न देतां तिची वाट सांगितली, तरी देखील तिचे आभार मानले पाहिजेत, नकोत काय ?

४९. कालिदासानें म्हटलें आहे—कांतोदंतः सुहृदुपगतः संगमात्किंचिदूनः । !—विरहिणी साध्वीला तिच्या दूरस्थ पतीची नुसती खुशाली त्याचे एकादे स्नेहानें सांगितली तरी तेवढ्यानें पतिसंगमाहून कांहींसें न्यून इतक्या किंमतीचें सुख होतें; व त्या वार्ताहर आप्ताचें ती किती प्रेमानें स्वागत करिते ! याचप्रमाणें शाश्वतसुखाचा विरह झाल्यामुळें शोकमोहांत गुरफटलेले जे आम्ही जीव त्यांना शाश्वतसुखाची वार्ता सांगणारे किंवा 'तुम्ही नर नसून नारायण आहां' असें पाठ थोपटून सांगणारे आप्त जे सद्गुरु किंवा सच्छास्त्र यांजविषयीं प्रत्यक्षवस्तुदर्शनाजवळजवळ प्रेम वाटणें न्यायच नव्हे काय ?

* * *

५०. निरानदीच्या कालव्याखालीं ज्या उभयबाजूंस शेतजमिनी आहेत, अशांत जरी मुद्दाम पाट फोडून पाणी घेतलें नसलें, तरी स्वभावधर्मानेंच त्यांना आंतून ओलावा पोंचून तेथील शेतीस फायदा होतो. पण या क्षेत्रांच्या मालकापाशीं "देणें" मागूं लागल्यास त्यांना रुचत नाहीं. ते म्हणतात "आम्ही काय कनालवाल्याचें लागतों ? आम्ही कांहीं पाट घेतला नाहीं." अशांसाठीं कालव्यांत दगड ठांसून त्यांकडील झिरपणें बंद करून जमिनी कोरड्या पाडाव्या, तेव्हां त्यांचे डोळे उघडतात. याचप्रमाणें दयासिंधु परमात्म्याचे कृपेचा साधुसंताप्रमाणें विशिष्ट

ओघ वळवून न घेणाऱ्या सामान्य मनुष्यांचेंही त्या दयानिधीचे स्वभावधर्मानेंच जीवन होत असतें. परंतु कित्येकांना याची ओळखही नसते. ते म्हणतात " आम्ही देवाचें काय लागतों आहों? आम्हांला त्यानें काय दिलें आहे?" अशांचे ठिकाणीं जेव्हां परमात्म्यानें रुक्षभाव धरून त्यांना शुष्क करावें, तेव्हां ते शुद्धीवर येतात. परमात्म्यालादेखील सद्धेतूस्तवच, पण जशास तसें वागावें लागतें.

५१. 'जशाशीं तसें' वागणें! यांत अन्याय किंवा वावगेंमात्र कांहीं नाहीं. इतकेंच नव्हे, तसें वागणें हेंच उभयपक्षीं सुखाचें. पहा बरें, वांकडया मेढीला सरळ दर काढून फायदा होईल काय? तिला वांकडया दरांत गाडणेंच सुखावह. त्यानें झगडा मिटतो. तुकारामानें म्हटलें आहे. 'पाया झाला नारू। वरी बांधिला कापुरू। तेथें बिबव्याचें काम। अधमाशीं तो अधम! ही सोय ध्यानांत घेऊनच परमात्मानें आपला कायदा ठांसला कीं, " ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्" ॥

*　　*　　*

५२. कर्माच्या कायद्यांतील अनेक कलमांपैकीं 'ज्याचें कुडें त्याचेच पुढें' किंवा 'चिंती परा तें येई घरा' असें एक पोटकलम आहे. याचें उदाहरण हिरण्यकशिपु-प्रल्हाद या चारित्रांत स्पष्ट आहे. प्रल्हादावर हिरण्यकशिपूनें जी आग पाखडली

ती, तो निरहंकार भक्त असल्यामुळें, त्याकडे न जातां त्याचे उपास्याचेकडे गेली. आणि तो देखत निर्विकार, निरंजन असल्यानें ती तेथें तशीच सांठली राहून योग्य समयीं प्रचंड नृसिंहरूपानें प्रकट होऊन मूळ कर्त्याचेच माथीं उलटून पडून त्याचे विध्वंसाला कारण झाली. हें पाहून तरी परापकार-चिंतकांनीं सावध व्हावें.

५३. 'चिंती परा तें येई घरा' हा कायदा बिनतोड खरा. पण तो केवळ कृष्णपक्षी नसून शुक्लपक्षीही तसाच असल्यामुळें फारच सोईचा आहे. ह्याच कायद्यावरून असें स्पष्ट होतें कीं, 'कोणालाही स्वतःचें कल्याण करून घेणें असेल तर त्यानें दुसऱ्याचें कल्याण चिंतावें.' किती गोड कायदा हा! इहपरत्रीं गोड. याचें मर्म कळल्यावर आणखी पाहिजे तरी काय? म्हणूनच परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं 'सवय्यांत' म्हटलें आहे, 'साधितसे परकीय हिता परि साधन आत्महितींच करीतो.' पण ही उलटी खूण ओळखणारे थोडे.

* * *

५४. मुंबईसारख्या शहरीं पहावें तों कोणाला नवीन खाणावळ घालणें, कपड्याचें, पुस्तकाचें दुकान घालणें, एखादा कारखाना काढणें, तर ज्या जागेंत पूर्वीपासून ह्या गोष्टी होत आल्या असतील अशी जागा इतर जागांपेक्षां थोडेबहुत अधिक भाडें सोसून मुद्दाम घेतात. यांतील हेतु हा कीं, संवयी-

मुळें किंवा पूर्वपरिपाठीमुळें त्या त्या गरजेचें गिऱ्हाईक टाकिलेलें तेथें येतें. हीच गोष्ट परमार्थ साधनालाही लागू आहे. पुण्यक्षेत्रीं, रेवातटीं, सिद्धस्थानीं, तप करावें असें शास्त्रांत सांगितलें असतें. याचें कारणही ह्या स्थानीं पुराणकालापासून अनेक सत्पुरुषांनीं देवताराधन केलें असल्यामुळें तेथें देवतांचा संचार सुलभ असतो. (काशीखंड वाचलें असतां काशीक्षेत्रांत मोठमोठ्या इंद्रादि देवांनीं सहस्रावधि वर्षें तपश्चर्या केल्याचे उल्लेख आहेत.)

* * *

५५. डा. बॅबिट यांनीं आपल्या Principles of Light and Colour या पुस्तकांत एक गोष्ट दिली आहे कीं, पुराणकाळीं दग्ध झालेल्या पांपी शहरांतील इमारतींपैकीं एक खंगराचा तुकडा दोघी अतींद्रियद्रष्ट्या स्त्रियांपुढें (त्यांना त्या विषयीं कांहींही न सांगतां,) टाकिला. तो दृष्टीस पडतांच 'आग लागली' म्हणून त्या ओरडत उठल्या. कारण त्या तुकड्यावर त्यांना, ते पूर्वींचे अग्निप्रलयाचे वेळचे लोळ दिसले. यावरून हजारों वर्षांपूर्वीं आगींत सांपडल्याचा संस्कार त्या जड पदार्थावर कायम होता अशी साक्ष पटते. अर्थात्, अहोरात्र भगवन्नाम संकीर्तनानें दाही दिशा जेथें कोंदाटून जात आहेत, अशा पंढरी, आळंदी सारख्या क्षेत्रीं पावन संस्कारांना अधिक सौलभ्य मिळत असलें पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे. पण इतकें सूक्ष्म अवलोकन करतील त्यांना ही पटेल.

५६. वरच्याच सिद्धांताचा अनुबंधी सिद्धांत हा निघतो कीं, जेथें दुष्टदुर्जन राहतात, जेथें नित्य मलिन कर्मे, दुराचार यांचीं जणूं पुटें बसतात, अशा स्थानीं बसलें असतां सुविचारांचा उत्कर्ष होणें कठिण पडतें. देवाचें ध्यान करणें तरी तें छपर-पलंगावर बसून करण्यापेक्षां देवगृहांत, देवतासन्निध करणें अधिक इष्ट आहे, ह्यांतील तरी हेतु हाच आहे.

५७. विक्रमाचे सिंहासनावर बसणारा उदारबुद्धि होत असे, असें लिहिलें आहे. तें मिथ्या नव्हे. त्या पुण्यप्रतापी पुरुषाचे अधिष्ठानानें ती जागा भारली गेली असल्यामुळें तीवर बसणारास त्या महात्म्यासारखे उदार विचार स्फुरावे, यांत असंबद्ध कांहीं नाहीं. इंग्लंडासारख्या अ-धर्मभोळ्या देशांतदेखील नवीन राजा राज्यारूढ होणें म्हणजे अनेक पिढ्यांपासून आपले प्रौढप्रताप पूर्वज ज्या सिंहासनावर मूर्धाभिषिक्त झाले, अशाच सिंहासनावर बसून अभिषेक करून घेण्याची चाल आहे. ती केवळ कांहीं तरी नव्हे.

*   *   *

५८. ज्या जैसी संगती त्या तैसी गति। असें म्हटलें आहे तें खरें आहे. भर्तृहरींनींही जलबिंदूचें उदाहरण देऊन संवासानें अधम, मध्यम, उत्तम गुण कसे उत्पन्न होतात हें दाखविलें आहे. गणेशचतुर्थीसाठीं शहरांतून छापेगणपति करितात. तेव्हां कमावलेले मातीचा गोळा घेऊन तो सांच्यांत दडपतात म्हणजे गण-

पतीचा आकार घेऊन उठतो; व अल्प कालांतच सर्वांहीं पूजनीय होतो. याचप्रमाणें पुष्कळदा सामान्य प्रतीचीं माणसें, परंतु सुदैवानें चांगल्याची संगती लागल्यानें सुधारून सर्वांस आदरणीय झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत आढळतात. याकरितां सत्संगति करीत असावें.

९९. भंगिणीचे प्रेमालिंगनापेक्षां अत्तारणीचें तोंडांत मारणें बरें. कारण, पहिल्यानें देह दुर्गंधीनें भरेल, दुसऱ्यानें, मुखश्री रंगली तरी सुवासपूर्ण होईल. याचप्रमाणें, दुर्जनाचे प्रेमापेक्षां सज्जनाचा राग देखील बरा. म्हटलें आहे "क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः"! कंस, रावण, हिरण्याक्ष हे कृष्ण, राम, नृसिंहाचे क्रोधविषय असल्यानेंही धन्य झाले.

६०. तालमीमध्यें कुस्ती शिकण्याकरितां उभे राहिलें, म्हणजे सरशा गड्याशीं लढतांना आमचे गुरुजी सांगत 'जोर कर.' पण याचा वास्तविक अर्थ असा होता कीं जों जों दुसऱ्यावर जोर करावा तों तों क्रमानें आपली ताकद वाढत जाई. विद्येसंबंधींही असेंच एक म्हणणें आहे. 'न देतां न मिळे कोणा देतांही होतसे दुणी.' सर्व सत्कृत्यें किंवा दुष्कृत्यें यांना हाच कायदा लागू समजावा व तो ध्यानीं ठेवून वागावें. एका सुभाषितकारानें म्हटलें आहेः हीयतेहि मतिस्तात हीनैःसह समागमात् ।

समैश्च समतामेति विशिष्टैश्च विशिष्टताम् । तें सर्व कामीं—व्यवहारांत व परमार्थांतही—ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

* * *

६१. कोणत्याही सुव्यवस्थित राज्यांत, अराजानिष्ठ किंवा राजकीय अत्याचार करणारे इसमांच्या छायारूपी प्रतिमादेखील राजनिष्ठ प्रजाजनांना स्वदृष्टीपुढें येणें इष्ट वाटत नाहीं, यांतलें इंगित काय? तर प्रतिमा—दर्शनानें त्या त्या इसमांप्रमाणें प्रेक्षकाची प्रवृति होईल. आणि हें तत्त्वजर सर्व समंजस लोकांस मान्य आहे, तर "शांताकारं भुजगशयनं" इत्याकारक ज्याचें शास्त्रानें वर्णन दिलें आहे त्या प्रभूची मूर्ति पुढें मांडून ध्यान धरिलें असतां भक्ताची प्रवृत्ति त्याचे सारूप्याकडे वळेल असें सांगणारा मूर्तिपूजोपदेशक वेडा कसा म्हणतां येईल?

६२. गतसालीं दिल्ली-दरबार प्रसंगीं जेव्हां बादशहांचा जाहीरनामा वाचून दाखविला त्यावेळीं भारतभूमींतलि खेड्यापाड्यांतही बादशहांची तसबीर ठेवून अधिकाऱ्यांनीं प्रजाजनांना तोच जाहीरनामा वाचून दाखविला. अर्थात् बादशहांची छबी असणें म्हणजे खुद्द बादशाहाच पुढें उभे असणें असें जर सर्व मुत्सद्यांनीं व राजनिष्ठ रयतेनें मानिलें, तर पुराणांत जिचें "मेघश्यामंपीतकौशेयवासं" इत्यादि प्रकारें वर्णन दिलें आहे व ज्या वर्णनानुरूप ती मूर्ति आजपर्यंत अनेक भक्तांचे हृदयमंदिरांत

प्रत्यक्ष प्रकट झाली असे दाखले आहेत, ती मूर्ति, ज्यांना तूर्त प्रत्यक्ष दर्शन शक्य नाहीं अशांसाठीं प्रतिमा रूपानें त्यांजपुढें ठेवून प्रत्यक्षतेचे भावनेनें तिचें आराधन करण्यास सांगण्यांत वेडेपण कोठेसें ?

*　　　　*　　　　*

६३. अर्जुन हा अप्रतिम धनुर्धर होता हें सुप्रसिद्धच आहे. द्रौपदीस्वयंवराचे प्रसंगीं त्यानें वर फिरता मत्स्य होता त्याकडे न पाहतां, केवळ त्याचें भूमीवरील जलांत पडलेलें जें प्रतिबिंब त्याकडे लक्ष्य लावून वरील मत्स्याचा वेध केला. याचप्रमाणें जो कुशल व तीव्र बुद्धीचा उपासक आहे, तो ईश्वराच्या पार्थिव प्रतिमेचे ठिकाणींच लक्ष्य नेमून मूलभूत ईश्वराचें आकलन करूं शकतो. या रीतीनें सगुणाची उपासना करून शेंकडों भक्त निर्गुणाला पोंचू शकले आहेत; व यांत खोटें वाटण्याजोगें कांहीं नाहीं, हें सुज्ञांच्या लक्षांत यावें.

६४. एका गृहस्थानें परगांवच्या एका इसमास आपली गाय विकली. तिला आपले घरीं घेऊन जाण्याकरितां नवऱ्या इसमानें सोडिलें असतां ती बारा वाटा पळूं लागली व कांहीं केल्या हातीं लागेना. इतक्यांत एक चतुर गृहस्थ तेथें बसला होता त्यानें सांगितलें, " ऐका; असें करूं नका. या गाईचें वासरूं कुठें आहे, तें हातीं घ्या आणि तिच्या नजरेस पडेल अशा रीतीनें

मार्गानें चला म्हणजे ती आपसुखा मागें येईल." याचप्रमाणें ज्यांना भक्तवत्सल परमात्मा हातीं लागत नसेल त्यांना तो हस्तगत करण्याची सोपी युक्ति म्हणजे त्याचे वत्सभूत जे भक्त किंवा कोणीही भूतमात्र त्यांची सेवा करणें ही आहे. ही युक्ति सुलभ असून रामबाण आहे. आणि म्हणूनच 'नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता । असें तुकोबानें सांगितलें आहे.

*　　　　*　　　　*

६५. गंवडी लोक एकादी कमान, कोनडा, घुमट वगैरे बांधतात, तेव्हां वरील काम सुकून घट्ट बसेतों आंतून त्याला लादणी किंवा पुरणी देत असतात व तें घट्ट झाल्यावर ती काढून टाकितात. सगुणोपासनेंतील वर्म तरी हेंच आहे. मन जोंपर्यंत कच्चें आहे, तों त्याला मूर्त्यादिकांचा आश्रय अवश्य आहे. कालांतरानें तें वरील कमानीप्रमाणें निरालंब राहण्याइतकें दार्ढ्य पावलें म्हणजे सगुण आपेंआपच निकामी होतें; पण आरंभींच सगुण त्यागून कार्यसिद्धि होणें दुरापास्त आहे.

६६. उधळलेल्या उडाण तट्टामागें दांडकें घेऊन लागण्यापेक्षां ओली हरळी दाखवून त्याला सोईनें ठाणावर आणणें ही युक्ति अधिक चतुराईची व सुखावह आहे. याचप्रमाणें हठयोगानें मन जेरीस आणण्यापेक्षां प्रेमळ सगुण भक्तीचे योगानें आणणें

अधिक बरें. " रूपीं गुंतले लोचन । चरणीं स्थिरावलें मन । ही हिकमत अधिक गोड व खाशी नव्हे काय?

६७. एखादे वस्त्रांत दोरा भरावयाचा असतां आधीं तो दोरा सुईत, दाभणांत ओंवावा तेव्हां तद्वारा तो वस्त्रांत भरतो आणि भरल्यावर सुई दाभण काढून घेतां येतो. याचप्रमाणें निर्गुणांत मन शिरणें तर प्रथम तें सगुणांत ओंवावें; तेव्हां साधतें. आणि तद्वारा तें निर्गुणांत प्रविष्ट झाल्यावर सगुणाची अपेक्षा आपेआपच सरते. परंतु सगुणाचे मध्यस्थीवांचून निर्गुणांत शिरणें दुःसाध्य आहे, हें सुज्ञानीं लक्षांत घ्यावें व आरंभीं सगुणोपासनाच करावी. समर्थ म्हणतातः " सगूणीं भजे लेश नाहीं तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा । "

* * *

६८. आमचे दारीं कळकींचीं बेटें आहेत. त्यांपैकीं बहुतेक मोकळे जागीं आहेत व एक अति उंच अशा फणशीचे बुडांत आहे. चमत्कार असा पाहिला कीं या फणशीचे संगतीनें वाढणाऱ्या बेटांतील काठ्या इतर काठ्यांपेक्षां दीडपटीनें उंच वाढतात. हा अनुभव खरा आहे असें आमचे जंगल खात्यांतील एका स्नेह्यांनेंही सांगितलें. यावरून संगतीचें माहात्म्य तृणवनस्पतींपर्यंतही दिसून येतें व ' हीयतेही मतिस्तात हीनैःसह समागमात् । समैश्चसमतामेति विशिष्टैश्च विशिष्टताम् । ह्म० विशिष्टांचे समागमानें आपलीही मति विशिष्ट

होते' हा सिद्धांत खरा ठरतो. म्हणून सर्वदा सज्जनाची किंवा समर्थांची संगति करावी.

६९. हातीं कातर आली कीं कातरावेसें वाटतें. पुष्पहार दिसला कीं गळ्यांत घालावा किंवा हुंगावासें वाटतें. गंगा नदीचें प्रसन्न पुण्य सलिल पाहिलें कीं अवगाहन करावेसें वाटतें. कसला ही तंबाखु खाणारा झाला तरी घाण जागा पाहूनच थुंकीची पिचकारी मारतो. यावरून वस्तुमात्राचे ठिकाणीं आपल्यासारखें करून घेण्याचें सामर्थ्य आहे हें स्पष्ट आहे व यासाठींच पूर्वजांनीं देवतांच्या मनोहर मूर्ति व रमणीय भव्य मंदिरें जागजागीं निर्माण केलीं आहेत. माधवबागेंत देवाचे त्या रमणीय मूर्तीपुढें कोणीही उभा राहिला तरी सात्त्विक भावांशिवाय त्याचे मनांत दुसरें काय उभे राहील बरें?

७०. खडीसाखरेचा खडा पलीकडे पडला असला तरी मुद्दाम उचलून तोंडांत घालावासा वाटतो. गिट्टाचा खडा आयता कोणी तोंडांत घालील तरी थुंकावासा वाटतो. सर्प, विंचु दिसतांच ठार करावेसें वाटतें. पोपट, साळुंकी पाहतांच संग्रहीं बाळगावीं असें वाटतें. कावळ्याचा शब्द कानीं येतांच कानांत बोटें घालावेसें वाटतें. कोकिलस्वर ऐकतांना सुदूरश्रावी कर्ण असावेसें वाटतें. अर्थात् दुर्जन व सज्जन यांचे संगतीचे प्रभाव भिन्न आहेत.

७१. डा० फूट यांनीं असें लिहिलें आहे कीं एका अति-

शय सशक्त व निरोगी मूलाशेजारीं जर एकादे रोडकें मूल निजविलें तर कालांतरानें तें पुष्ट होतें. चिरसहवासानें दोन मनुष्यांचे शब्दाचें व स्वभावाचें वळण देखील एकसारखें होतें, फार काय, पण 'नॉटिलस' नामक मासिक पुस्तकांत एक विलक्षण गोष्ट दिली आहे. ती अशी कीं, एका तरुण मुलीचे डोळे हिरवे होते. व तिचें एका रूपस व पिंगे डोळ्यांच्या तरुणावर प्रेम जडून त्याची ती बायको झाली. पुढें तिला नवऱ्याचे डोळ्यांचें एवढें वेड लागलें कीं सात आठ वर्षांत तिचे डोळ्यांचा रंग त्याचे डोळ्यांप्रमाणें झाला. मला वाटतें शास्त्रांत दिलेला कुंभारणीचा दृष्टांतही यापुढें कमी आहे. असो. यावरून, ध्याता अखंड ध्यानानें ध्येयाकार होणें अशक्य नाहीं हें खास.

* * *

७२. त्याच 'नॉटिलस' मासिकाच्या आगष्ट १९०५ चे अंकांत (पान १८) लिहिलें आहे कीं एखादे मुलाची एखादी

---

१ "In the course of seven or eight years her eyes had lost completely the green tendency, and had taken on a permanent brown which continues to this day."—

NAUTILUS,
25 September 1905.

दुष्ट संवय सोडविणें असेल, तर तो गाढ निजला असतां त्याचे बिछान्याशीं बसून नियमानें व दृढश्रद्धेनें शांत स्वरानें नित्य म्हणावें कीं, " बाळ तूं भला आहेस, सद्गुणी आहेस, पवित्रताप्रिय आहेस. आणि तूं ही दुष्ट संवय स्वतः सोडून आपल्या सख्यांकडूनही सोडविशील. इ०॥" असें एक आठवड्याचे घरसोडीनें कांहीं महिने करावें म्हणजे त्याची संवय जाते. वास्तविक गाढ झोपेंतल्याशीं बोलणें आणि दगडाशीं बोलणें सारखें असें सामान्यांस वाटतें. परंतु शोधकांचा अनुभव जर असा आहे तर, 'सश्रृणोत्यकर्णः' असें जें श्रुतीनें आत्म्याचें लक्षण केलें, तें खरें नव्हे काय? आणि मग परमेश्वराचे भावनेनें व उद्देशानें दगडी मूर्तीपाशीं आर्त किंवा प्रेमळ स्वरानें ओरडत बसणारांस हंसण्याजोगें काय आहे?

७३. तेथें आणखी असें लिहिलें आहे कीं मुलाचे बिछान्याशीं जातां येत नसेल तर आपल्या खोलींत राहून व तो मुलगा आपले

१ "If it is impossible to go to the child's bed-side remain in your own room by your own bed, close your eyes and imagine as vividly as you can that the child or person lies before you. * *Talk mentally, or in whisper or aloud–Your suggestion will be as effective when given at your own bedside as at his, if you have *faith* & *persistence* enough—

NAUTILUS.

शय सशक्त व निरोगी मूलाशेजारीं जर एकादें रोडकें मूल निजविलें तर कालांतरानें तें पुष्ट होतें. चिरसहवासानें दोन मनुष्यांचे शब्दाचें व स्वभावाचें वळण देखील एकसारखें होतें, फार काय, पण 'नॉटिलस' नामक मासिक पुस्तकांत एक विलक्षण गोष्ट दिली आहे. ती अशी कीं, एका तरुण मुलीचे डोळे हिरवे होते. व तिचें एका रूपस व पिंगे डोळ्यांच्या तरुणावर प्रेम जडून त्याची ती बायको झाली. पुढें तिला नवऱ्याचे डोळ्यांचें एवढें वेड लागलें कीं सात आठ वर्षांत तिचे डोळ्यांचा रंग त्याचे डोळ्यांप्रमाणें झाला.[१] मला वाटतें शास्त्रांत दिलेला कुंभारणीचा दृष्टांतही यापुढें कमी आहे. असो. यावरून, ध्याता अखंड ध्यानानें ध्येयाकार होणें अशक्य नाहीं हें खास.

*　　　　*　　　　*

७२. त्याच 'नॉटिलस' मासिकाच्या आगष्ट १९०५ चे अंकांत (पान १८) लिहिलें आहे कीं एखादे मुलाची एखादी

---

१ "In the course of seven or eight years her eyes had lost completely the green tendency, and had taken on a permanent brown which continues to this day."—

NAUTILUS,
25 September 1905.

दुष्ट संवय सोडविणें असेल, तर तो गाढ निजला असतां त्याचे बिछान्याशीं बसून नियमानें व दृढश्रद्धेनें शांत स्वरानें नित्य म्हणावें कीं, " बाळ तूं भला आहेस, सद्गुणी आहेस, पवित्रताप्रिय आहेस. आणि तूं ही दुष्ट संवय स्वतः सोडून आपल्या सेह्यांकडूनही सोडविशील. इ०॥" असें एक आठवड्याचे धरसोडीनें कांहीं महिने करावें म्हणजे त्याची संवय जाते. वास्तविक गाढ झोपेंतल्याशीं बोलणें आणि दगडाशीं बोलणें सारखें असें सामान्यांस वाटतें. परंतु शोधकांचा अनुभव जर असा आहे तर, 'सश्रृणोत्यकर्णः' असें जें श्रुतीनें आत्म्याचें लक्षण केलें, तें खरें नव्हे काय? आणि मग परमेश्वराचे भावनेनें व उद्देशानें दगडी मूर्तिपाशीं आर्त किंवा प्रेमळ स्वरानें ओरडत बसणारांस हंसण्याजोगें काय आहे?

७३. तेथें आणखी असें लिहिलें आहे कीं मुलाचे बिछान्याशीं जातां येत नसेल तर आपल्या खोलींत राहून व तो मुलगा आपले

---

१ "If it is impossible to go to the child's bed-side remain in your own room by your own bed, close your eyes and imagine as vividly as you can that the child or person lies before you. * *Talk mentally, or in whisper or aloud-Your suggestion will be as effective when given at your own bedside as at his, if you have *faith* & *persistence* enough—

NAUTILUS.

पुढेंच आहे अशी विशद भावना करून वरील प्रयोग करावा; तरीही कार्य होतें. हा जर अनुभव आहे, तर सर्वगामी परमेश्वराचें रूप ध्यानीं आणून त्याची स्तुति करीत बसणें किंवा त्याची मानसपूजा करणें हे उपाय किती समीचीन आहेत, हें सहज कळेल. व अशी बिनखर्ची सोय जर परमात्म्यानें जीवांना दिली आहे, तर त्याला आपलासा करण्यास झटावें.

* * *

७४. आजकाल कित्येक लोक म्हणतात कीं आमचा दुसऱ्याचे सांगण्यावर भरंवसा नाहीं, कोणतीही गोष्ट आम्ही देहीं अनुभवूं तेव्हां खरी म्हणूं. हें म्हणणें ठीक आहे. पण, अशांचें अन्यत्र वर्तन पहावें तों या म्हणण्याला धरून नसतें. कारण, सर्प फणा उगारून पुढें आला असतां, हे असें म्हणत नाहींत कीं 'आम्हास फणकारा मारून प्राण जाईतों, निदान लहर येईतों, आम्ही हा प्राणी विषारी आहे, असें मानीत नाहीं.' त्याला पहातांच, 'हा प्राण घेईल' असें परप्रमाणावरूनच गृहीत धरून हे पळतात. अशांना लबाड म्हणणें ओघालाच येत नाहीं काय?

७५. शास्त्र जिज्ञासूंना सांगतें कीं 'विश्वास ठेवा.' तेव्हां एकदा जिज्ञासु ह्मणतो कीं "प्रत्यक्ष दाखवा! म्हणजे विश्वास ठेवीत बसण्याचें कारण नाहीं." ठीक आहे. आह्मी प्रत्यक्ष हत्ती अशा पुढें आणून ठेविला आणि ह्मटलें 'हा हत्ती;' व तो संतुष्ट

झाला. तथापि, ही गोष्ट विश्वासावांचून मात्र साधली नाहीं, हें त्याच्या लक्ष्यांत येत नाहीं; कारण हत्ती प्रत्यक्ष उभा असूनही 'हा हत्तीच' कशावरून गेंडा कां नव्हे, ह्या शंकेला ह्मणजे जागा उरत नाही, असे नाहीं. तेव्हां कोठे तरी, विश्वास धरल्याशिवाय प्रत्यक्षही व्यर्थ होईल.

७६. वरील प्रश्नावर कोणी ह्मणेल कीं आजपर्यंत आह्मी हत्तीचीं जीं वर्णनें वाचीत आलों त्या लक्षणानुरूप हा प्राणी दिसतो म्हणून आम्ही याला हत्तीसें मानितों. परंतु, त्यावर्णनांवर तरी विश्वास ठेविल्यावांचून ही सिद्धि कशी संभवेल? अर्थात् विश्वास हा पाहिजे. विश्वासावाचून कांहीं चालणार नाहीं. किंबहुना विश्वास हाच विश्वास आधार आहे.

* * *

७७. हा विश्वास म्हणजे आत्मविश्वास तरी किंवा आप्त विश्वास तरी. धूर्तविश्वास मात्र घातक होतो. पंचतंत्रांतील तीन धूर्तांचे गोष्टींत तो ब्राह्मण खराखुरा यज्ञीय पशु घेऊन जात असतांही, त्या धूर्तांनीं तो श्वान असावा असा त्या ब्राह्मणाला भ्रम पाडून हातचा पशू टाकविला. असलाच प्रकार चार्वाकादि धूर्तांचे वचनावर विश्वासणारांचा होतो.

* * *

७८. जो कोणी घोड्यावर, सायकलवर, बसावयास शिकला असेल त्याला माहीत असेल कीं घोडा कसाही शिकविलेला असला व सायकल कितिही निर्दोष असली व वस्तादजीनें तोंडीं कितिही व्यवस्थित शिक्षण दिलें, व वरील बैठकीचीं चित्रें काढून दाखविलीं व अनेक ग्रंथही वाचविले तरी घोड्यावर किंवा सायकलवर तोल संभाळून कायमची मांड बसणें ही गोष्ट बसणारानें स्वतःच दहा पांच वेळ गचके खाऊन आपली अटकळ बसविल्याशिवाय साधणें नाहीं. हाच प्रकार प्रत्येक विद्येंत व विशेषतः आत्मविद्येंत आहे. आणि म्हणूनच **शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति** व अखेर **आत्मप्रतीति** ह्या तीन एकत्र होईतों सम्यक् ज्ञान होत नाहीं.

*　　*　　*

७९. प्रारब्ध हें एक प्रकारचें ऋण आहे व तें फेडलें पाहिजे, हें निर्विवाद आहे. परंतु हें ऋण जातीवर नसून इस्टेटीवर (मालमत्तेवर) आहे. तेव्हां देहरूपी मत्ता त्याचे फेडीकडे लावून देऊन आपण जातीनें खुशाल मोकळें राहण्यास कायद्याची हरकत नाही. आतां आपलें मन एकाद्या लोभ्याप्रमाणें इस्टेटींतच गुंतून राहील तर मग यातायात सोसावी लागेल. पण यांत कायद्याकडे दोष देतां येणार नाहीं.

८०. कितीही घनदाट मेघपटल उठलें तरी तें सूर्याचे प्रगतीचा विरोध करूं शकणार नाहीं. फार तर त्याचे प्रकाशाचा

प्रसररोध करील. त्याचप्रमाणें खरतरही प्रारब्ध जीवात्म्याचे प्रगतीचा निरोध करूं शकणार नाहीं. फार तर त्याचें सद्यःफल दृष्टीस येऊं देणार नाहीं.

८१. माझे सासरे एकदां जबर दुखणाईत असतां मला म्हणाले 'मी सोळा वर्षांचे वयापासून आज साठ वर्षांचा होईतों शंकरावरील एकादशिनी अंतरली नाहीं. असें असतां मला क्लेश कां? माझें करणें फुकटच कां गेलें?" मी म्हटलें "फुकट मुळींच नाहीं. पै नी पै सरकार दप्तरीं त्याची नोंद आहे. पण जुना हिशेब उलगडेल तेव्हां त्याचा उपयोग होईल. कारण, देव हा पक्का व सच्चा हिशोबी आहे. तुम्हीं पूर्वी उचललेल्या रकमा क्रमानें तो उगवील आणि मग हें जमेचे सदर पुढें करील. शहाण्णव सालचें कर्ज उभें ठेवून नव्याण्णवचे जमेचें व्याज पदरीं टाकणार नाहीं. बाकी दगा पैचा करणार नाहीं." म्हणूनच पुष्पदंत म्हणतातः "अतस्त्वां संप्रेक्ष्य क्रतुषु फलदानप्रतिभुवं। श्रुतौश्रद्धां बद्ध्वा दृढ परिकरः कर्मसु जनः।" ह्म०—केल्या कृतीचें फल अचुक कर्त्याचें पदरांत घालण्याचे कामीं, हे शंकरा, आपण शहाजोग जामीन आहां, अशी श्रुति खात्री देते, म्हणूनच लोक क्रतु कारितात. एरव्ही करतेना.

८२. 'प्रारब्ध व क्रियास्वातंत्र्य' यांचा पुष्कळांना मोठा लढा पडतो. पण त्यांचा निर्णय उघड आहे. 'प्रारब्ध' हें

आपणच पूर्वी केलेलें एक ऋण आहे व तें फेडल्यावांचून सुटका नसावी हें न्याय्यच आहे, परंतु त्यामुळें आपलें क्रियास्वातंत्र्य लोपण्याचें कारण नाहीं. कसलाही खंद्या मारवाडी झाला तर तो ऋणकोला छदाम सोडणार नाहीं, खरें; परंतु त्याला तूं नवीन द्रव्यार्जन करूं नको असें मात्र म्हणूं शकणार नाहीं. तें त्यानें खुशाल मिळवावें. मात्र जुना सावकार फेडावा इतकेंच. याचप्रमाणें एकीकडे भोगानें प्रारब्ध फेडावें व त्याच वेळीं पुढील सुस्थितीसाठीं क्रियमाण उज्ज्वल करीत असावें.

* * *

८३. एखाद्या अर्भकाला मातुश्रीचे नुसते पदराचा आश्रय सांपडला तरी बळकटी येते, त्याचप्रमाणें अद्वैताचें नुसतें वारें अंगावर आलें तरी किती पुष्टि येते याचें उदाहरण अलंकार शास्त्रांत दिसतें. 'फक्कड चेहरा, सुंदर मुख' वगैरे कांहीं म्हटलें तरी फारशी मात्रा चढत नाहीं, परंतु चंद्रमुखी म्हटलें कीं श्रोत्यांचे हृदयांत चंद्रप्रकाश पडल्यासारखा आनंद भरून जातो. वास्तविक चंद्र आकाशांत व सुंदरीचें मुख घरच्या खोलींत. पण नुसत्या शब्दांनीं त्या आल्हादनिधीचे सादृश्याचा मुखावर आरोप करितांच त्या मुखबिंबाला इतकी खुलावट येते कीं त्या सुधानिधीचें आनंददायित्व घरांत खेळूं लागल्यासारखें आपणास सुख होतें. याचप्रमाणें सायुज्याचें सौख्य तर अनिर्वाच्यच; परंतु नुसत्या सरूपतेचा प्रभाव देखील लहान नसेल.

८४. "**सतांहि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरण-प्रवृत्तयः**" असा कालिदासानें एक न्याय दिला आहे. हा लावून पाहिला तरीदेखील अद्वैतसिद्धि होईल. त्याला अधिक दगदग नको. पहा सीतेचें वर्णन करितांना भवभूतीनें प्रथम म्हटलें कीं, "आसीदियं दशरथस्य गृहे यथाश्रीः।" परंतु एवढ्यानें, म्हणजे, लक्ष्मी सारखी होती, असें म्हणण्यानें, समाधान होईना. तेव्हां पुनः तो म्हणतो. 'श्रीरेव वा, किमुपमानपदेन ?–सैषा। म्ह. "किंवा, हें उपमानाचें तरी लचांड कशाला–साक्षात् लक्ष्मीच ती." झालें; आतां मात्र कवीची उकळी जिरली. त्याची वेदना, उत्कंठा निवाली, त्याची मतिच कुंठली. यावर आतां पाणी चढण्यास जागाच नाहीं. हीच अंतःप्रवृत्ति द्वैत हा चरम सिद्धांत किंवा अद्वैत हाच चरम सिद्धांत, याचा निवाडा देण्यास पुरे आहे.

८५. द्वैतानें कितिही शेखी मिरविली तरी तें अखेर अद्वैतशरण आहे, याचा प्रत्यय पदोपदीं आहे. फार तर काय, अद्वैतानें जर आपलें अंगकाढून घेतलें किंवा द्वैताला थारा दिला नाही, तर द्वैत हें तत्काल विकळ पडतें किंवा उभें राहिलें तर अनर्थावह होतें. समजा. एक अत्यंत निष्णात जर्मन पण्डित आहे व दुसरा तितकाच निष्णात संस्कृत पण्डित आहे. पण उभय पण्डितांना अन्योन्य भाषा मुळींच येत नाहीं. तर अशांची गांठ पडूनही विफळ होणार. अशा वेळीं त्यांनीं एक दुभाषा सोधावा. तेव्हां त्यांचा व्यवहार

पटतो. आतां हा दुभाषा म्हणजे कोण? तर हा उभय भाषांचें एकीकरण करणारा म्हणजे द्वैत मोडून अद्वैताप्रत आणणारा एक गुरुच. म्हणजे एका अर्थी—हा परमार्थातील 'तत्वमसि' हा उपदेश करणाऱ्या गुरूची व्यावहारिक नकलच म्हणावयाची. अर्थात् अद्वैतावांचून केवळ द्वैत म्हणजे शुद्ध फजीता.

* * *

८६. व्यवहार पाहतां वारा आणि पाणी यांत प्रवाहित्वादि कांहीं धर्म खेरीज करून त्यांचे एकगोत्रत्वाविषयीं कांहीं पुरावा नाहीं. उलट बाळ्या पहिले पुस्तकांत वाचतो कीं " वारा आला, पाऊस गेला. " परंतु रसायनज्ञ म्हणतो कीं पाणी म्हणून निराळा पदार्थ नसून तो दोन विशिष्ट वायूंचें संमेलन किंवा अपत्य आहे. अर्थात् नुसतें एक गोत्रत्वच नव्हे तर अनन्यत्व आहे, असेंच तात्पर्य. याच प्रणालीनें पहातां दर्शनीं विसदृश असे अनेक पदार्थ परमार्थतः एकच असल्याचा भौतिक शास्त्रांचा जर अनुभव आहे तर 'आत्मैवेदं सर्वं' म्हणून वेदांती सांगूं लागला असतां तें घशांत कां अडकावें?

८७. आजचे शास्त्रीय शोधांनीं असें कळतें कीं आक्सिजन

"The difference between an atom of oxygen & one of *iron* depends upon the *structure* of the atom and not upon the *material* of which it was made.

OCCULT CHEMISTRY.

(प्राणवायु) चा एक कण व लोहाचा कण, हे एकाच प्रकृतीचे किंवा एकाच घटक द्रव्याचे विकार आहेत. आणि बाह्यतः ह्यांमध्यें जो भेद दिसतो तो केवळ त्यांच्या परमाणूंच्या रचनेंत आहे. आतां आक्सिजन हा वायु व लोह हा जड धातु, हे एकप्रकृतिक असतील हें अशास्त्रज्ञांना खरें देखील वाटत नाहीं; पण शास्त्र तशी साक्ष देतें. अशाच प्रकारच्या अनेक पदार्थांबद्दल शास्त्राच्या साक्षी घेतल्या तर ' नेहनानास्तिकिंचन ' हें जें उपनिषदानें सांगितलें तेंच खरें मानणें भाग होईल.

* * *

८८. गोठ म्हणजे पाटली नव्हे, पाटली ह्म० सरी नव्हे, सरी ह्म० वांक नव्हे, वांक ह्म० हंसळी नव्हे व हंसळी ह्म० बिंदलें नव्हे; तथापि सोनें नव्हे, असें यांपैकीं एकही नाहीं. ही गोष्ट जोंपर्यंत अबाधित आहे, तोंपर्यंत तुमचा हा भेद किंवा हें नानात्व खुशाल नांदेना, धन्याची काय हानी? त्याचप्रमाणें विश्वांतील अनेक पदार्थ जरी आकारानें भिन्न भिन्न असले तरी एकाच मूळवस्तूचे विकार किंवा प्रकार आहेत, ही भावना ज्यानें दृढ पकडली, त्यानें तें वाचिक नानात्व वागविलें म्हणून ओरड कशाला?

* * *

८९. सराफकट्टयावर कोणताही दागिना मोडण्यास गेलें म्हणजे तेथें आकाराचें मोल ऊर्फ घडाईचीं किंमत कोणीच हिशोबांत धरीत नाहींत. फक्त कस पाहून मूळ धातूची किंमत तेवढी देतात. याचप्रमाणें तुझ्या ह्या बाह्याकाराचें किंवा घडावाचें (देहाचें) मोल अखेर होणार नाहीं. तो मोडींत वजा जावयाचा. फक्त तुझ्यांत जितकी अस्सल धातु (सत्त्वगुण) असेल तेवढ्यावर तुझें मोल होईल. हें ध्यानांत वागवून बाहेरील डौलापेक्षां आंतील लायकीकडे लक्ष्य पुरवीत जा. पितळ्याचें अत्यंत नक्षीदार ताट व तेंच सोन्याचें पण साधें, बाजारांत नेल्यास पहिल्याचे शेंकडोंपट दुसऱ्याला किंमत येते, हें विसरूं नको.

* * *

९०. सुषुप्तींतही आत्मसान्निध्य होतें व समाधींतही होतें; असें असतां सुषुप्तीहून समाधीची थोरवी अधिक कां व सुषुप्तीचा अनुभव प्रत्यहीं सर्व जीवांस असतांना ते 'आत्मस्वरूपाची आम्हास ओळख नाहीं' म्हणून कां ओरडतात? ही ओरड लटकी कीं खरी? ओरड लटकी नव्हे, खरीच आहे. आंधळ्याला एखाद्या स्त्रीनें आलिंगन दिलें, तर त्याला तिचा स्पर्श मृदु आहे, कीं खर आहे, सुखद आहे कीं कठोर आहे, एवढेंच काय तें समजेल. परंतु तिचे स्वरूपाची ओळख होणार नाहीं; तोच डोळस असल्यास कायमची ओळख धरील. सुषुप्तींतही जीव प्राज्ञ म्हणजे गडद अंधकार

किंवा अज्ञानयुक्त असल्यामुळें त्याला आत्मपरिचयाचा सुखस्पर्शा-पलीकडे अधिक अनुभव सांगतां येत नाहीं. समाधि हा ज्ञानावस्थेंतील किंवा डोळसपणाचा अनुभव असल्यामुळें तेथें स्वरूपाची ओळख पूर्ण व कायमची पटते.

९१. समाधींतही जीवाला परमात्मसान्निध्य होतें व सुषुप्तींतही तें होतें. कारण, सुषुप्तींत जीव परमात्मरूपाचे ठिकाणींच असतो असें उपनिषदांत सांगितलें आहे. मग कोणी ह्मणेल कीं दोन्ही अवस्थांत परमात्मसान्निध्य असतांना व सुषुप्ति सर्व प्राण्यांना सहज व नित्य अयत्नसाध्य असतांना समाधीचा विकटो खटाटोप कां करितात? तर त्याचें उत्तर एवढेंच कीं राजा, राजदरबारांत न्यायासनावर बसला असतां त्याचे सचिवालाही राजदर्शन असतें व समोर पिंजऱ्यांत उभा असलेल्या कैद्यालाही होतें; म्हणून सचीव व कैदी दोघेही सारखेच कृतकार्य आहेत असें कोणी समजतो काय? याचप्रमाणें सुषुप्तींतील सान्निध्य सबंध असतें, समाधींतील निर्बंध असतें, म्हणून समाधीचें एवढें माहात्म्य.

* * *

९२. जो मुळींच जातरूप आहे किंवा ज्यानें दोन बोटांची केवळ लंगोटीच घातली, त्याला उघडे अंगाबद्दल कोणी हंसत नाहीं. पण जो अंगभर पायघोळ उंची वस्त्र नेसला आहे अशाचे वस्त्राला ढुंगणावर, मांडीवर किंवा इतर कोठेही ठळकसा भोसका

दिसला कीं लोकें हंसतात. त्या प्रमाणें जो उघड धर्मलंड बनला त्याला हासण्याचें कारणच नाहीं, परंतु बाह्यतः धर्माचें पांघरूण घेऊन कृतीनें जो धर्माची उघडीक करील तो सहजच उपहास्य होईल.

९३. जेवणावर बसलें आणि ताटांतील कारल्याची भाजी कडू लागली म्हणजे कोणाला विस्मयही वाटत नाहीं व त्या कडूपणाबद्दल बहुधा तिचा त्यागही कोणी करीत नाहीं. परंतु हीच दुधाभोपळा, दोडका किंवा तोंडलें यांची भाजी असून ती कडू लागेल तर बहुतेक खाणाऱ्यांना चुकल्यासारखें होऊन ते ती थू थू करून थुंकून टाकतात. याचप्रमाणें जे जन्मतःच हीनवर्ण आहेत अशांनीं हीन कर्म केलें असतां (उ० धीवरानें मासे मारिले असतां) त्याबद्दल आपणास खेद होत नाहीं व शास्त्रही त्या कामीं मनाई करीत नाहीं[1]. परंतु उच्च वर्णांत येऊन जर अधम कर्म करतील तर त्यांची थू थू व्हावी हें योग्यच आहे.

* * *

९४. आपल्यांत एक उपरोधिक म्हण आहे कीं "गहूं देणार नाहीं; कणीक दळून देईन!" अशाच मासल्याची कृति कांहीं वैदिक कर्मठांची असते. ते नुसते रामकृष्ण वासुदेव म्हणणार नाहींत व तें म्हणणारास हांसतील. पण तीळ, तांदूळ, तूप

---

१ सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत्।—गीता.

जाळून व अवचट श्रौतस्मार्त अनुष्ठान करून अखेर " जनार्दन वासुदेवः प्रीयतां" म्हणतील.

९५. लौकिक न्यायांत एक 'घट्ट-कुटी-प्रभात न्याय' म्हणून न्याय आहे. याचा अर्थ, वाटेंतील दस्तुरी चुकविण्यासाठीं एक गृहस्थ दस्तुरीचे अलीकडूनच गाडी फिरवून, आडमार्गानें घेऊन चालला; पण संध्याकाळ सरून रात्र पडल्यानें वाट चुकून अखेर उजाडतां तो नाके-घराशींच ठेपला. तोच प्रकार कांहीं हट्टी श्रौत्यांचा होतो. ते हरिनाम घेण्याचा कंटाळा करितील. परंतु वेदमंत्र घोकतील व अखेर 'यावंति वेदाक्षराणि तावंति हरि नामानि' म्हणून आधार सांगतील.

* * *

९६. शास्त्र व व्यवहार यांचा सदा मेळ असावा असें जरी आत्यंतिक न्याय दृष्टीला वाटतें, तरी तें पुष्कळदा दुर्घट असतें. कारण शास्त्रदृष्टि ही सर्वदा निर्लेप किंवा शुद्ध असते. आणि व्यवहारदृष्टि बहुधा मिश्र किंवा शबल असते. परंतु बहुतेक जीवांना व्यवहाराचा अहर्निश दृढ परिचय असल्यानें त्यांचे ठिकाणीं व्यावहारिक अनुभव इतका जोरावला असतो कीं शास्त्रीय अनुभवाची तेथे डाळ शिजत नाही. व अशावेळीं अनेक दुराग्रही लोक शास्त्र खोटें ह्मणण्यास तयार होतात. हाच प्रकार वेदांत शास्त्रांतील कित्येक सत्यांसंबंधें व्यवहारी जीवांचा होतो व

Majority carries the day म० बहुमत तेंच सत्य हा एक अरेरावीचा न्याय दुनियेंत माजला असल्यामुळें बिचाऱ्या शास्त्राला कधीं कधीं गप्प बसावें लागतें. पण यांत शास्त्राची हानि नसून लोकांचीच आहे.

९७. भूगोलशास्त्रवेत्ता म्हणतो कीं पृथ्वी फिरते. पण आमचे बाळ्याची बुकांची पेटी किंवा आजीबाईची चूल कालच्या जागींच कायम दिसते, तेव्हां बिचाऱ्या आर्यभट्टानें किंवा कोपरनिकसानें ' पृथ्वी फिरते, पृथ्वी फिरते ' म्हणून कंठशोष केला तरी त्याला भीक कोण घालतो ! उलट त्याच्या डोक्यांत बडगा घालण्याला धांवणार. हाच फजिता अखंड संसारांत मुरलेल्या जीवांना वेदांताची किंवा अध्यात्मशास्त्राचीं तत्त्वें सांगणाराचा होतो.

*   *   *

९८. व्यवहारांत प्रत्येकाचा अनुभव विचारिला तर परमाणूपासून तों हिमाचलापर्यंत किंवा सूर्यगोलापर्यंत प्रत्येक पदार्थाला अल्प किंवा महत् प्रमाणानें वजन हें असलेंच पाहिजे असें तो सांगेल. परंतु पदार्थविज्ञानशास्त्री ही गोष्ट ठार खोटी म्हणतो. तो सांगतो कीं पदार्थाला मूळचें वजन असें नाहीं. वजन म्हणून जें अनुभवास येतें तें त्या पदार्थावर पडणाऱ्या गुरुत्वाकर्षणाच्या व्यापाराचें फल आहे. पण हें खरें वाटणारे थोडे. याचप्रमाणें वेदांत सांगतो कीं आत्मा असंग आहे, त्याला सुखदुःख मिळून-

कसें तें नाहीं. व्यवहारांत जें अनुभवास येतें तो अज्ञानाचा परिणाम आहे. पण हें पटतें आहे कोणास ?

९९. या नामरूपात्मक जगतांत वस्तुमात्राला रूप आहे आणि रूपाची प्रतीति वर्णांवांचून होत नाहीं. अर्थात, दृश्य पदार्थ म्हटला म्हणजे श्वेत, रक्त, हरित, पीत, नील इत्यादि कोणता न कोणता रंग हा असलाच पाहिजे, हा सर्वांचा अखंड अनुभव आहे. आणि काळा रंग तर सर्वांत पक्का किंवा करार रंग असें आपण समजतों. पण न्यूटन ह्मणतो, पदार्थाला अंगचा वर्ण म्हणून नाहीं. तुम्ही जी तांबडी वस्तु म्हणतां ती अंगीं तांबडी नसून फक्त प्रकाशांतील तांबडा रंग तिनें आपलेकडे ओढून घेतला आहे. अर्थात् हा तांबडेपणा घरचा नसून आगंतुक आहे. शंकराचार्यही आत्म्याचें रूप सांगतांना 'न रक्तं न पीतं, न शुक्लं न कृष्णं' असें सांगतात, व स्फटिकाचे दृष्टांतानें दृश्य हा उपाधीचा परिणाम आहे म्हणून दाखवितात, हें खोटें कां वाटावें ?

*　　　　*　　　　*

१००. आमचे शास्त्रांत स्त्रीरूपाची निंदा केलेली पाहून कित्येकांना संताप येतो. परंतु ते हें लक्ष्यांत घेत नाहींत कीं शास्त्रकार स्त्रीरूपाचें स्वतंत्र चांगुलपण ओळखीत नाहींत, अशांतला प्रकार

नाहीं. पण या रूपाचे अशास्त्र सेवनानें पुरुषाचा घात होईल म्हणून त्यावर हा उसना आरोप ते मुद्दाम करितात. मातृस्तनाइतकें प्रिय बालकाला स्पृहणीय असें दुसरें कांहीं नाहीं. परंतु कांहीं बालकें इतकीं नादी असतात कीं तीं मातेचा स्तन सोडीतच नाहींत. असें होऊं लागलें असतां त्या स्तनंधयाला विनिवृत्त करण्यासाठीं चतुर स्त्रिया स्तनाग्राला कांहीं तरी कडू पदार्थ लावतात म्हणजे तें बालक आपेंआपच तोंड फिरवितें व त्याचा तो फाजील पिण्याचा नाद सोडितें. याच प्रकारची हिकमत स्त्रीरूपावर निंद्यत्व लादण्यांत शास्त्रकारांनीं केली आहे, यापलीकडे कांहीं नाहीं.

१०१. वैद्य स्वतः तेलांतलीं चमचमीत भजीं व चिंचेचे कोळाचें भरीत खात असतो आणि त्याकडे औषध मागावयास आलेले रुग्णाला बजावून सांगत असतो कीं तेलकट, आंबट वर्ज्य. आतां हें तेलकट, आंबट स्वतंत्र दृष्टीनें तो वैद्य त्याज्य मानितो असें नाहीं. तर हें उघडच आहे कीं त्यारुग्णाला जी विशिष्ट भावना झाली आहे त्या भावनेला तें अपकारक आहे यासाठीं त्याचा निषेध करणें वैद्यास प्राप्त येतें. याच प्रमाणें जे निवृतिमार्गी किंवा मोक्षकामी आहेत अशांना स्त्रीरूप अनुपकारी आहे असें पाहून शास्त्रकारांनीं ते तिरस्कार्य ठरविलें. स्वतंत्रपणें स्त्री रूपाची निंदा केली नाहीं. स्त्रियानां अमृतही म्हटलें आहे आणि

विषही म्हटलें आहे. मात्र हा भेद विषयतारतम्यानें आहे, इतकेंच समजलें पाहिजे.

१०२. कोणी म्हणतील पाहिजे तर पुरुषांचे डोळ्यांना पडदे बांधण्याची शास्त्रकारांनीं कांहीं युक्ति काढावयाची होती. तें सोडून निरपराधी स्त्रीरूपावर तिरस्कार कां घातला? हा काय न्याय? त्यावर आम्ही असें विचारितों कीं 'सर्वजनांना नेत्रानंदकर अशीं हिरे, माणिकें वगैरे रत्नें यांचा पेटींत कोंडमारा करून त्यांचे छातीवर भक्कम कुलूप ठोकून देणें हा न्याय कोठला? त्या रत्नांचा अपराध काय? चाहील तर चोराच्या तंगड्या तुम्ही मोडा.' परंतु हा अन्याय तर सर्व देशांत सर्व घरीं प्रतिदिनीं करीत आहेत. याची फिर्याद कोठें द्यावी? स्त्री तरी एक रत्नच आहे ना? म्हणून रत्नाचें नशीब, तेंच स्त्रियांचें? पण तेवढ्यानें रत्नाला गारगोटी समजतात, असें समजूं नका.

*　　　*　　　*

१०३. आमचे धर्म-शास्त्रांत जेथे तेथे दानाचें माहात्म्य सांगितलें आहे व ज्या त्या वस्तूचें दान सांगितलें आहे. हें पाहून कांहीं लोक म्हणतात कीं असल्या दानांत कांही फल नाहीं, भटांनीं आपली सोय केली आहे. भटांची यांत सोय झाली असेल; परंतु मूळ दान करावयास सांगणारे शास्त्राचा आशय मात्र तो नव्हे. तो फार खोल व स्तुत्य आहे. मनुष्याला विश्वकुटुंबी किंवा

विश्वात्मा बनविण्याचे मार्गांतील हा एक टप्पा आहे. कारण जो लोभी मनुष्य स्वार्थापलीकडे कांहीं जाणत नाहीं व हातची दमडी सोडीत नाहीं, तोही फलाशेनें दान देण्यास तयार होतो. व पुढें तो अभ्यास वाढतां वाढतां फळाकांक्षारहित म्हणजे केवळ भूतदयेस्तव किंवा विश्वात्मभावनेस्तव दान किंवा परोकार करण्याइतकें त्याचें मन उदार बनतें. म्हणून स्वार्थी जीवांची लोभबुद्धि कमी करीत करीत त्यांस परार्थी बनविण्याची ही केवळ एक हिकमत आहे.

१०४. 'व्हिकर आफ वेकफील्ड' या कादंबरींत, त्या व्हिकरचे दारीं एक ठोक जोशीण आली असतां त्याच्या मुली धांवत दारीं गेल्या आणि आपलें नशीब विचारूं लागल्या. जोशीणीनें एकीला सांगितलें 'तुला नबाब नवरा मिळेल' दुसरीला 'राजकुमार' सांगितला. तें ऐकतांच त्या पोरींनीं संतोषानें तिला एक एक शिलिंग बक्षीस देऊन बापाकडे धांवत जाऊन तें वृत्त सांगितलें. व्हिकर हंसून म्हणाला 'हे मूर्ख हो, मी तुम्हाला निम्मे पैशांत सार्वभौम नवरा दिला असता.' सकाम कर्म करणारांची अवस्था ह्या पोरींसारखीच आहे. हे लोक फुकट कांहीं द्यावयाचे नाहींत. पण पोथींत निघालें कीं अमुक दान किंवा अमुक होम-हवन, अनुष्ठान केल्यास पुढें असले स्वर्गीयभोग मिळतील' म्हणजे त्या लालचीनें हजारों रुपये खर्चतील. ही

केवढी भूल ! यापेक्षां निरपेक्ष धर्म केल्यानें काय हानी होईल ? परंतु त्याला मन थोर लागतें. तसें थोड्यांचेंच असतें; म्हणून अज्ञांसाठीं स्वर्गादि फलांचें गुळखोबरें शास्त्र मुद्दाम ठेवतें. म्हणच आहे. " रोचनार्था फलश्रुतिः "

*   *   *

१०५. प्रथम क्रिया करून नंतर फलेक्षा करणारे देखील एकवेळ बरे. परंतु दुसरा वर्ग याहून कठीण. त्याची वस्तादगिरी उलट. ' देवा, मला मुलगा होऊं दे, मग तुला सोन्याची कुंची वाहीन. ' म्हणजे हे देवाची शेंडी अगोदर हातीं घेणार. खरें पाहतां, हा त्या बिचाऱ्या देवावर एक जुलूमच म्हणावयाचा. मुलगा होऊन तूं सोन्याची कुंची वाहिली नाहींस म्हणून देव कधी कुडकुडत होता ! हें सर्व अज्ञानविलसित आहे. देवाचे लायकीवर, कर्तबगारीवर जर खरोखर भरंवसा असेल तर त्याचे उद्देशानें आपल्याला साधेल ती सत्क्रिया प्रथमच करावी व त्याचे इमानावर भरंवसा ठेवून रहावें. असें केलें म्हणून काय चुकलें ? पण हीं माणसें स्वतःच बेभरंवशी, त्यांचा देवावर तरी भरंवसा कसा असणार ? आतां अशांना देव जर पावत असला तर तो त्यांच्यां वचनाला लांचावून पावत नाहीं. पण असल्या बेभरंवशी मनुष्यांचे ठिकाणी श्रद्धा उत्पन्न करून त्यांना भक्तिमार्गाला लावण्याकरितां पावत असावा.

१०६. एखादे गांवाचे वेशीबाहेर जावें आणि तेथे चिरब्रह्मचारी मारुती-रायाचे जे हाल चालले असतात ते पहावे म्हणजे हसूं येतें. कोणी बाई त्याला उलट्या प्रदक्षिणा घालते, कोणी त्याचे अंगाला कागद चिकटविते, कोणी त्यांवर शेण थापते, कोणी डोक्यावर दगड ठेविते. त्या बापड्या अंजनीसुतानें यांचें काय बुडविलें असतें, न कळे. ही कटकट नको म्हणून बिचारा गांवाबाहेर राहिला. पण तेथेही त्याला कोणी चैन पडूं देत नाहींत. पण या बायांना असें समजत नाहीं, कीं त्याला निरपराध असें सतावून तो प्रसन्न कसा व्हावा? त्यापेक्षां तुकाराम म्हणतो. 'तेणें काय नाहीं केली तुझी चिंता । राहें त्या अनंता आठवूनि' हा मार्ग अधिक चांगला नव्हे काय? पण आमची रीत म्हणजे 'आपला दुर्गुण लाविती पराला' अशांतली आहे.

* * *

१०७. आचार्य सांगतात, 'ब्रह्मसत्यं, जगन्मिथ्या.' कोणी म्हणतील "होय, आचार्यांचा सिद्धांत सत्य असेल. पण तो समजून फायदा काय? तर, आपण वाटेनें चाललों असतां आपण ज्यांची सोबत धरिली त्यांपैकीं साव कोण व चोर कोण हें कळणें आपणास जर इष्ट वाटतें, तर आचार्यांचें वरचें म्हणणेंही समजून घेणें अगत्याचें नाहीं काय? संवगडी चोर आहे असें जर आपणास कळून राहिलें असलें तर आपण तशाच दक्षतेनें चालूं,

एरव्ही कदाचित् साव वाटल्यानें गाफील राहूं व दगा पावूं "
म्हणून जगन्मिथ्यात्वाचा आचार्यांचा इशारा गैर फायद्याचा नाहीं
हें उघड आहे.

*   *   *

१०८. पुष्कळांची अशी तक्रार आहे कीं सृष्टींतील वस्तूंचा आम्ही इंद्रियद्वारा दर्शनस्पर्शनादि रूपानें प्रतिदिनीं अनुभव घेत असून वेदान्त त्यांस मिथ्या लेखतें हें कसें! पण वेदान्त तरी तुमचीच भाषा घेतें. आतां एक, क्षणभरें एक, असें बोलणाराला किंवा कृति करणाराला तुह्मी लबाड, फसव्या, ठक, खोटा असें म्हणतां; हें जर खरें, तर या अखिल सृष्टींतील प्रत्येक पदार्थ दर-क्षणीं आपलें रूप पालटीत आहे असा शास्त्राचा जर निरपवाद अनुभव आहे तर असत्या सृष्टीला सत्य म्हणून वेदान्तासारखें चरमशास्त्र आपलेकडे अज्ञपणा घेईल काय?

१०९. 'ज्या जैशी संगति त्या तैशी गति' असा एक सिद्धांत आहे, आणि तो समंजसही आहे. तो मनांत वागविला म्हणजे 'अश्वत्थ' (उद्या न टिकणारा किंवा क्षणभंगुर) अशा या संसाराची संगति करून तोंडघशीं पडण्यापेक्षां 'अच्युताची' संगति करून अढळपद जोडावें हेंच शहाणपण, हें उघड होणार आहे. आणि शास्त्राची हाकाटी तरी एवढ्याचसाठीं आहे.

११०. कोणी म्हणतील आम्ही या जगतांतील वस्तु सत्य समजून त्यांशीं बेधडक व्यवहार करितों व तो आमचा सुयंत्र चालला आहे; मग त्या ' मिथ्या मिथ्या ' म्हणून उगाच कां आमचें डोकें उठवितां? तर बापहो, तुमचें म्हणणें ठीक आहे. पण व्यावहारिक सत्य आणि पारमार्थिक सत्य हीं एक नव्हत. तुह्मी आजकाल एक आण्याबद्दल जें नाणें वापरितां, त्याचे बाजारांत तुम्हाला १६ नाण्यांचे बदला ६४ ताम्रनाणे मिळतात हें खरें. पण परमार्थतः या १६ नाण्यांची किं० सुमारें ३।४ आणे आहे असें म्हणतात. हें जर खरें असेल तर व्यवहार सोडून तुह्मी जेव्हां हीं नाणीं आटून त्यांतील खऱ्या धातूची किंमत उभी करूं जाल तेव्हां ही चूक तुम्हाला उलगडेल. तोंपर्यंतच सर्व ठीक आहे.

१११. राजाज्ञेच्या बलावर नुसत्या चामड्याच्या चकत्या सुवर्णाचें काम करितात व नोटांचें बिडाळें खिशांत ठेवून आपण लक्षाधीश आहों असें शेंकडों धनिक बेधडक मानितात? परंतु जर का दुर्दैवानें तीं बिडाळीं भस्मीभूत झालीं तर मग लक्षाधीशत्वाचे ऐवजी रक्षाधीशत्व उभे राहतें व डोळे पांढरे होतात. या ऐवजी जर खरोखरी सोन्याच्या मोहरा असल्या तर अग्निदाहानेंही त्यांचा नाश होत नाहीं; त्यांचे सोन्याची किंमत उभी राहते. यासाठींच व्यावहारिक सत्तेला परमार्थ सत्ता समजणें परिणामीं फसवितें, हें ध्यानांत वागवून चालावें.

११२. चिखलालाही कस्तूरीचा मान मिळतो. परंतु तो नेपाळेश्वराच्या भाळीं तिलकित असेल तों. मुखरसालाही अमृतरसाची थोरवी मिळते, पण प्रियेच्या ओष्ठप्रांताचा आश्रय आहे तावत्काल, पश्चात् थुंकीची तुच्छता त्याला येते. अर्थात् या व्यावहारिक किंवा कृत्रिम महत्वाचा अखेर टिकाव लागत नाहीं. खरीखुरी कस्तूरी किंवा अमृत यांचीं तशी गोष्ट नाहीं. म्हणूनच अस्सल तें अस्सल.

* * * *

११३. केळीला फळ किंवा लोंगर विशेष जोमदार यावें अशी इच्छा असल्यास ती फळयुक्त होईपर्यंत तिच्या मुळाशीं फुटणारे फरंगडे किंवा मुनवे हे माळी लोक ठेंचून टाकितात, नाहीं तर पिल्यांकडे रस खर्ची पडून मुख्य फळ कमजोर येतें. याचप्रमाणें भक्तीनें परमात्मसाक्षात्कार हेंच मुख्य फळ ज्याला पाहिजे असेल त्यानें अनन्य भावानें निष्काम भक्ति करावी. आपल्या वृत्तीला क्षुद्र वैषयिक वासनांचे फरंगडे फुटूं देऊं नयेत. फुटूं दिल्यास त्यानें मुख्य फळाला हानि पोंचेल.

११४. मनुष्य मात्राचा, किंबहुना, प्राणिमात्राचा हा अनुभव आहे कीं गाढ निद्रा किंवा सुषुप्ती अनुभवल्यानें जो आनंद, ताजेपणा व शक्ति येते ती सुषुप्ति किंवा निद्रा मुळींच नाहीशी होऊन इतर कितीही शामक उपचार केले, कोल्डड्रिंक्स प्यालें, रिफ्रेश-

मेंटरूममध्यें जाऊन आलें, तरीही प्राप्त होत नाहीं. यावरून आनंदाचा ताजेपणाचा, शक्तीचा झरा, प्रशांत स्थितींत आहे, हें उघड आहे.

*　　　　*　　　　*

११५. गंगानदी तीन हजार कोस दूर धांवत गेली व सहस्रमुखी होऊन मोठ्या समुद्रांत शिरली तरी तिला आपला उगम पाहणें तर मागें मुरडूनच आलें पाहिजे. त्याचप्रमाणें जीवाला जर आपला उगम पाहण्याची इच्छा असेल, तर त्यानें सहस्रमुखांनीं विषय-सागरांत शिरण्याचें सोडून मागें मुरडलें पाहिजे. दुसरी तोड नाहीं. 'उलट उलट तूं फिर मांघारा फिर, गोते खाशी." हें सांगणें यासाठींच आहे.

११६. जगाची भाषा कितीदा तरी वस्तुस्थितीचे उलट असते. कोणास आगगाडीवर उशीर झाल्यानें गाडी मिळाली नसतां, तो म्हणतो, 'काय करावें इतकी जिवाची धांदल केली; पण अखेर 'गाडी चुकली.' वास्तविक चुकला हा, पण म्हणतो 'गाडी चुकली.' याच न्यायानें कित्येक लोक आपण अपराध करून देवाला दोष देतात.

*　　　　*　　　　*

११७ पुष्कळ राजकीय फौजदारी खटल्यांत गुप्तहेर हे प्रथम गुन्ह्याचा मुद्दापत्ता लावून तो न्यायासनापुढें गुजरतात. आणि न्यायाधीश किंवा न्यायशास्त्री हा त्या खटल्याची कायदे

शीर मांडणी करून शाबिदि करितो. तथापि त्या खटल्याचें खरें श्रेय डिटेक्टिव्ह (गुप्तहेर) यासच आहे. त्याचप्रमाणें मोठमोठे शास्त्रकार हे ज्या प्रमेयांची शास्त्रीय किंवा पद्धतशीर मांडणी करून सिद्धांत वर्तवितात, तीं प्रमेयें शोधक बुद्धीच्या सामान्य मनुष्यांनीं पुष्कळदा स्वतंत्र रीतीनें अनुभाविलेलीं असतात. शास्त्रकार हे केवळ त्यांची पद्धतवार मांडणी करणारे, इतकेंच. याचप्रमाणें वेदांतशास्त्राचीं प्रमेयें देखील, "आचार्यग्रंथाशिवाय सामान्य बुद्धीस अगम्य आहेत" असें समजून कोणी ना उमेद होऊ नये. हीं कोणाही शोधक बुद्धीच्या मनुष्यांस समजण्याजोगीं आहेत. मात्र आस्था व शोधक दृष्टि पाहिजे.

* * *

११८. एखादे विस्तीर्ण तलावाचे पृष्ठाकडे पाहिलें तर त्यांतील पाणी प्राय: सम पातळींतच असतें. परंतु पात्रांत उतरून चांचपलें असतां तळांत निरनिराळे स्थळीं उथळ किंवा खोलपणा असेल त्या प्रमाणें तेथें पाणी कमी जास्ती असतें. याचप्राणें परमात्म्याचें प्रेम सर्वत्र समपातळींतच असतें. परंतु ज्याचे हृदयाची जशी न्यूनाधिक खोली असेल, त्याप्रमाणें तेथें तें न्यूनाधिक प्रमाणानें सांठतें.

* * *

११९. अधिकाऱ्याची भाषा अधिकार-हीनानें वापरल्यास बाधक होते. कोर्टापुढें उभा असलेल्या कैद्यास "तूं खुनी आहेस;

तुला फाशाची शिक्षा आहे" असें कोणीं अनधिकारी प्राकृत म्हणेल तर ती गोष्ट त्याचे अंगास येईल. ती कोर्टानेंच वापरली पाहिजे. याचप्रमाणें 'जग हें मिथ्या' ही भाषा वशिष्ठ, जनक, शंकराचार्य अशांचेच तोंडीं कायदेशीर आहे. आमचे सारख्यानें वापरल्यास गळ्यांत येणार.

* * *

१२०. मनुष्य मातेवर जें प्रेम करीतो तें तिच्या मोहक आकृतिसाठीं किंवा सौंदर्यासाठीं नसून वात्सल्यासाठीं करितो. याचप्रमाणें भक्ताचें जें देवावर प्रेम असतें, तें त्याच्या भक्त-वात्सल्यास्तव असतें. आकार-सौंदर्यासाठीं नसतें. म्हणूनच जय-देवा सारख्या भक्तांनीं ईश्वराच्या मत्स्यकच्छवराहादि पशू योनींतील अवतारांचेंही मोठ्या प्रेमानें व आदरानें सारखेंच वर्णन केलें आहे. कारण देव माशाचें रूप घेवो कीं डुकराचें घेवो; 'भक्तपरित्राण' हा हेतु सर्वरूपांत कायमच असतो.

* * *

१२१. आमचे गांवीं एका गृहस्थाचे घराचे मजल्यावर आग लागली. खालीं या गोष्टीचा पत्ता नसल्यामुळें घरांतील माणसें नित्याप्रमाणें निःशंक आनंदांत होतीं. पण या आनंदाला काय करितां ? शेजारी बाहेर आला, तों त्याला आढ्यांतून ज्वाळा उठलेली दिसली, तसा तो ओरडत ओरडत त्या गृहस्थाकडे आला कीं "पहातां काय ? पेटलें." याचप्रमाणें संसारी जीव जरी

निःशंक व्यवहारत असले, तरी ज्या सत्पुरुषांना त्यांचे घरांतून धूर निघतांना दिसतो, ते सहजच त्यांना आक्रोशून सांगतात कीं "भाई सावध व्हा!" 'ओढ जळत्या घराचा वासा!'

*　　　*　　　*

१२२ एके गांवीं आमचे शेजारीं एक इसम रहात होता. तो दारूबाज असल्यानें त्याला पगार पुरेना व फांके पडत. एक दिवस त्याला अशी वेळ आली असतां त्यानें एक दारूची बाटली उधार आणून झोंकली व स्वस्थ धुंद पडला. पण दुसरे दिवसा आंतडीं तापून क्षुधेचा कल्लोळ अधिकच उठला. तें ऐकून मी म्हटलें कीं दारूच्या किमतींत पावबिसकुटें आणिलीं असतीं तर याहून ठीक झालें असतें. त्यानें खरें क्षुधाशमन तरी झालें असतें. आह्मी व्यवहारी जीव पुष्कळदां याच मासल्याचें आचरण करितों. संसारिक दुःखें प्राप्त झालीं असतां त्यांचे निवारणार्थ आह्मी जे उपाय योजतों त्यांनीं क्षणैक विराम झालासा वाटला तरी अखेर त्या उपायांच्या दोषामुळेंच तीं दुणावतात. याकरितां अल्प कां होईना पण खरें दुःखहरण करील तोच उपाय सुज्ञानीं करावा.

*　　　*　　　*

१२३ कोणी म्हणतील हा संसारसागर आफाट आहे, धोक्याचा आहे; हें आह्मांस कबूल, पण याचे बाहेर कोठे जाण्यास

सांगतां? तर बाबाहो, बाहेरच गेलें पाहिजे असें नाहीं. खुशाल त्यांतच रहा; दर्याची हवा आरोग्यकारक असते. प्रत्यक्ष परमात्माही समुद्रांतच राहतात. व जार्ज बादशाहा देखील मुबंईस असतां रात्रौ समुद्रांत बोटीवर विश्रांति घेत असत. तेव्हा दर्यांत खुशाल रहा. मात्र नौकेचें सुकाणुं आपले स्वतःचे हातीं न घेतां सुकर्ण-धार जो सद्गुरु त्याचे हातीं द्या. म्हणजे धोका नाहीं व यथाकाल परतीरास पोचण्याविषयीं शंका नाहीं.

* * *

१२४ सद्गुरूला तनु, मन, धन—सर्वस्व अर्पण करावें असें शास्त्र सांगतें व या वाक्याचा फायदा घेऊन कांहीं लबाड गुरु शिष्यांना लुटतात. परंतु, शास्त्राचा हेतु, शिष्याची कसोटी पाहण्याचा आहे, त्याला लुटण्याचा नाहीं. सद्गुरूचें पारडें या विषयसर्वस्वापेक्षांही शिष्याचे मतीनें अधिक महत्त्वाचें आहे कीं नाहीं हें पहावयाचें. कारण सर्व घरदार भरीस घालून जर एका-द्यानें एक हिरा विकत घेतला तर तो अर्थातच त्याला पंचप्राणा-पलीकडे जपेल, हीच त्याची खुण. एरव्ही खऱ्या सद्गुरूला शिष्याच्या द्रव्यादिकांची अपेक्षाच नसते. शिवाजीनें आपलें राज्य गुरुपदीं वाहिलें, म्हणून समर्थांनीं थोडाच त्याचा उपभोग घेतला!

१२५ आचार्यांनीं मायेला 'परब्रह्ममहिषी' अशी संज्ञा दिली आहे. उच्चजातीच्या हिंदूंत सौभाग्यवती दृष्टीस पडली

कीं तिचे पतीचे अस्तित्वाबद्दल निराळा पुरावा लागत नाहीं; तिचे मुद्रेवरच त्याचे अस्तित्वाची खूण असते. त्याला शोधून काढणें हीं गोष्ट वेगळी. पण अस्तित्वाबद्दल निभ्रांति असते. त्याचप्रमाणें मायेवरूनच ब्रह्माचे अस्तित्वाबद्दल अनुमान होतें. त्याला शोधून काढणें ही बाजु उरली; ती असो.

*　　　　*　　　　*

१२६ जिचें रेकणें थांबलें नाहीं तिला गाभ ठरला नाहीं हें खास. ह्याचप्रमाणें ज्याची वटवट किंवा शंका-कुशंका थांबत नाहींत त्याला गुरूपदेश ठरलाच नाहीं असें निश्चित समजावें.

*　　　　*　　　　*

१२७ लोकांत म्हण आहे कीं "दोहीं घरचा पाहुणा उपाशीं." हाच न्याय क्षणांत या देवाची, क्षणांत त्या देवाची उपासना करणारांच्या वांटयास येतो. या साठींच परमात्मानीं सांगितलें कीं मी भक्तांचे पोटापाण्याची फिकिर करितों; परंतु "अनन्याश्चितयंतोमां येजनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां। ही शर्त जे पाळतील त्यांच्या. ठीकच आहे. व्यभिचारिणीला अन्न घालण्याची जबाबदारी नवऱ्यावरदेखील नाहीं. तीच जर अव्यभिचारिणी आहे आणि मग पतीची नावडती आहे तरी देखील तिला अन्नवस्त्र पुरविणें पतीला प्राप्त आहे. कायदा त्याज-

करून तें करवील. एवढा जोर अव्यभिचारितेंत किंवा एक निष्ठेंत आहे. म्हणून अव्यभिचारिणी तीच भक्ति.

*　　　　*　　　　*

१२८ कोणत्याही समर्थ व न्यायी राजाची अनन्य मनानें व स्वामिनिष्ठेनें नियत काल सेवा करून पसंतीपत्र मिळविलें असतां त्या नोकराला वृद्धापकाळीं तो बसेल त्या ठिकाणीं किंवा त्याची मर्जी लागेल त्याठिकाणीं त्याचें वेतन (पेन्शन) राजा पोंचतें करितो. नोकरीच्याच गांवीं घेतलें पाहिजे अशी कांहीं अट घालीत नाहीं; असे त्याचे लाड पुरवितो. याप्रमाणें जर मानवी राजे सेवकांचे एक-निष्ठते-पुढें परवश होतात; तर मग जो सर्वगामी व मूळचाच दयाघन तो आपल्या अनन्यनिष्ठ भक्ताला बसले ठिकाणीं अन्नपाणी पुरवील यांत संशय कशाला ? म्हणूनच म्हटलें आहे "भोजनाच्छादने चिंतां वृथाकुर्वंति वैष्णवाः।"

*　　　　*　　　　*

१२९. हें ऐकून कांहीं आळसडे लोक म्हणतात "हं, कशाला दगदग करा, 'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी.'" होय; म्हण सरळ आहे व खरी आहे. पण ती म्हणणाराला मात्र लागू नाहीं. व म्हणूनच अनुभव देत नाहीं. "माझा हरी" हे शब्द वापरण्याचा अधिकार भलत्याला नाहीं पोचत. हरी कोणाचा ? त्याचा हरि विकला हरि विकला । प्रेमें हरिगुण

शिकला–तुकाराम म्हणतात: “त्यांचा भार वाहे माथा, करी योगक्षेम–चिंता” ॥ + + ॥ **तुका म्हणे जीवें । अनुसरतां एका भावें** ॥ “किंवा भक्त देवाघरींचा सुना ।–देव भक्ताचा पोसणा । “येर येरा जडलें जैसें । जीवा अंग जैसें तैसें–” हें ज्यांच्या अंगीं वसत असेल त्यांनीं वरील म्हणीचा आश्रय करावा आणि अनुभवही पहावा. इतरांचा हक्क नाहीं.

* * * *

१३०. आपले धनी जपानचे मिकॅडो मृत झाले हें पाहून जनरल नोगींनीं आपले प्राण दिले, या स्वामिनिष्ठेबद्दल अलं दुनिया तोंडांत बोट घालून राहिली आहे. पण मृत धन्याला त्या निष्ठेचा उपयोग नसल्यानें कोणी तिला अविचाराचेही सदरांत ढकलतात. याहीपेक्षां स्वतःचे प्राणदानानें स्वामीचें उज्जीवन करणारा उभयतोपरि श्लाघ्य गणावा हें उघडच आहे. आणि म्हणूनच स्वतःचा प्राणखर्ची घालून आपला स्वामी जो अर्थ त्याला सजीव[1] करणारा, शब्द, याची थोरवी केवळ अवर्णनीय आहे, असें रसिकवर्य ज्ञानेश्वर ‘अमृतानुभवांत’ म्हणतात, तें योग्यच आहे.

* * * *

१३१. मुंबई येथील गिरण्यांचीं प्रचंड यंत्रें हालविणारी दिव्य-

१ कोणताही शब्द श्रोत्यांचे मनांत वस्तु (अर्थ) उभी करून आपण नाहींसा होतो.

शक्ति ज्यापासून निर्माण होणार तो प्रचंड जलप्रवाह टाटा यांनीं निर्माण केला नाहीं. तो लोणावळ्यावर अनादि सिद्ध प्रभूत पर्जन्य-वृष्टिरूपानें होताच होता. टाटांची कर्तबगारी एवढीच कीं त्यानीं प्रचंड बंधारे बांधून त्या जलवृष्टीला संधारण पात्र निर्माण केलें. याचप्रमाणें ईशकृपेचा ओघ या सृष्टीवर अनादिसिद्धच आहे. तो जीव निर्माण करूं शकत नाहींत व करण्याचें त्यांस कारण नाहीं. जीवांची कामागिरी एवढीच कीं तो संगृहीत करण्याची आपले ठिकाणीं पात्रता आणणें.

* * * *

१३२. ग्रीष्मऋतूंत एके दिवशीं ऐन दुपारीं मी आग-गाडींत बसलों असतां गाडीचे डबे तापून अनिवार उष्णतेनें जीव व्याकुळ होऊं लागला. इतक्यांत आमच्या समोरच्या रूळा-वरून एक मालगाडी आली. तींत बऱ्याच उघड्या वाघणी असून त्यांत नदींतील जाड वाळू गच्च भरली होती व या वाळूंत कांहीं हमाल स्वस्थ पणें डारडुर निजले होते. तें पाहून मला हंसू आलें व स्वतःबद्दल लाज वाटली. मला वाटलें कीं चंड-किरणाचा अपराध नसून इंद्रियांचें आजन्म फाजील लालन करणाऱ्या माझा आहे. मनुष्यांचीं पुष्कळशीं दुःखें त्यांनीं स्वदोषानेंच निर्माण केलीं आहेत ईश्वराकडे बोल नाहीं, अशी माझी खातरी झाली.

* * * *

१३३. खंडाळा रिव्हर्सिंग ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांच्या ध्यानांत येईल कीं जर सहजगतीनें व चढत्या क्रमानें तळजमिनीचा घाटमाथ्याशीं संबंध जोडणें तर किति किति दूरवर स्लोप न्यावा लागला असता. परंतु एका चतुर शिल्प्यानें खट्दिशीं गाडीचे मार्गाची दिशाच उलटली व यामुळें घाटमाथा तेव्हांच दिसूं लागला. कर्ममार्गानें (पिपीलिका मार्गानें) चालणाऱ्या संसारी जीवांना परमार्थाचा घाटमाथा दिसण्यास दीर्घकाल लागतो. परंतु, तोच वैराग्याचा खटका उडून एकदम दिशा फिरली असतां सिद्धि नजीक येते.

१३४. वाहते पाण्यांत नाव स्थिर ठेवणें म्हणजे ती वजनदार नांगरांनींच खुंटविली पाहिजे. याचप्रमाणें संसाराचे लोटांत सांपडलेलें मन स्थिर करणें तर त्याला भक्तीचें भक्कम खुंटवण पाहिजे. कोंडलेल्या शांत पाण्यांत नाव स्थिर करण्यास कष्ट पडत नाहींत. याचप्रमाणें श्वासोच्छ्वासाचे प्रवाहाबरोबर चांचल्य पावणारें चित्त श्वासाचे कुंभकावस्थेंत अल्प कष्टानें स्थिर होऊं शकतें व एकांत हा चित्तस्थैर्याला बहुत उपकारक होतो, म्हणून होईल तों साधकानें एकांत व प्राणायाम साधावा.

*　　　*　　　*

ह्या एंजिनिअरचें नांव "बर्क्ले" असें होतें, असें कळतें.

१३५. आमच्या श्रुति मातेनें "एकमेवाद्वितीयं । नेहनानास्तिकिंचन" (एकच आहे, अद्वितीय आहे; यांत नानात्व मुळींच नाहीं) म्हणून या दृश्याचें सत्य स्वरूप आह्मास केव्हांच सांगून दिलें. परंतु, आम्ही जडमति व फाजील शहाणे. आम्ही म्हटलें, 'सर्व एकच कसें होईल? म्हणे 'सोनें आणि लोखंड एकच.' हें कोणी ऐकावें?' मग आम्ही आपल्या घमेंडींत शोध करीत चाललों, तों अखेर काय झालें? 'ये रे माझ्या मागल्यां[1].'

*　　　　*　　　　*

१३६. आजकाल चतुरुदधिमालामेखला अशा पृथ्वीचें राज्य जार्ज बादशाह करीत आहेत. अर्थात् एवढ्या आफाट राज्याचें नियमन करण्यांत अनेक प्रतिनिधि अधिकारी योजिले आहेत; परंतु असें असून तें सुयंत्र चाललें आहे. याचें कारण त्यांत **एकसूत्रीपणा** आहे. तो सुटल्यास तें चालणार नाहीं, अशी

१ The more recent result of the Experiments and observations of the Roentgen, Buequerrel, and now also the Radium Rays, is that everything originates from One Source, and that everything, flower, stone, metal, air, living organisms &c, are nothing else than different aggregations.

VON DER GOLTZ.
Manual & clinical Repertory.

इतिहासाची साक्ष आहे. अर्थात् बाह्य द्वैत झालें तरी तें हृद्गत अद्वैतावरच जगणार, एरव्हीं त्याची धडगत लागणार नाहीं.

* * *

१३७. दर्यावर्दी लोक समुद्राला चंद्रोदयीं भरती आली व चंद्रास्तीं ओहोट वळला असें म्हणतात, व भरती आल्यानें आपलीं जहाजें लौकर जातील म्हणून सुखी होतात व ओहोटीनें कुचंबतील म्हणून दुःखी होतात. कवि तर चंद्रोदयाबरोबर समुद्राला पुत्रोत्सवाप्रमाणें आनंद होतो म्हणून जगाला सांगत सुटतात. पण खुद्द समुद्राला विचारावें तर तो म्हणतो, 'भरतीनें माझ्यांत एकही बिंदु अधिक वाढला नाहीं; ओहोटीनें कमी झाला नाहीं. तेव्हां तुमचे हें बोलणें घेऊन मला काय कर्तव्य?' स्थितप्रज्ञ जो आहे त्याचीही भाषा अशीच असते. विषयसंयोगानें त्याचे सुखास भर पडत नाहीं, वियोगानें न्यूनत्व येत नाहीं. तेव्हां लौकिकी भाषेचें त्याला सहजच हंसूं येतें.

* * *

१३८. तेंच मन बंधाला व तेंच मोक्षाला कारण होतें, असें शास्त्र सांगतें. व एकाच वस्तूचे हे विरोधी धर्म पाहून हें बोलणें प्राकृतांस पटत नाहीं. परंतु, जड पदार्थांत देखील हा चमत्कार दिसून येतो. आजकालच्याही हनेमन होमिओपाथी यांच्या चिकित्सा पद्धतींत असें दिलें आहे कीं पेलेच्या पेले काफी

घ्याल्यानें जो निद्रानाश होतो तो तीच काफी होमोपॅथिक डोज म्हणजे अत्यंत सूक्ष्म अशा कणप्रमाणानें दिल्यानें दूर होतो. अफूनें अवष्टंभ होतो हें सुप्रसिद्धच आहे. पण हॅनेमनचे अफूचे (२०० शक्तीचे) नुसत्या हुंगण्यानें मलशुद्धि साफ होते. त्याचप्रमाणें स्थूलविषयांत मिसळून गेलेलें मन हा भवरोग उभा करितें व आकाशवत् सर्वगत अशा सूक्ष्मरूपाशीं एकजीव झालें असतां तेंच भवरोगाचाच नाश करितें.

*　　　　*　　　　*

१३९. कित्येक अश्रद्धालु लोक म्हणतात कीं ' पितरांचे उद्देशानें येथें ताम्हनांत सोडिलेलें पाणी ते असतील तेथें त्यांना कसें पोंचेल? पण यांस असा प्रश्न आहे कीं तुह्मी आपल्या प्रयागच्या स्नेह्याला पाठविण्याकरितां येथें दहा रुपयांची पोस्टल मनीआर्डर करितां व पोष्टमास्तरपाशीं एक दहा रुपयांची नोट देतां. पुढें तुमचे स्नेह्याला तीच नोट देतात किंवा देणें जरूर असतें काय? हेंच सरकार प्रयागास असल्यानें व त्यानें तुमचा पत्कर घेतल्यानें तेथच्या तिजोरींतून दहा रुपये तुमच्या स्नेह्यास पोंचतें करितें. याचप्रमाणें आम्ही पितराचे उद्देशानें आपले विहिरींचें दिलेलेंच पाणी पितरांकडे गेलें पाहिजे असें नाहीं. सरकारस्थानीय जो सर्वगामी सर्वशक्ति ' जनार्दन वासुदेव ' त्याचेकडे तें एथें दिलें असतां तुमचे पितर स्वकर्मफलानें जेथे गेले

असतील तेथे त्यांचा मोबदला त्यांस तो पोंचता करूं शकतो, असें म्हणणें गैर हिशोबी कां ह्मणावें ?

१४०. एकदां एक स्त्री-पुरुष स्वयंपाक घरांतील मीठ–मिसळणाचीं पाळीं ठेवण्याकरितां दोन खुंट्यांवर फळी बांधीत असतां एक खुंटी हालत होती म्हणून त्या फळीला व त्या खुंटीला अधिक गच्च वेढे देऊं लागलीं. तें पाहून मला हसूं आलें व मीं म्हटलें, 'हें काय वेड ? ती खुंटी भिंतींत भक्कम बसेल असें करा. वरची फळी जर त्या खुंटीचे आधारावर रहाणार, तर तिलाच आणखी आटे घेऊन काय फळ ?' तेव्हां त्या दंपत्याच्या लक्ष्यांत ती चूक आली. पण आम्ही ही चुकी सर्वदा करित आहों. हजारो रुपये खर्चून कोणी विटबंदी, तर कोणी दगडी, तर कोणी लोखंडी, घरें बांधित असतात. पण ज्याच्या नांदणुकीसाठीं हीं भक्कम घरें बांधावयाचीं त्याच्या बळकटीबद्दल फिकीर मुळींच करीत नाहींत.

१४१. एक दिवस दारावर बोहरीण आली असतां आईनें घरांतील एक जुना शेला तिला द्यावयास काढिला. मी म्हटलें, 'देतां कां ?' आई म्हणाली 'तो आतां जीर्ण झाला आहे. त्यावर ती पितळ्याचें जड बुडाचें भक्कम कोरें पातेलें देत आहे. तें तीन पिढ्या टिकेल.' मी म्हटलें ठीक! व मनांत म्हटलें कीं क्षणध्वंसी वस्तु टाळून तिचे ऐवजीं चिरस्थायीचा संग्रह करावा ही बुद्धि जर परमात्म्यानें आम्हांस दिली आहे, तर मग आम्ही अशाश्वत संसा-

राचे नादीं लागून शाश्वत पद गमविणें म्हणजे डोळे असून खांचेंत उडी टाकणेंच किंवा कळून मूर्ख होणेंच नव्हे काय ?

*　　　*　　　*

१४२. हा भावड्या, हा शंकऱ्या, हा विष्ण्या, हें धडधडीत जाणत असतांही रात्रौ रंगभूमीवर तो नायिका नटून मुरडूं लागला असतां ती जन्मसिद्ध सुंदरी असावी अशा आस्थेनें जे तिला निरखीत सुटतात व तितका वेळ तरी गुंग होतात अशा प्रवृत्तीचे जीव मायेचे मिथ्यात्वाबद्दल तक्रार करीत नसले म्हणून त्यावर विश्वासून उपयोग नाहीं.

१४३. आम्ही मोठे पक्के, कोणाचे थापेला फसावयाचे नाहीं अशी आम्हांस घमेंड आहे. पण अनुभव पहावा तों आमच्या सारखे बावळे कोणी नसतील. आम्ही एकाद्या पदार्थाचे वर्णन करूं लागलों असतां म्हणतों, 'वा: ! आजची आमटी किती गोड झाली आहे ! केवळ **अमृत** !'—आतां अमृत हा पदार्थ प्रत्यक्षतः आह्मां-पैकीं कोणीही पहिला नसून आमचें त्याचे नामग्रहणानें समाधान होतें ! आपले हाताचे बोटांचीं नावें अंगुष्ट, तर्जनी, मध्यमा, अनामिका व कनिष्ठिका, अशीं आपण घेतों, तेव्हां सर्व अंगुलींची ही विशिष्ट नामें आहेत, असें आपण बहुधा समजतों. पण 'अनामिका' शब्द तपासतां त्या अंगुलीला मुळीं नामच नाहीं असा अर्थ बाहेर पडतो. पण हा अर्थ ध्यानांत न वागवितांच आम्ही हा शब्द एका

विशिष्ठ संज्ञेप्रमाणें वापरतों. अनॉटमिचा विद्यार्थी अस्थींची नामावळी घोकीत असतां तींत एका अस्थीचें Innominate Bone म्हणून नांव घोकितो. पण त्याचे ध्यानांत हें वागत नाहीं कीं या अस्थीस नामच नाहीं. हाच जर आमचा पक्केपणा आहे, तर मग आचार्यांनीं आमच्या पुढें 'मायावाद' मांडला म्हणून त्यांवर कां उठावें?

* * *

१४४. गणितांत किंवा अंकशास्त्रांत एक, दोन, तीन इत्यादि संख्यांना आकार व स्थान मिळणें हें ठीकच आहे, कारण त्या सद्रूप आहेत, परंतु शून्य हें असद्रूप किंवा अभावरूप आहे. अर्थात् शून्य म्हणजे कांहीं नाहीं असें जर आहे: तर त्याला आकार व स्थान देणें याला काय म्हणावें? बरें, एवढें हें निरर्थक शून्य काढून टाका म्हणून गणित्याला सांगितलें, तर तो म्हणेल 'त्या वांचून संख्येचा व्यवहार अडेल; आणि शून्याला या ठिकाणीं जरी किंमत नसली तरी १० या अंकात किंमत आहे. हाच न्याय मायेचा आहे. ती जरी कांहीं नाहीं, तरी तिला आकार व स्थान दिल्याशिवाय व्यवहार अडतो. खेरीज एकाचे आश्रयानें ज्याप्रमाणें शून्याला सत्ता येते त्याचप्रमाणें सदधिष्ठान (परमेश्वर) त्याचे आश्रयानें मायेला सत्ता (व्यावहारिक) येते.

१४५. आपल्या भाषेंत शून्याचा किंवा अभावाचा दर्शक ' नाहीं ' हा शब्द आहे; व ' नाहीं ' म्हटलें म्हणजे "ओ, हो; बोलणेंच संपलें;" असें आपणास वाटतें; तरी पण एकादा शब्द-वैद्य ' नाहीं ' या शब्दाचें पोट चिरून पाहूं लागला असतां त्याला आढळतें कीं, नाहीं=(न + आहे). अर्थात् हें जरी अभाव रूपसें बाहेरून वाटतें तरी तें (आहे) या भावरूपानें किंवा सत्तेनें अनुस्यूत आहे. एरव्ही त्याला बैठकच नाहीं. कोणी म्हणेल आम्ही नुसताच ' न ' असा ' प्रयोग ' करूं. तर न्यायशास्त्री तुह्माला अप्रयोजक म्हणेल. तुम्ही जरी सत्ता लपविलीत तरी तो ती भर घालील, तेव्हांच तुमचें विधान किंवा वाक्य पत्करील. सारांश, मायेला जें अस्तित्व भासणें तें देखील अधिष्ठानाचे अनुस्यूततेमुळें भासतें. स्वतंत्र सत्ता तिला नाहीं.

* * *

१४६. श्रुतीनें ब्रह्माबद्दल 'नेति नेति' असे उद्गार काढलेले पाहून कोणी अर्थ करितात कीं श्रुतीला ब्रह्म समजलें नाहीं. परंतु एखाद्या माणसापुढें आपण शंभर भांडीं ठेवून सांगितलें कीं तुझें कोणतें तें निवड. आणि समयीं त्याचें भांडें त्यांत नसल्यामुळें त्यानें ' हें नव्हे, हें नव्हे ' म्हणत सर्व भांडीं टाकून दिलीं. म्हणून त्यावरून त्याला त्याचे भांड्याची मुद्दल ओळखच नाहीं असें आपण समजतों काय ? त्याला पक्की ओळख आहे. पण पुढें आलेल्या

भांड्यांत तें नाहीं, एवढेंच आपण मानितों. तसाच येथेंही वास्तव प्रकार समजावा. आणि म्हणूनच म्हटलें आहे " यो नतद्वेदतद्वेद " " जो तें जाणत नाहींसें म्हणतो, तोच तें जाणतो."

* * *

१४७. गायत्री मलभक्षण करीत असून तिला धर्मभोळे हिंदुलोक पवित्र मानितात म्हणून कित्येक परधर्मी व क्वचित् आमच्यांतील कोणी विनोदरसिक, हिंदूंची कुत्सा करितात. पण मला वाटतें पवित्र या शब्दाचा खरा अर्थच यांना समजत नसावा. पवित्र म्हणजे पावन किंवा शुद्ध करणारें; अर्थात् अशुद्धाला किंवा मलि-नाला निर्मलता देणारें, तें पवित्र. गाय दुर्गंधिमल भक्षण करिते हें खरें. पण त्यामुळें स्वतः गाईचें दुग्ध किंवा मलमूत्र याला ती दुर्गंधि येत असल्याचा अनुभव नाहीं. अर्थात् हीच तिचे पवि-त्रतेची साक्ष नव्हे काय ? मोरोपंत म्हणतात " स्ववत्समल भक्षिती पारि न त्या कदा बाटती. "

१४८. हुताश किंवा अग्नि हा सर्वभक्ष आहे. अग्न्यागारांत (आगियारी, पारशांची) तो सुगंधि चंदन भक्षण करितो किंवा स्मशानांत वसा, मांसयुक्त, प्रेत भक्षण करितो, तरी त्याचे पवि-त्रतेला बाध नाहीं. समुद्रांस गंगातुंगभद्रा इत्यादि नद्या मिळतात; नाले, गटारेंही मिळतात. तथापि, त्याचें पाणी पहिल्यानें अधिक शुद्ध होत नाहीं, दुसऱ्यानें घाण होत नाहीं; आणि म्हणूनच सर्व तीर्थांहून सागराला श्रेष्ठ म्हणतात. कवीनें म्हटलें आहे

'तीर्थोदकंच वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः." दुसऱ्याकडून शुद्धता मिळविण्याची ज्याला अपेक्षा असेल त्याला पवित्र कसें म्हणतां येईल?

१४९. त्रयोदशगुणी विडा व त्यांत केवड्याची कातगोळी खाल्यानें एकादी मत्स्यगंधाही क्षणभर पक्वबिंबाधरोष्ठी व मुखोच्छ्वासगंधिनी होईल; अथवा फॅमोरा किंवा सुरंगी अंगावर ओतून एकादा लशाही सुगंधराज भासेल, म्हणून त्या मत्स्यगंधेला, जन्मतःच जिच्या मुखाला सहज सिद्ध सुवास येत असतो अशी जी कामशास्त्रज्ञांनीं स्त्री रत्नांत सर्वोच्च ' पद्मिनी ' म्हणून वर्णिली तिची योग्यता, किंवा त्या लशाला, आत्मपुराण व कांहीं योगाशास्त्रावरील ग्रंथ यांत वर्णन केल्याप्रमाणें ज्याचे अंगांतून सहज सुगंधोद्गार चालेले आहेत असा योगिराज याची योग्यता येईल काय ? अर्थात् निर्मल वस्तूचे संसर्गानें निर्मल होणारें तें पवित्र नव्हे; तर अशुद्धाला शुद्ध करणारें किंवा मलिनाला निर्मलता देणारें तच खरें पवित्र. या दृष्टीनें गायत्रीचा पवित्रपणा निर्बाध आहे.

१५०. रस्त्यांतून झांकली गाडी चालली तरी दुतर्फा घरांतील रहिवाशांस नाकबंदीची पाळी आणणाऱ्या द्रव्याचा सुवासिकपणा विख्यातच आहे. पण असल्या सुगंधी खताचे गाडेचे गाडे प्रत्येक मळ्यांत सर्वत्र ओतले जातात व त्यावर पोसले जाऊन उसासारखे मधुरतम तृणजात व अनेक आहार्य शाखा, कंद, फलें निर्माण

होतात, म्हणून त्या उद्भिज्जांना कोणी अपवित्र मानिलें आहे काय? देवीदासानें म्हटलें आहे, 'काकविष्ठेचे होती पिंपळ, तयांस नीच कोण म्हणे?' खरेंच; मग बिचाऱ्या गोमातेची कुत्सा कां करावी!

१५१. डामर, गंधक, फेनेल, राकेल; कॅर्बोलिक, दवाखान्यांतील आयडोफार्म, हीं घ्राणतर्पण कसें करितात तें सर्व सुवासप्रिय रसिकांस विदितच आहे. पण हवा घाण झाली असतां वरील पदार्थ ते जाळतात, फेंकतात. राकेल तर मुंबईसारख्या शहरीं अनेक शोकी स्त्रीपुरुषें जावयाच्या सुप्रसिद्ध मार्गांवरून पाण्यासारखें शिंपतात. अर्थात् हे पदार्थ स्वतः जरी सुगंधी नाहींत तरी अपकारक दुर्गंधाचा नाश करितात असा शास्त्रज्ञांचा अनुभव आहे; म्हणून त्यांचा, मुष्क, हिना इत्यादि सुगंधी पदार्थांपेक्षाही अधिक फैलाव होतो. मग ज्याचे योगानें खरोखरच घ्राणतर्पण होतें असलें हैयंगवीन, सद्यः शुक्रकर असलें पय, वैद्यशास्त्रानेंही 'काय-शोधनं' असें अनुभाविलेलें गोमय व गोमूत्र, हीं जी पासून प्राप्त होतात, ती मलभक्षण करीत असली म्हणून तिला अपवित्र मानणें समंजस होईल काय?

*　　　　*　　　　*

१५२. पुष्कळ लोक आश्चर्यमूढ झाल्यासारखें दाखवून विचारितात कीं बाकी सर्व खरें; पत्करलें. पण हें तुमचें 'अज्ञान' आले कुठून? मूळ जर सर्व ज्ञानमय आहे, तर मग हें 'अज्ञान'

आलें कुठून ? आम्ही विचारतों कीं अमूक एक कावळा आला कुठून ?"
एक शाहणा उत्तर करितो, "अस्तमानीं कोणत्या घरटयांत दडतो तें पहा, म्हणजे कळेल." खरेंच. मग अज्ञान हें अस्तमित होतांना कशांत लपतें, तें पहा म्हणजे तें आलें कुठून तें तुमचें तुम्हालाच कळेल. कारण, कार्य हें कारणांतच लीन झालें पाहिजे.

१५३. एक कामी एका सौंदर्य-लतिकेला पाहतांच गुंग होऊन गाऊं लागतो ' नोहे नारी चंचल वल्ली ' इ० तें ऐकून एक तत्त्ववेत्ता उत्तर करितो ' नोहे नारी, नोहे वल्ली, ही माती ओली–' असल्या सौंदर्य सौदामिनीला, असल्या दिव्य वस्तूला ' ओली माती ' म्हणणारा हा मूर्ख किंवा अज्ञान असला पाहिजे असें त्या कामीला वाटलें. परंतु, कालवशात् त्या बिजलीची हाल-चाल बंद पडल्यावर स्मशानांत तपासणी करतां तत्त्ववेत्त्याचेच शब्द खरे ठरतात व झळकत होती ती सारी मातीच असें अनु-भवास येतें. अर्थात् कोणत्याही वस्तूची जात किंवा उत्पत्ति ओळ-खणें तर ती अखेर लय कशांत पावते, तें पाहिल्यानें आपोंआप ध्यानांत येतें. याच धोरणानें अज्ञान कुठून आलें हें शोधावें.

१५४. प्रकाश येतांच अंधकार नष्ट होतो किंवा अंधकार हा प्रकाशांत लीन होतो. अर्थात् अंधकार हा प्रकाशांतूनच आला असें म्हटलेंच पाहिजे. सूर्यप्रकाश होतांच शैत्य उडतें अर्थात् शीत हें उष्णांतूनच आलें असें म्हटलें पाहिजे. या कायद्याप्रमाणें अज्ञान हें ज्ञानांतूनच उद्भवलें पाहिजे. दुसरें यास उत्तरच नाहीं.

१५५. ' अंधकार प्रकाशांतून आला, शैत्य उष्णांतून आलें अज्ञान ज्ञानांतून आलें, हें सिद्धांत ऐकून कित्येकांना सिद्धांत्याचें हें धाष्टर्य वाटेल. ते म्हणतील हें काय बोलणें? ' गोकुळ अष्टमी आणि शेखमिरा ' असला हा प्रकार! तर, आज हिंदुस्थानांत तसेंच आहे. ' आम्ही जातीचे ब्राह्मण, आमचे बंधु मुसलमान ' हेंच इष्ट आहे.

१५६. " ब्राह्मणाचे बंधु मुसलमान " असलीही भाऊ बदंकीच विलक्षण आहे. हें जुळ्याचें दुखणें आहे. एक आलें कीं त्याचे पाठीला पाठ लावून दुसरें उभेंच आहे. आणि म्हणूनच या झोंबटाला द्वंद्व म्हणतात. आणि याच्या नावानें उपनिषदांपासून तों व्यवहारापर्यंत जेथें तेथें ओरड आहे; आणि ज्याला आत्मस्थिति पाहिजे असेल त्यानें प्रथम ह्या झोंबटांतून सुटावें कसें तें शिकलें पाहिजे. ' द्वंद्वातीत किंवा निर्द्वंद्व हो ' म्हणून परमात्मा कृष्णाची अर्जुनास टोंचणी आहे ती या साठींच.

१५७. ' थर्मामीटर ' हें बहुतेकांस माहित आहेच. याचे नांवाप्रमाणें याची कामगिरी म्हणजे उष्णता मापण्याची आहे. पण तें हातीं घेऊन पहावें तों त्यावर Boiling Point (उत्कार्थरेषा) असते, त्याचप्रमाणें Freezing Point म्ह० हिमरेषाही असते! खरें पाहतां उष्णतामापकाचे घरीं शीताचें ठाणें कां असावें? यांचें सुतडे-पोतडें कांहीं तरी असलें पाहिजे नव्हे काय? मग

कोणा चतुरानें सांगावें बरें कीं शीत हे उष्णाचें कोण? तें कोठून आलें आणि उष्णाचे दारांत दाटून कां बसलें? अर्थात् याचप्रमाणें शीत-उष्णाचें जर एक गोत्र आहे, तर अज्ञान-ज्ञानाचें असणें अशक्य कां वाटावें?

*　　　　*　　　　*

१५८. बीज गणितांत अज्ञात संख्येची किंमत समीकरणावरून ठरवितात. याच युक्तीनें 'सुख' कशाला म्हणतात, हें कोडें उकललें पाहिजे. शेरभर अन्नाची ज्याला भूक, त्याला अच्छेरच अन्न मिळालें तर त्याची तळमळ शिल्लक असते; बरें, दीडशेर पोटांत घातलें तरी तो तळमळत पडतो. एतावता (प्राकृत समजुतीप्रमाणें) दुःखदायक क्षुधा व सुखदायक अन्न यांचें जेव्हां समीकरण होईल, तेव्हांच तृप्तिरूप खरें सुख प्राप्त होईल. अर्थात्: अ (अन्न) व ब (बुभुक्षा) ही व स (सुख) हें अज्ञात संख्या-स्थानीं धरिलें व बुभुक्षाही ऋण-चिन्हांकित कल्पिली, तर अ+(−ब)=स, असें समीकरण होणार म्हणजे अ−ब=स असें होणार. परंतु अ व ब हे समान किमतीचे असल्यानें ब चे जागीं अ घातला असतां अ−अ=स होणार. हेंच अंकरूपानें मांडल्यास १−१=स असें होतें म्हणजे स ची किंमत ० अशी होते. म्हणजे पारमार्थिक किंवा खरें सुख[1] हें प्रातिभासिक दुःख व प्रातिभासिक सुख या द्वंद्वाचे लोपानें अनुभवास येणारें आहे, असें उत्तर येतें.

१ प्रतीकारो व्याधेः सुखमिति विपर्यस्यातिजनः। —भर्तृहरिः

१५९. भुकेनें व्याकूळ होऊन लोळतो आहे अशाला हरबऱ्याची रुचकर आंब पाजली तर तो आणखी उलथा पालथा होईल; तीच अजीर्णामुळें मोडशी होऊन तडफडतो आहे अशाला देतांच तो निरामय होऊन हसूं लागेल. आतां येथें काय न्याय द्यावा? आंब सुखरूप कीं दुःखरूप? सुखरूप म्हणावी तर तो बुभुक्षु ओरडणार; दुःखरूप म्हणावी तर तो अजीर्णी वकीलपत्र गुजरणार, पंचाईत आली; करावें काय?—चूप बसावें.

१६०. न्यायाधीशाला चूप बसणें शोभत नाहीं. त्यानें न्याय दिलाच पाहिजे. कोडें सुटतें कसें? तें सोडविण्यासाठीं या स्वरूपाचे आणखी खटले पाहिले पाहिजेत. मित्राचा संयोग सुखावह होतो, शत्रूचा दुःखावह होतो. यावरून संयोग सुखावह कीं दुःखावह? स्फटिक जपापुष्पावर ठेवला असतां रक्त दिसतो, तिलपुष्पावर ठेविला असतां पीत दिसतो. तेव्हां स्फटिक लाल कीं पिंवळा?—दोहोंतून एकही नाहीं. यावरून पदार्थ सुखरूपही नाहींत व दुःखरूपही नाहींत. यापैकीं त्यांना कोणतेंही विशेषण दिलें तरी पापच. म्हणूनच परमात्मानीं हें पाप टाळण्याची अजब युक्ति सांगितली. ती युक्ति म्हणजे "सुखदुःखे समेकृत्वा" अर्थात् दोन्हीही खोटीं समजावीं. तुकाराम म्हणूनच म्हणतो 'न म्हणे कोणासी उत्तम वाईट, महत्व वरिष्ठ नसे जेथे!'

१६१. कोणी म्हणेल "सुखात्मक वा दुःखात्मक अशीं

दोनरूपें असून मुळींच फुकट किंवा खोटें म्हणणें,' हें काय? उभयरूप कां न म्हटलें? "न्याय तरी होईल"-ठीक आहे. एका बाईला बहुत दिवशीं एक सुंदर अपत्य झालें; वार्ता ऐकतांच अत्यानंद झाला. पुढें सुईण बोलते कीं 'उभय-चिन्हें आहेत'! बोलाईचे उपयोग!' तें ऐकतांच आनंद मावळला. असलें पोरटें झालें काय आणि न झालें काय, व्यर्थ शीण पडला. तेव्हा उभय-रूपतेंत कोणता फायदा? असलें दृष्टिआड होईल तें बरें. यासाठीं निर्द्वंद्वता हें खरें सुख. म्हणून परमात्मानीं म्हटलें 'निर्द्वंद्वोहि महाबाहो सुखंबंधात्प्रमुच्यते.'

*   *   *

१६२. गरजु मनुष्य सावकारानें ओंजळभर रुपये देतांच आपली गरज भागली म्हणून आनंदित होतो. परंतु हे रुपये जीव गहाण ठेवून त्याचे सव्याज परत केले पाहिजेत हा विचार उभा राहतांच तें सुख नष्ट होतें. हेच त्याचे मालकीचे रुपये हातीं आले असते तर त्याला निव्वळ सुख झालें असतें. अर्थात् विष-यांचे उसनवारीनें प्राप्त होणारें सुख खरें नसून आभासमात्र किंवा दुःखानुबंधि आहे. खरें खरें सुख म्हणजे जें परानपेक्ष किंवा स्वसत्तेचें तेंच.

*   *   *

१६३. म्युनिसिपालिटींत जन्म मृत्यूची नोंद ठेवणारा मनुष्य असतो त्याला मृत्यूची नोंद दुःख देत नाहीं व जन्माची सुख

देत नाहीं. (आणि तसें होऊन उपयोग नाहीं. तो तेथे हंसत किंवा रडत बसेल तर कर्तव्याला अडथळा येईल.) त्याचे सुखाचा हेतु निराळाच आहे. नोकरी किंवा कर्तव्य काळजीपूर्वक बजावणें हाच त्याला सुखहेतु. कारण, त्यामुळें त्याला पगार मिळणार. त्याचप्रमाणें मनुष्याला खरें सुख मिळविणें तर स्व-कर्तव्य बजावणें हें एकच त्याचें साधन. कारण त्याची बक्षिसी त्यावर अवलंबून आहे. या करितांच भगवंतांनीं " सुखदु:खे०-ततो युद्धाय युज्यस्व, नैनंपापमवाप्स्यसि । असें म्हणून क्षत्रि-याला कर्तव्यभूत असें युद्ध करण्यास सांगितलें. कारण त्याची बक्षिसी युद्ध करण्यांत ऊर्फ स्वकर्तव्य करण्यांतच होती.

* * *

१६४. सामान्यांची भाषा व शास्त्रज्ञांची भाषा पुष्कळदां भिन्न असते व यामुळेंच फार गैरसमज व बखेडे होतात. "द्रव्य" शब्द म्हटला कीं प्राकृत लोक खुळखुळणाऱ्या किंवा चलनी राजमुद्रा असा समजतात. परंतु अर्थशास्त्रयाला द्रव्याची व्याख्या विचारली कीं तो म्हणतो कीं विनिमय-योग्य[1] कोणताही पदार्थ म्हणजे द्रव्य. पूर्वीं पुण्यांत 'नरक' घाण म्हणून फेकला जात होता, हल्लीं त्याचें खत बनवून हजारो रुपये दृष्टीस पडतात. अर्थात् धनकवडी येथील नरकाधिपति जर आपणापाशीं चालू सालीं असुक हजार रुपये आहेत असें म्हणाला तर त्याला कां हसावें? याच दृष्टीनें पहाणारे 'सर्वं खल्विदं ब्रह्म' म्हणत असले तर त्यांला वेडे कां म्हणावें?

१ Anything that has on exchangeable value.

१६५. समजा कीं टाटाचे लोखंडाचे खाणींत परार्ध खंडी लोखंड आहे. अशांत त्यांचे हातीं परीस लागला कीं ज्याचे स्पर्शानें लोखंडाचे तत्काळ सोनेंच बनतें. तर टाटांनीं आपणापाशीं परार्ध खंडी सोनें आहे असें मानलें म्हणून काय हरकत आहे? त्याचप्रमाणें ' आपणासारिखे करिती तत्काळ ' अशी धमक ज्यांचे अंगांत आहे अशा सद्गुरूंना सर्व जीव नारायणरूप वाटले असतां हंसण्याजोगें काय आहे ?

*　　　　*　　　　*

१६६. एका तोंडाळ बाईचे नवऱ्याचा राग लटका पाडण्याकरितां तोंडांत मिठाची गुळणी धरण्याची युक्ति तिचे चतुर शेजारणीनें तिला सांगितली. त्या मूढ बाईला जरी युक्तींतलें इंगित कळलें नाहीं तरी सुज्ञांनीं ताडिलें कीं या बाईचा वाचाळपणा बंद पाडण्याची ही क्लृप्ति आहे. साधकाला नाममंत्राचा उपांशु जप सांगण्यांत एक हिकमत ही आहे कीं तो गुळणा तोंडांत चढल्यानें मनाचें सहस्रमुखत्व किंवा वाचाळपण बंद पडतें. मग विषयांचें ग्रसनही कमी पडतें.

१६७. सर्प म्हणजे क्रूरता व चापल्य यांची मूर्तिच. तो कोणाचे हातीं लागणें म्हणजे मुष्किल. परंतु त्याच सर्पानें तोंडांत उंदिर अथवा बेडूक धरिला असतां त्याचें चापल्य कमी पडतें व चावण्याचें तर मुळींच भय संपतें. याचप्रमाणें मन जरी सर्वांपेक्षां

चपळ व घातकी असलें तरी त्याचे तोंडांत रामनामाचा गुटिका दिला असतां त्याचें चापल्य मंदावतें व घातकपण तर बंदच पडतें.

*　　　*　　　*

१६८. डार्विन साहेबाचें ह्मणणें कीं कोणत्याही अवयवाचा दीर्घकालपर्यंत वापर नाहींसा झाला असतां अखेर तो अवयव नाहींसाच होतो. त्याचप्रमाणें निवृत्तिमुळें मनाचा विषयांचे कामीं वापर बंद पडत चालला असतां अखेर वैषयिक मन लटकें पडत पडत समूळ नाहींसेंच व्हावें हें युक्तिसिद्धच ठरतें.

*　　　*　　　*

१६९. आपण पहातों (नश्वर) व्यक्ति आणि ओळखतों (शाश्वत) जाति. याचप्रमाणें पहावी सृष्टि आणि ओळखावा परमेष्ठी. आणि असें ज्याला पहातां येईल तोच खरा डोळस "विनश्य त्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति" म्हणून म्हटलें आहे तें सत्य आहे.

१७०. अनंत गोरूप व्यक्ती डोळ्यापुढे भिन्न भिन्न रूपानें येत असतांही त्या सर्वांस अविभागानें किंवा अभेदानें व्यापून असणारी गोजातिही छिन्नभिन्न किंवा पृथक् झाली आहे, असें जर आपण समजत नाहीं. इतकेंच नव्हे तर कोणी असें समजल्यास त्यांस हंसतो. तर, मग भिन्न भिन्न भूतांमध्यें एकच अविभक्तभाव आहे, असें म्हणणाऱ्या अद्वैत्याला वेड्यांत कां काढावें? समर्थ सांगतात 'अनेकीं परी एक देवासि पाहे' ती हीच विद्या.

*　　　*　　　*

१७१. 'व्यक्ति' या शब्दाकडे पाहिलें म्हणजे ती जातीचें एक उदाहरण ऊर्फ प्रकट किंवा व्यक्तरूप अथवा अवतार आहे. याचप्रमाणें जगत् किंवा त्यांतील पदार्थ हा परमात्म-सत्तेचें किंवा शक्तीचें एक उदाहरण किंवा अवतार आहे. आतां व्यक्ति ही जातीचा अंश असल्यामुळें अर्थातच व्यक्तीची व्याप्ति जातीहून न्यून आहे. तथापि कौतुक हें आहे कीं अंशाला सर्वाचा बोध देण्याचें सामर्थ्य आहे. याच न्यायानें जगतांतील कोणत्याही पदार्थाचे अंगीं परमात्म-ज्ञान देण्याचें सामर्थ्य आहेच आहे. मात्र ज्ञाता पाहिजे.

* * *

१७२. 'बाम्बे गॅझिट' मध्यें मागें एका लेखांत म्हटलें आहे कीं आज काल मोटार व टेलिफोन निघाल्यानें मुंबईसारख्या शहरीं व्यापाऱ्यांना फार सुख झालें असें कोणास वाटेल; परंतु, खराप्रकार भिन्न आहे. हीं साधनें नव्हतीं तेव्हां कचेरीचे वेळांत शिपायांचे हातीं सगळे दिवसांत जेथे दहा निरोप पोंचते होत किंवा घोड्याच्या गाडीनें दहा व्यापाऱ्यांच्या भेटी घेतां येत, तेथे या साधनामुळें शंभर किंवा हजार निरोप देतां येतात व पांचपट भेटी घेतां येतात खऱ्या. परंतु, मनुष्यांचे मेंदु व शरीरें पूर्वींचीच असल्यामुळें हजार निरोप योजण्याकरितां पहिल्याचे शंभरपट मेंदू खर्चावा लागतो किंवा भेटींत शंभर जिने चढावे लागतात, हा

शीण हिशोबांत घेतला म्हणजे हीं साधनें एकंदरीनें सुखवृद्धि करि-तात कीं काय करितात हें कळेल. "व्याप तेवढा संताप" ह्या म्हणींतलें हेंच बीज आहे.

* * *

१७३. जे श्रद्धालु व स्वभावतःच धार्मिकवृत्तीचे लोक असतात ते शास्त्राज्ञेस्तवच भरले संसारांतून उचलून किंवा वेळेस स्वतःस नाहींतशा करून अनेक वस्तु सत्पात्रीं दान करितात. पण असे थोडे. याहून दुय्यम प्रतीचे लोक आहेत, ते वस्तु आपल्यास निरुपयोगी झाल्यास मग दुसऱ्यास देतील. आणि तिसरा वर्ग आहे, त्यांतील लोकांची वस्तु जागचे जागीं सडून फुकट जाईल, पण ते दुसऱ्याला देणार नाहींत. हीच प्रतवारी परमार्थी वर्गांतही आहे. कांहीं लोक संसाराच्या गर्दीतूनच वेळ काढून परमात्मप्राप्तीकडे लावतात. कांहीं, दुसरें सांसारिक कर्तव्यच शिल्लक नाहीं म्हणून हरि हरि म्हणूं लागतात. पण, कांहीं असे खमंग आहेत कीं स्वतःचे सर्व मावळलें असलें तर उसन्या पंचाइती आणतील पण ईश्वराकडे मन लावणार नाहींत. यांतील हा तिसरा वर्ग म्हणजे भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें 'ते के न जानीमहे' अशांतलाच म्हणावा.

१७४. वर दाखविल्या वर्गांपैकीं पहिले वर्गांत गणती करून घेणें हें फारच उंची; पण निदान दुसऱ्या वर्गांत तरी येण्याचा प्रत्येकानें यत्न करावा. म्हणजे, एकादी बाई, जरी मूळ धार्मिक-

वृत्तीची नव्हे तरी दुर्दैवानें पतिनष्ट होऊन पर्यंकाचा उपयोग करण्याला योग्य कोणी उरलें नाहीं, म्हणून ब्राह्मणाला शय्यादान देते, त्याप्रमाणें जरी लोक करतील तरी जगताचा व त्यांचा किती-फायदा होईल. उ० एकाद्या वयस्काची अर्धांगी गेली; आतां तरी रिता पडलेला करमणुकीचा वेळ ईश्वरभजनाकडे द्यावा. एकाद्याचे नेत्र गेल्यानें सृष्टरूपें बघण्याचें बंद पडलें, आतां तरी अंतःस्वरूपाचे अवलोकनाकडे लागावें. किंबहुना विषयाची जी जी जागा रिती पडेल, ती ती तरी ईश्वरीप्रेमानें किंवा उपासनेनें भरून काढावी. इतकें केलें तरी आमचे विठोबाची इतकी उपासमार होणार नाहीं. पण इतकेंही औदार्य अलीकडे लोकांत फारसें दिसत नाहीं त्यामुळें विठोबाला फांके पडण्याची वेळ येत चालली आहे.

१७५. वांझेचे राहो; पण जिला मिळून एकादें तरी मूल झालें आहे, तिला अपत्यप्रेमाची पूर्ण जाणीव असलीच पाहिजे. परंतु कित्येक घरीं पहावें तों असल्या माउलीची ही जाणीव तिच्या मूळच्या सवतीचें जर कां एकादें मूल असलें तर त्याचे वाटणीस येत नाहीं. बरें तिजपाशीं ही अगदींच गुंज-मासा आहे म्हणावें तर तिला पुढें देहधर्मानें अर्धखंडी मुलें झालीं तरी तेवढ्यांनाही पुरून शिलक राहील इतकी ती आढळते. पण त्या सवतीच्या पोटच्यापुरतीच काय ती वाण पडते! आम्हा संसारी जीवांचा तरी हाच प्रकार दिसतो. विषयांबद्दलचे आमचे प्रेम वरील मातृप्रेमाहूनही

उत्कट असून इतकें उमोप असतें कीं अविद्येच्या पोटची (विष याची) संतति आजचे दसपट वाढली तरी तेवढीलाही तसेंच पुरून उरेल. पण चमत्कार हा आहे कीं, इतकें अमूप प्रेम आत्मा-पाशीं असतां, तो एकुलता एक मूळ मायेचा कारटा[1] आहे, त्याचें वांट्यास तें तिळभरही येत नाहीं. या चमत्काराला काय म्हणावें?

* * *

१७६. गुरूचें किंवा आईबापाचें ऐकिलें नाहीं. त्याना केव्हां-तरी मॅजिस्ट्रेटाचें ऐकावें लागतें. त्याचप्रमाणें ज्यानीं एथे साधुसंताचें ऐकिलें नाहीं, त्यांना पुढें यमाचें ऐकावें लागावें हें ठीकच आहे.

* * *

१७७. कट्टा अफीमी बहुधा गोळी चढवितो दिवसांतून एकवारच; परंतु त्या अमलाची छाया त्याचे अंगावर चोवीस तास असते. त्याचप्रमाणें साधक हा भगवदुपासना जरी दिवसांतून नियमित अल्पकाळच करीत असला तरी भगवत्प्रेमाची धुंदी त्याचे चित्तावर अखंड असली पाहिजे. आणि असेल तरच तो उपासक.

* * *

१७८. रयत म्हटली कीं त्याला राजाचा कर देणें प्राप्तच आहे. तथापि विशिष्ट कारणास्तव कांहीं जणानां राजानें कराची माफी दिल्याचीं उदाहरणें आहेत. पण राजनिष्ठेची माफी दिल्याचे

१ विठ्या, विठ्या, विठ्या, मूळमायेच्या कारटया, असें ईश्वरास म्हटलें आहे.

उदाहरण मात्र कोणत्याही राज्यांत ऐकिवांत नाहीं. याचप्रमाणें विशिष्ट कारणानें एकवेळ जीवानां कर्मांची माफी देतां येईल; पण निष्ठेची किंवा श्रद्धा-भक्तीची माफी दिली जाणार नाहीं. हें उघड आहे.

* * *

१७९. अलीकडे कित्येकांना राम, कृष्ण इत्यादि व्यक्ति-विषयक नांवें खपत नाहींत. ते केवळ 'देवा, प्रभो, ईश्वरा,' असें म्हणण्याला तयार असतात. पण आमचें म्हणणें "असत ना? यानें कांहीं हानि नाहीं." हा प्रकार नवीन नव्हे. वामन पण्डितही म्हणतो, 'नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी.' एकाद्या अधिकाऱ्याचें व्यक्तिगत खाजगी नांव माहीत नसलें तरी त्याचे Official designaton, अधिकाराचे संज्ञेनें (कलेक्टर जिल्हा अमुक) अर्जी पाठविली तरी दाद लागण्याला हरकत पडत नाहीं. एका अर्थीं हा मार्ग अधिक धोपट आहे. म्हणून पंडित म्हणतात "**जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मजगा.**" मग तो कोणी असो. या साठीं **प्रार्थनासमाजिष्टांची** थट्टा करण्याचें कांहीं कारण नाहीं.

* * *

१८०. आपल्यांत एक म्हण आहे, 'हजार फेरे, एक गांठ,' त्याचप्रमाणें हजार वचनें आणि एक अनुभव, असें आहे. या करितां एकादे तरी संतवचनाचा अनुभव घेण्यास झटावें.

समाप्त.

जाहिराती

खडे तात्त्विक बोल.

भाग १ ला.

लेखकः—महादेव हरि मोडक. बी. ए.

विषयः—नमन आणि मनन; पुनर्जन्म; ईश्वराचें अस्तित्व; चित्तस्थैर्य; वैराग्याचा अर्थ; भावनेचें सामर्थ्य; भ्रमाचा परिणाम; प्रीति, भक्ति, विरक्ति, आदर आणि विश्वास; मायेचा निरास; अहंकारनाश; पिंड-ब्रह्मांडैक्य; नाममाहात्म्य; सुखदुःखमीमांसा; शब्दशक्ति; उपदेश; अनुभव; नेति नेति; ज्ञानाची मालकी; स्वरूपाची ओळख; संसारभय; कर्माचा उच्छेद; इ. इ. इ. (किं. ८६. ट. ख. ८२.)

हें पुस्तक किती उत्कृष्ट साधलें आहे हें खालील अभिप्रायांवरून समजून येईल.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेलेः—रा. रा. महादेव हरि मोडक, बी. ए. यांनीं लिहिलेलें '**खडे तात्त्विक बोल**' या नांवाचें गद्यात्मक पुस्तक मीं मधुन मधुन वाचलें. माधवरावांच्या प्रतिभासंपन्न कवित्वाला, विद्वत्तेला, बहुश्रुतपणाला आणि सहृदयतेला साजेल अशा प्रकारची ही रमणीय कृति आहे. हिच्यामध्यें विषयवैचित्र्य, विचारसौंदर्य व भाषाविलास हीं समुच्चयानें प्रकट झालीं आहेत. दृष्टांतादिकांनीं हातीं घेतलेला विषय खुलविण्याची हातोटी रा. मोडक यांना उत्कृष्ट साधली आहे. प्रस्तुत पुस्तकांतील पुष्कळसे तात्त्विक

व व्यावहारिक विचार भिन्न पण समंजस वाचकांस पटल्याशिवाय राहणार नाहींत. मराठी भाषेचें शुद्ध व सांप्रदायिक स्वरूप व गंभीर तात्त्विक विचार यांचे अधिक सहृदयाल्हादक संमेलन माझ्या अन्यत्र पाहण्यांत नाहीं. 'बोल' लहान लहान असून विषयही भिन्न भिन्न असल्यामुळे व त्यांस मनोहर वाग्वेश मिळाल्यामुळे ते वाचतांना कंटाळा मुळींच येत नाहीं. उलट ग्रंथकारांचें सूक्ष्म अवलोकन, त्यांचें अनेक विषयांचें प्रणयन, पौरस्त्य व पाश्चात्य तत्वज्ञानांचा त्यांच्यावर झालेला संस्कार इत्यादि गोष्टी मनांत येऊन त्यांच्या संबंधानें सप्रेम आदर उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. सारांश '**खडे बोल**' हा ग्रंथ सर्व अंगांनीं सुंदर आहे. या पुस्तकापासून बहुश्रुतपणा, बोध व उच्च प्रतीची करमणूक यांचा लाभ वाचकांस होण्यासारखा आहे. अगदीं गरीब विद्यार्थ्यालासुद्धां हें पुस्तक सहज घेतां यावें याकारितां या अमोल पुस्तकाचें व्यावहारिक मोल अत्यल्प म्हणजे ६ आणे ठेविलें आहे. मराठी वाचतां येणाऱ्या प्रत्येक माणसानें व विशेषतः परामर्थाची ज्यांना अपेक्षा आहे अशा वयस्क पेन्शनर व सुखवस्तु गृहस्थांनीं हें पुस्तक संग्रहाला अवश्य ठेवावें अशी त्यांस आग्रहपूर्वक सूचना आहे.

गोविंद वासुदेव कानिटकर बी. ए. एल एल. बीः—वर माझे मित्र वे० शा. संपन्न रा. रा. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं 'खडे बोल' यांवर जो अभिप्राय दिला आहे, त्याचप्रमाणें माझाही अभिप्राय आहे. रा० माधवरावजी मोडक यांच्या बोलांची भाषा शुद्ध व सुंदर आहे यांत संशय नाहीं. या पुस्तकास लोकाश्रय मिळून तें रसिक जनांच्या मनाचे रंजनास कारणीभूत होईल व त्यांच्या आदरास पात्र होईल अशी मला खात्री वाटते.

प्रो० श्रीधर विष्णु परांजपे बी. ए. श्रीरामदासानुदास—'बोल' वाचून फार आनंद झाला. हे प्रत्येक मुमुक्षूनें अवश्य वाचावेत. याचे पुढचे भागही लवकरच वाचावयास मिळावे, अशी उत्कंठा लागते.

वेदांती बाबा गर्दे—आपले 'बोल' कवीच्या सुभाषितासारखे आहेत. ते चांगले असून मुमुक्षूंनीं ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. पद्यरूपानें लिहिल्यास अधिक उपयोगी होतील.

नाना पावगी:—'बोल' फारच गोड, उपदेशप्रद, बहुत रसाळ, एवढेंच नव्हे, तर...तत्त्वबोधानें केवळ थबथबलेलेच दिसतात.

श्री. आण्णासाहेब देव—टोपीवाल्याचा बंगला मुंबई—"आपल्या खडे तात्त्विक बोलांची येथें पारायणें होत आहेत व ज्यांनीं ज्यांनीं ते ऐकिले त्यांनीं त्यांनीं ताबडतोब एक एक प्रत खरेदी केली. आतां दुसरा भाग केव्हां छापून होईल इकडे लक्ष्य लागलें आहे."

रा. रा. फणसळकर, सातारा—"बोल" फार मार्मिक, प्रचीतीचे अर्थात् बोधप्रद—एका शब्दांत लिहिणें म्हणजे—ते अनर्घ्य (अमोल) आहेत, ते अवश्य संगृहीत करावे.

प्रो. एम्. एम्. जोशी एम्. ए.—वेदांतासारख्या गहन विषयावर लिहितांनाही विचाराची प्रत्येक लाट स्वतःसिद्ध व परिपूर्ण असून सर्व लाटा एकामागून एक येऊन विचारगंगालहरी एक झाल्या आहेत याचेंच कौतुक वाटतें. गहन विचारांना व्यवहारांतील साध्या उपमांचें कोंदण दिल्यानें विशेष शोभा आली आहे.

प्रसिद्ध भगवद्भक्त विष्णुबोवा जोग-रा. मोडक यांचे बोल ऐकून त्यांविषयीं आमची आदर-बुद्धि उत्पन्न झाली.

कै. वे. शा. नारायणशास्त्री गोडबोले-'बोल' अनुपम आहेत आणि स्वयंस्फूर्तीचे असूनही शास्त्रानुसारी आहेत, हें मोठेंच कौतुक आहे.

कै. वे. शा. रामशास्त्री गोडबोले-हंस-बुद्धिना त्वया तात्विकार्थतया विद्वदन्तःकरणानन्द-दायिन्या वाक्यावल्या निर्मितं ग्रंथं विलोक्याहं सद्गदितान्तःकरणोऽभूवम् ।

विद्यावाचस्पति विद्यालंकार महोपदेशक राशिवडेकरः- आपले ' बोल ' वाचतांना खालीं ठेववत नाहीत व अंतःकरण आनंदमग्न होतें. हे अज्ञानरोगग्रस्तांस अमृततुल्य, जिज्ञासूंस मार्गदर्शक व ज्ञात्यांस साहाय्यकारक असून गभीराशयैकवेद्य आहेत.

डॉ. ग. कृ. गर्दे एल्. एम्. अँड एस्.-' बोल ' प्रतिभापूर्ण असून भाषा बोधक तशीच वेधकही आहे. हें एक गद्यात्मक काव्यच असून बहुतेक दृष्टांत फार समर्पक आहेत.

रा. ग. ज. आगाशे बी. ए.;—' बोल ' चमकदार रत्नेंच आहेत.

एक वाचक—' बोल' वाचून मूळ लेखकाचे परिचयाची उत्कंठा झाली.

केसरी ता. १३ दिजंबर १९१०—बोल मुख्यतः वेदान्तसंबंधीं असून नांवाप्रमाणेंच खडे–ताठ, सरळ व उंच स्वरांतले आहेत. प्रत्येक बोलांत एक एक संपूर्ण व सुंदर कल्पना मांडली असून बहुधा असा एकही बोल नाहीं कीं, ज्यामध्यें एखादा चटकदार दृष्टांत नाहीं. सर्वत्र बोलांची भाषा प्रौढ व सुसंस्कृत असून काव्यात्मक आहे. मोडकांनीं हा क्रम चालू ठेविल्यास मराठी भाषेला चांगला लाभ होईल!

रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल. एल. बी.—रा. मोडक यांनीं लिहिलेले ' खडे तात्त्विक बोल ' वांचून प्रत्येक सहृदय मनुष्याची मान हाललीच पाहिजे असें मला वाटतें. वेदान्ताचे गहन सिद्धान्त व विचार व्यवहारांतील नित्य पाहण्यांत येणाऱ्या दृष्टांतांनीं-या बोलांत-वाचकांच्या मनांवर चांगले ठसविण्याची रा. मोडक यांस हातोटी साधली आहे. या बोलांपासून अज्ञ व सुज्ञ यांस सारखाच आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. हे बोल सर्वांना ग्राह्य आहेत हें मला निराळें सांगावयास नको.

रा. रा. ल. रा. पांगारकर—रा. मोडकांचे ' बोल, बदाम गोळ्यांसारखे मिष्ट व पौष्टिक आहेत. मात्र ज्यांचा कोठा मंद असेल, अशांनीं सावकाश चर्वण करून पोटांत उतरविले पाहिजेत. एरवीं पचावयास जड जातील.

आनंद—(जानेवारी १९११) वेदांतासारख्या तत्त्वज्ञानविषयावर प्रांजळ, मार्मिक आणि रसभरित असे हे बोल फारच गोड आणि आल्हादकारक आहेत. भाषा सरळ व शुद्ध आहे. * * * या पुस्तकाचे कर्ते रा. महादेव हरि मोडक बी. ए. हे प्रतिभासंपन्न कवि आहेत, तसें वेदांतासारख्या गहन विषयाला सुंदर भाषेनें अलंकृत करण्याचें सामर्थ्यही त्यांचे ठायीं असल्यामुळें सामान्य वाचकांचें मन त्यांच्या विचारतरंगाबरोबर सहजासहजीं वाहत जातें.

प्रसिद्ध वेदान्ततीर्थ–सदाशिवशास्त्री कान्हेरे–मुंबई २७-३-१२ हे 'बोल' ऐकून "Books ought to have no patrons but truth and reason" या बेकनच्या उक्तीची आठवण झाली. यांतील दृष्टांत व्यावहारिक परंतु खात्रीबंद. वेदांत-सुलभ जी दुर्बोधता ती कोठेंही आढळत नाहीं. या ग्रंथाला आलेली बहुविध रमणीयता अथपासून इतिपर्यंत शिथिल होत नाहीं. असेंच मनाचें रंजन, कर्णांचें तर्पण व संशीतीचें परिमार्जन करणारे 'तात्त्विक बोल' **अधिक निपजल्यास बरें.**

श्रीपादशास्त्री देवधर—(अध्यापक संस्कृत पाठशाळा, सांगली.) "हे बोल लिहिणारांचें वेदांतज्ञान, बहुश्रुतपणा, साधी पण सफाईदार भाषेची शैली, दृष्टांताचा समर्पकपणा व शब्दव्युत्पत्तिचातुर्य--यांपैकीं कशाचें अधिक वर्णन करावें हेंच समजत नाहीं. पुस्तकांतील मनोवेधक स्थळें देणें झाल्यास सर्व पुस्तकच पुनः उतरून काढावें लागेल. असें पुस्तक **इतक्या थोड्या किंमतींत** मिळतें हें गरीब जिज्ञासूंचें भाग्यच होय."

विश्वनाथशास्त्री—(एल्फिन्स्टन् हायस्कूल मुंबई) * * "ग्रंथकारानें दिलेल्या नानाविध उदाहरणांनीं त्यांचें विस्तीर्ण ग्रंथावलोकन, अगाधज्ञान आणि जगत्कल्याणाची परमावधीची लालसा हीं व्यक्त होत आहेत. शिवाय सिद्धपुरुषांच्या तेजस्वी वचनौघावर ग्रंथकाराची एकनिष्ठ भक्ति निदर्शनास येत आहे. * * ग्रंथ अती रमणीय व विशेष अधिकाराचा झाला आहे."

श्रीमंत अण्णासाहेब पिंपळखरे—(कल्याण) रा. मोडक यांचे रसिकाला वेड लावणारे, मनाला शांति व वैराग्याचा लाभ करून देणारे, अज्ञानाला ऐहिक व पारमार्थिक वाट दाखविणारे हे अमृततुल्य बोल प्रत्येकानें जवळ बाळगावे.

भिषग्रत्न पाटणकर--(आयुर्वेदिक फार्मसी, सोलापूर) समक्ष म्हणाले "आजपर्यंत मी माझें उशाशीं गीता ठेवीत असें, अलीकडे तिचे जोडीस हे आपले बोल ठेवीत असतों.

रा. रा. बापुसाहेब जोशी—(वकील, मिरज) म्हणाले "माझें कुटुंब नुकतेंच निवर्तलें; पण आपले 'बोलामुळें' तें दुःख मी विसरलों."

कै० भाऊसाहेब आचार्य—(सरकारी वकील ठाणें) "पुस्तक फारच वाचनीय झालें आहे. जुनीं तत्त्वें नव्यारीतीनें लोकसमूहापुढें मांडणें परिस्थितीमुळें फार अवश्य झालें आहे. ही कामगिरी आपल्या पुस्तकानें फारच चांगली बजाविली आहे. 'बोलाचे' आणखीही अनेक भाग प्रसिद्ध केल्यास जनतेवर उपकार होतील. आपलेसारखे आणखी लेखक निपजतील तो सुदिन."

रा. रा. ह. मा. भडकमकर बी. ए. (**प्रोफेसर**, संस्कृत विल्सन कॉलेज मुंबई) "हें लहान पण उच्च फल प्राप्त करून देणारें पुस्तक वाचिलें * * हे बोल म्हणजे रा. मोडक यांच्या रसपूर्ण व स्फूर्तिजनक रसनेची उदात्त सृष्टि आहे. * * ह्या पुस्तकाची किंमत अधिकाराप्रमाणें तारतम्यानें होणारच. परंतु गेला बाजार उच्च मनोरंजनास तरी येथें वाण येणार नाहीं अशी खातरी वाटते."

रा. रा. केशव लक्ष्मण ओगले बी. ए. (ओरायनचे भाषांतरकर्ते) "पुस्तकाचीं पानें चाळतांना एकीकडून तें पुरे पुरे म्हणून मनास इशारत मिळत असतांही दुसरीकडून तें पुरें केल्यावांचून रहावलें नाहीं. शृंगारविषयदृष्टांत (आपल्या) भक्तिरसाच्या पुरांत प्रशस्य दिसतो."......

रा. रा. चिंतामण निलकंठ जोशी एम्. ए. (एल्फिस्टन् हायस्कुल, मुंबई)

" भिन्नरुची रसिकांही एका समयींच 'बोल' कानांहीं।

ऐकूनि कौतुकानें गावें 'त्वत्तुल्य बोलका नाहीं'॥ "

रा. रा. विष्णु आप्पाजी कुलकर्णी (सोळांकुर, ता. २९।८।१२) " मुमुक्षूंतील 'बोल' वाचून माझ्या मनांत जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली ती एकसारखी वृद्धिच पावत आहे. माझीच गोष्ट काय? पण आपलें थोर शील, दृढ विद्याव्यासंग व अधिकारयुक्त ग्रंथकर्तृत्व या तिन्हीं नात्यांनीं आपण सर्व महाराष्ट्रीयांस वंद्यच आहां."

सत्पुरुष श्रीमंत अजूमहाराज (पिच्छाडदेवडी, इंदूर) 'गेल्या तीस वर्षांत असला लेख आमचे पहाण्यांत नाहीं. लेखावरून कर्त्याचे ठिकाणीं अरुणोदय खास झाला आहे. आतां सूर्योदयाबद्दल भ्रांति नको."

वे. शा. श्री. लक्ष्मणशास्त्री द्रविड (कलकत्ता, संस्कृत कॉलेज):- स्वस्ति । श्रीमदनवद्यविद्योद्योतविद्योतितदिङ्मण्डलेषुमोडकमहोदयेषु सविनयं निवेदयति । श्रीमत्प्रहितं निबंधमालोक्य अस्मदीयं चेतोतितिरां प्रीतिंभरमवाप। मन्ये एवमेव सर्वेषां विदुषां चित्तानि मायान्ति भवेयुः ।

महापहोपाध्याय केशवशास्त्री मराठे (वाराणशी, ५।८।१२) पुस्तक फार उत्तम आहे. भाषा फार रसाळ व गोड आहे. वेदांतासारखा गहन विषयही आपण दर्पणाप्रमाणें स्पष्ट दाखविला आहे."

वे० शा० सितारामशास्त्री शेंडे (काशी, ब्रह्मघाट):—

" अतिदुर्बोधनिजस्वरूपतत्त्वं । प्रबुभुत्सोरुपकारकारिणीत्यम् ।

" वचसां पंक्तिरुदाहृतैरुपेया । निधिमाप्तुं ननुसिद्धवर्तिकेव ॥

वे. शा. बाळशास्त्री दातार (श्रीक्षेत्र काशी.) " आपला ग्रंथ फारच रमणीय आहे. भाषा अति सरळ व दृष्टांत विपुल असल्यानें शंका रहात नाहीं."

ब्रह्मचारी, यज्ञेश्वरशास्त्री बापटः—मोडक महाराज, आपला ग्रंथ मला आत्मानंद प्रकट करून देतो. "मोदकसा गणपतिला देता झाला मला परानंदा."

रा. रा. रा. वि. बापट बी. ए. (दुर्गाघाट काशी.)—"एकाच बैठकींत समग्र ग्रंथ वाचून पाहिल्याखेरीज उठवलें नाहीं."

रावबहादुर हरि नारायण नेने (कल्याण) "आपले 'खडे बोल' वाचले. ते वाचल्यानें खरोखरच आपल्यापुढें तत्त्वज्ञान साक्षात् खडेंच आहे असें वाटतें. दुसरा भाग लवकर प्रसिद्ध होण्याबद्दल पुष्कळांची उत्कट इच्छा आहे."

रा. रा. पंढरीनाथ काशिनाथ तेलंग एम्. ए. एल् एल् बी. (ज्ञानगेह, काशी) "आपले ग्रंथांत जागोजागीं भक्तिरसानें परिपूर्ण व साधकाची आस्था पूर्णपणें व्यक्त करणारे असेच बोल दृष्टीस पडतात. जगतांत दृष्टीस पडणारे सर्व साधारण दाखले घेऊन सर्व रोंख अध्यात्माकडे वळविण्याची आपली हातोटी पाहून आपल्या खोल दृष्टीविषयीं व विचारी स्वभावाविषयीं कोणाचीही खात्री होईल. अशा पुस्तकांची महाराष्ट्रीयांस फारच जरूरी आहे. कारण आमची मनःप्रवृत्ति बहुतेक याच तऱ्हेची आहे."

पंडित—गुलाबराव महाराज (हरदा) "पुस्तक वांचून मोडकांविषयीं आदरबुद्धि विलक्षण वाढली. इंग्रजींतून मराठींत रूपांतर झालेल्या वेदांतपुस्तकांपेक्षां हें पुस्तक अनेकपटीनें उत्तम झालें आहे. मोडकांची सरळ भाषा व दृष्टांतशैली इतकी उत्तम आहे कीं, जिज्ञासूचें मन परमार्थाकडे वळल्यावांचून राहणार नाहीं. तातज्ञानेश्वर म्हणतात—झाड ओळखिजे फुलें। मानस ओळखिजे बोलें। त्याचा प्रत्यय येथें येतो. शृंगारिक दृष्टांत फारच समर्पक आहेत. 'आदर' या शब्दाचें निरूपण तर एकाभक्तिसूत्राचे तोडीचें झालें आहे अशा प्रकारचें पुस्तक अभिप्रायार्थ मला मिळालें याबद्दल धन्यता वाटते."

[डे. व्ह. ट्रा. सोसायटीचे ३ सभासदांचे अभिप्राय]

अभिप्राय १ "बोल फार मार्मिक, बोधप्रद व सर्वांनीं ध्यानांत, ठेवण्याजोगे आहेत. कांहीं ठिकाणीं शृंगारिक दृष्टांत आहेत, पण तशा दाखल्यां-

शिवाय ब्रह्मानंदाची ओळख पटविणें फार कठीण असल्यानें ग्रंथकारास दोष देण्याचें कारण नाहीं . कमीटीनें बक्षिस दिल्यास अनाठायीं होणार नाहीं."

अ० नं० २ "These pithy sayings are suggested to the author on account of his thoughtful and philosophising tendency. There is no objectionable matter, barring a few expressions which rquire rare polish. The book merits patronage.

(हे बोल ग्रंथकर्त्याचे विचारी व तात्त्विक प्रवृत्तीचें फळ आहेत. क्वचित् स्थळीं शब्दांत सुधारणा पाहिजे. बाकी गैर कांहीं नाहीं. ग्रंथ आश्रययोग्य आहे.

अ० नं० ३. These sayings do really go straight home by the incisiveness and vigour of the style as by the force of the reasoning. I have no hesitation in recommending for it a prize.

[भाषेचा जोर व मार्मिकपणा तसाच मूहसुदपणा यामुळें तत्काळ हे बोल वाचकाचे हृदयास जाऊन भिडतात. यांना बक्षिस देण्याविषयीं मी बेहरकत शिफारस करितों.]

विद्वद्वर्य. वे. शा. वासुदेव शास्त्री अभ्यंकर (संस्कृत अध्यापक फर्ग्युसन कालेज):—

"श्रीमच्छंकराचार्य, विद्यारण्य इत्यादिकांचे ग्रंथ महामान्य खरे, पण सामान्यांस ते लहान-तोंडीं मोठा घांस असे होऊन गळीं उतरत नाहींत. परंतु रा. माधवराव मोडक यांचे हे तात्त्विक बोल म्हणजे आबालवृद्धांस सारखेच सुखानें गिळितां येणारे वेताचे गोड घांस आहेत. सबब त्यांचा आदर सर्वांनीं करावा. इतकेंच नाहीं तर प्रत्येकानें प्रत्यहीं सवडीप्रमाणें यांतील थोडे तरी घांस घेऊन त्यांचें चर्वण करावें, म्हणजे जीवगतीचे अनेक प्रकारचे भलते मार्ग लोपून जाऊन खरा मार्ग डोळ्यांपुढें चमकूं लागेल."

रा० रा० विनायक शंकर भागवत, वकील ठाणें.

I read Mr. Modak's "Khade Tatvik Bol, Part I." I cannot find adequate words to express my feelings of admiration for these as well as the author of them. They are highly welcome in these days of religious awakening. Every one will be glad to possess these gems of thought full of felicitous illustrations, true wisdom and insight. Mr. Modak is an earnest advocate of Vedantism and is a master of the lofty and intricate philosophy of the Vedant. His Bolas are like beams of light illuminating the prevailing darkness. They disclose an originality of thought. They have a magic power of inspiring those who come under their chastening and elevating influence. The highest spiritual truths are expounded by Mr. Modak in simple language with homely illustrations. As they come straight from the heart of the author they strike deep into the heart of the reader. The inspiration lies in their soul-elements. The reader is not merely pleased and fascinated but also ennobled, purified and exalted.

I congratulate Mr. Modak on having succedced in bringing such a difficult subject as the Vedant within the easy com prehension of the general reader and the beginner. None can read these writings without feeling that he is face to face with singularly

original, rich and powerful mind. No earnest aspirant and thoughtful scholar can read them without gaining new light and inspiration. The collection must serve as a guide-book to the educated Indians on the subject of Vedant.

I hope Mr. Modak puts these Hindu ideas into English and thus makes the abstract Advaita living and poetic in every day life. Then these sayings, as I call them, will attract the attention of many of the English-speaking readers. Being impregnate with the strongent spiritual force and power they will surely exert their divine influence in every part of the world. The new light must spread all over the world. In that case Mr. Modak will rank as an apostle of "Aggressive Hinduism."

डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमूख. बी. एस्. सी. एम्. बी.:—

"I have read Mr. M. H. Modak's "Khade Tatvic Bol" or Plain Philosophical Sayings," Part I in Marathi It is a pleasant reading. Deep philosophical truths of Vedant are stated here in plain and simple Marathi with apt illustrations from every-day facts of life. A happy combination of serious thought, close reasoning and simple style of expression is a distinctive feature of this Book and I have no doubt that anybody who will fortunately come across it will find in it copious but interesting matter worth pondering over and digesting.

खडे तात्त्विक बोल.

भाग २ रा.

विक्रीस तयार.

यांतील विषयः—

१ परमात्मप्रतीति. २ परमात्म्याची व्याप्ति. ३ ईश्वराचें स्तुतिपात्रत्व. ४ ईश्वराची जरूरी. ५ ईश्वरी न्याय. ६ ईश्वराचें आकलन. ७ गुरुजनांची मान्यता व भावनेचें सामर्थ्य. ८ सद्गुरूची महती. ९ सद्गुरूचे उपकार. १० जीवांची कृतघ्नता. ११ जशास तसें. १२ तीर्थ-क्षेत्र-रहस्य. १३ सगुणोपासनावर्म. १४ विश्वासाची जबरदस्ती. १५ त्रिविध प्रतीति. १६ अद्वैताचें सामर्थ्य. १७ सुषुप्ति व समाधि. १८ उच्च वर्णाची जबाबदारी. १९ वैदिकांचा हट्ट. २० शास्त्र व व्यवहार. २१ आत्म्याचें निर्धर्मत्व. २२ स्त्रीनिंदेचें वर्म. २३ दानांतील रहस्य. २४ सत्यमिथ्यानिवड. २५ निष्काम भक्ति. २६ सुषुप्तीची साक्ष. २७ उलट पहाणी. २८ उलटी भाषा. २९ शास्त्रीय प्रमेयांचें सर्वगामित्व. ३० ईश्वराचें समत्व. ३१ अधिकारी भेदानें भाषाभेद. ३२ सत्पुरुष कां ओरडतात. ३३ दुःखहरणाचे चुकीचे उपाय. ३४ अनन्यभक्ति. ३५ असेल माझा हरि, तर देईल खाटल्यावरी. ३६ शब्दाची थोरवी. ३७ वैराग्याचा खटका. ३८ एकमेवाद्वितीयम् ३९ स्थितप्रज्ञ. ४० तेंच मन. ४१ पितरांना पाणी कसें पोंचतें. ४२ जाणते मूर्ख. ४३ मायेचें समर्थन. ४४ गायत्रीचें पावित्र्य. ४५ अज्ञानाची उत्पत्ति. ४६ द्वंद्वाचा निर्णय. ४७ खरें सुख. ४८ शास्त्रज्ञाची दृष्टि. ४९ नाममंत्राची क्लृप्ति. ५० व्यक्ति आणि जाति. ५१ खरी प्रगति. ५२ आमचा विषय-पक्षपात. ५३ मौनमेवोत्तरम्. ५४ अकालज्ञता. ५५ ईशसाक्षात्कार. ५६ विश्व हें काय आहे? ५७ मायातरण. ५८ अहं ब्रह्मास्मि-सर्वं खल्विदं ब्रह्म. ५९ आमची मृत्पिण्डबुद्धिता. ६० निष्काम भक्ति. ६१ प्रार्थनासमाज. ६२ नामांतील चैतन्य. ६३ मनुष्यांत ईश्वर. ६४ मनुष्याचें चतुर्विध कर्तव्य. ६५ जीवाचें किंचिज्ज्ञत्व. ६६ संसाराचा उगम. ६७ खरा उपासक. ६८ ईश्वरावर भार. ६९ चित्तशुद्धीचा अत्यंत सुगम उपाय. ७० पथ्यपालन. ७१ सद्वस्तूचें स्वरूप. इ. इ.

वरील सर्व विषय मागील भागाप्रमाणें बाणेदार दृष्टांतानीं सिद्ध करून दाखविले आहेत. वाचल्यानें कळून येईल.

रामकृष्ण-वाक्सुधा,

(प्रथम वृष्टि.)

लेखक—कृष्णाजी गोविंद किनरे.

स्वामी विवेकानंद यांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं आपल्या शिष्यांना व भक्तांना भाषणप्रसंगानुरोधानें जो अमृततुल्य धर्मोपदेश केला त्याचा यांत संग्रह आहे. यांत ज्याचें विवेचन आलें नाहीं, असा एकही धार्मिक प्रश्न नाहीं. तत्त्वें गहन पण विवेचन अत्यंत सुबोध व मनोरम, दृष्टांत व दाखले अगदीं साधे, रोजच्या व्यवहारांतले मौजेचे व मनाला तेव्हांच पटणारे, यामुळें ग्रंथ कादंबरीसारखा रसाळ आहे. इतका सोपा व सामान्य वाचकालाही मनोरम असा धार्मिक ग्रंथ हा मराठींत पहिलाच. चित्रमय जगताचेद्वारें महाराष्ट्रानें या सुधेची लज्जत पाहिलीच आहे, तेव्हां जास्त वर्णन नको. छपाई सुंदर, बांधणी मजबूत, चार सुबक चित्रें. पृष्ठें २८८. किंमत १। रुपाया. ट. ख. निराळा.

अभिप्राय.

केसरी—भाषांतर गोड व कविता त्याहूनही गोड आहेत. पुस्तकाची भाषा साधी, सुबोध अशी असून आंतील मजकूर भाविक लोकांना आनंदजनक व परमार्थ विषयाकडे चिकित्सक दृष्टीनें पाहणारांस एकवार वाचनीय आहे. पुस्तकाचें बाह्यांग चांगलें आहे. **मुमुक्षु**—पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग चित्तवेधक झालें आहे. रा. किनरे यांची प्रस्तावना व ५२ पृष्ठांचें स्वामीचें मनोहर चरित्रही अत्यंत प्रेमळ झालें आहे. ग्रंथांतील विषयाची तारीफ प्राकृतजनांनीं काय करावी? ती सिद्धाची स्वानुभवाची वाणी आहे. सगुणप्रेम व नामस्मरणाचा उपदेश फार मोलवान् आहे. **आनंद**—हें मूळ एका इंग्रजी

ग्रंथाचें भाषांतर आहे, तरी तें इतक्या सहृदयतेनें आणि अशा रीतीनें झालें आहे कीं, तें भाषांतर आहे असें वाटतसुद्धां नाहीं. पुस्तकांत घातलेलीं पदें तर फारच सुरस व हृदयंगम झालीं आहेत. **ज्ञानप्रकाश**—हें मूळ इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर आहे, असें रा. किनरे यांनीं आरंभींच कळविलें नसतें, तर हें भाषांतर आहे असें ओळखूंही आलें नसतें. इतकी या पुस्तकाची भाषा सुबोध व अकृत्रिम आहे. **बालबोध**—अमृततुल्य आहे. पुस्तक संग्राह्य आहे. **इंदुप्रकाश**—रा. किनरे यांचें भाषांतर फार सरळ, अटपशीर व विषयाच्या प्रतिपादनानुरूप स्वाभाविक उठावाचें आणि जोरदार असें झालें आहे. **दीन-मित्र**—पुस्तकांत सुधेचे अठ्ठावीसच थेंब आहेत, परंतु गोड आहेत. पुस्तक आंतून बाहेरून गोड आहे. **खानदेशवैभव**—वेदान्तांतील गहनभाग सोप्या व मनोरंजक रीतीनें कळण्यास हें पुस्तक फार उपयोगी आहे. **मराठामित्र**–हे अमृतबिंदु अमृततुल्यच आहेत. यांच्या सेवनानें प्रत्येक मानवी प्राण्यास स्वानंदानुभव प्राप्त होईल. यांत संशय नाहीं. **ज्ञानोदय**--भाषांतर फार छान वठलें आहे. साधु रामकृष्ण यांची विषयप्रतिपादनाची शैली त्यांच्या सोप्या व वहिवाटींतल्या दाखल्यांनीं सुगम झाली असून वाचतांना मनाला आनंद वाटतो. **बकुल**—(ही सुधा) जशी एखाद्या मोक्षभिक्षूला निःशंक करून तन्मय करील त्याचप्रमाणें एखाद्या प्रणयलोलुप रंगेल वाचकालाही सात्विक आनंदांत पोंहावयास लावील, विवेक–विमूढ मनुष्यास त्याच्या इच्छे-विरुद्ध पण त्याच्याच खुषीनें आत्मानात्मविवेकाच्या मार्गास लावील, इतकी हिची शक्ति आहे; इतकी हिच्यांत जादू आहे. **शुभसूचक**–धर्मासारख्या गहन विषयांतील तत्त्वांचें विवेचन व्यवहारांतील दृष्टांत व दाखले देऊन इतकें सुबोध झालें आहे कीं, तें कंटाळा न येतां कोणालाही सहज समजल्याशिवाय राहणार नाहीं. **सुबोधपत्रिका**—(रामकृष्णाचीं वचनें) मननीय अशीं वाटतात व त्यांच्याविषयीं आदर वाटूं लागतो. भाषांतर सरस उतरलें आहे. **प्रभात**—भाषा चांगली असून भाषांतर उत्तम साधलें आहे. कविताही गोड आहेत.

स्वामी विवेकानंद यांच्या

'मुलाखती व संभाषणें'.

महाराष्ट्र-समाज जागृत व कर्तव्योन्मुख व्हावा या हेतूनें स्वामी विवेकानंदांच्या सर्व व्याख्यानांचें व लेखांचे उत्तम लेखकांकडून सवडीसवडीनें मराठींत रूपांतर करवून तें 'विवेकानंद पुस्तकमाला' या नांवानें प्रसिद्ध होत आहे. उपरिनिर्दिष्ट पुस्तक हें या मालेंतील पहिलें असून तें आतां विक्रीस तयार झालें आहे. रामकृष्ण-वाक्सुधेचे लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे यांच्याच हातून या पुस्तकाचें भाषांतर झालें असल्यामुळें तें कसें वठलें असेल, हें निराळें लिहावयास नकोच. आरंभीं स्वामी विवेकानंद यांचें चारित्र दिलें असून 'श्रीरामकृष्ण' व 'विवेकानंद' अशीं दोन सुंदर चित्रेंही घातलीं आहेत.

याचे दोन पोटभाग आहेत,–मुलाखती व संभाषणें. स्वामींचीं मतें व कार्यक्षेत्र समजावून घेण्याकरितां येथील व पाश्चात्य देशांतील वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींनीं त्यांच्या मुद्दाम 'मुलाखती' घेतल्या, त्या वेळीं त्यांच्या प्रश्नोत्तरांत अनेक विषय ओघानें आलेले आहेत. त्याचप्रमाणें त्यांचा मुक्काम कलकत्त्यास असतांना त्यांच्या भेटीकरितां आलेल्या हजारों लोकांनीं त्यांना अनेक प्रचलित विषयासंबंधानें जे अनेक प्रश्न विचारले व त्यांचीं स्वामींना आपल्या अधिकारयुक्त वाणीनें जीं उत्तरें दिलीं, त्यांचा समावेश 'संभाषणें' या भागांत आहे.

शिक्षण, स्त्रीशिक्षण, औद्योगिकशिक्षण, धार्मिकशिक्षण, ब्रह्मचर्य, विवाह, बालविवाह, पुनर्विवाह, जातिभेद, वर्णभेद, गायनशास्त्र, कलाकौशल्य, धर्मांचीं सर्व अंगें व उपांगें इत्यादि नानाविषयांवरचीं स्वामींचीं मार्मिक मतें या एकाच पुस्तकांत पहावयास सांपडतील. पृष्ठें ३०० किंमत १ रु. ट. ख. निराळा.

अभिप्राय

केसरी—' मुलाखती व संभाषणें ' यांतील भाषा व विचार अत्यंत वाचनीय आहेत. या भाषांतराची भाषा सुबोध, मधुर व मुळांतील स्वारस्य कायम ठेवणारी आहे. आणि हिंदूधर्माची महती कशांत आहे; सद्वर्तन, ब्रह्मचर्य, स्वार्थत्याग, आत्मविश्वास व देशभक्ति यांत काय सामर्थ्य आहे; इंग्लंड व हिंदुस्थान यांनीं एकमेकांपासून काय शिकावें......वगैरे महत्त्वाच्या विषयांवरील उत्कृष्ट विचार या पुस्तकांत आहेत. पुस्तकाचें बाह्यांग सुंदर आहे. **मुमुक्षु**—कागद, छपाई, बाईंडिंग वगैरे उत्कृष्ट केल्याबद्दल जसें रा. भट आणि मंडळीचें अभिनंदन करावेसें वाटतें; तसेंच भाषांतर सरळ, प्रेमळ व मूळांतील स्फूर्ति कायम ठेवून केल्याबद्दल रा. किनरे यांचे आम्ही सप्रेम अभिनंदन करितों. **इंदुप्रकाश**—रा. किनरे यांनीं भाषांतराचें काम समाधानकारकरीतीनें केलें आहे. त्यांची भाषा गोड, असंदिग्ध व प्रेमळ आहे. देशाच्या पारमार्थिक उन्नतीसाठीं अशा प्रकारच्या तेजस्वी ग्रंथांची फार आवश्यकता आहे. **बालबोध**—विषयांची निवड फार चांगली आहे. अत्यंत बोधप्रद व विचारणीय आहे. भाषा चांगली, शुद्ध, गोड व रसाळ आहे. **पंचमजॉर्ज विजय**—साध्या व मुळास सोडून नसलेल्या गोड भाषेंत हें भाषांतर केलें असल्यानें महाराष्ट्रवाचकांवर खरोखर मोठे उपकार झाले आहेत. पुस्तक अंतर्बाह्य चांगलें आहे. **ज्ञानोदय**—एकंदरींत धर्माचा शास्त्रीयरीत्या उलगडा करण्याची (स्वामींची) रीत फार चांगली आहे व ती सर्वांस मान्य करण्यास हरकत नाहीं. हिंदुधर्माचें ज्ञान मिळविण्यास हें पुस्तक साधनीभूत होईल. **शुभसूचक**—मुलाखतींत व संभाषणांत अनेक विषयांचा ऊहापोह झाला असून लोकांनीं विचारलेल्या अनेक शंकांचें समाधान स्वामींनीं फार मार्मिकपणें केलेलें आहे. **विविधज्ञानविस्तार**—पुस्तकाची भाषा विषयास अनुरूप अशी असून सुबोध आणि सरळ आहे. **ज्ञानप्रकाश**—भाषांतर फार चांगलें साधलें आहे.

भट आणि मंडळी, पुणें-सिटी.